१ जुलै १९६७
चाळीस पैसे

# माणूस




## भारत-चीन उत्तर-प्रत्युत्तर

सहर्ष घोषणा

• •

नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

• •

राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

• •

सप्रेम भेट योजना . . .

पहा : कव्हर पान तीन

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : पाचवा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
**संपादक**
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
अ. मा. सा
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**स. न.** **जून १५**

गेल्या १७ जूनच्या अंकातील श्री. ज. जोशी यांचे 'दक्षिणायन' (स्वतंत्र द्रविडीस्थान) हा अभ्यासपूर्ण आणि विचारवंतांना व देशभक्तांना हेलावून सोडणारा लेख वाचला.

आपल्या परमप्रिय भरतभूमीचे कोणत्याही कारणाने का होईना, तुकडे पाडण्याची भाषा उच्चारली गेली असताना अंत:करणाला खोल जखम होते. आणि अशा प्रकारच्या प्रथमत: आणि बाह्यत: अव्यवहार्य व हास्यास्पद कल्पना मुळात निर्माणच होऊ नयेत, यासाठी काय करावे याचा विचार सुरू होतो.

लेखक श्री. ज. जोशी ह्यांनी अतिशय महत्त्वाच्या आणि देशाच्या दृष्टीने मूलभूत समस्येला हात घातला आहे. सत्य परिस्थितीचे दर्शन केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन. 'माणूस'मध्ये अशा प्रकारचे लेखन प्रकाशित होत असल्याने त्याचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे असे माझ्याप्रमाणे अनेक नियमित वाचकांना वाटल्यास नवल काय ?

**रमेश गणेश हळबे**, वांद्रा, मुंबई, ५१.

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २.
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

जून १४

संपादक, 'माणूस,' पुणे

सप्रेम नमस्कार

# मार्ग आणि श्री. गंगाधर गाडगीळ

आपल्या दि. ३ जूनच्या अंकात 'मार्ग' या सदरात माझ्याविषयी जो उल्लेख आहे त्याबद्दल खुलासा करण्यासाठी हे पत्र पाठवीत आहे.

'काँग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम' अगर 'इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम' या संस्थांशी माझा सध्या कोणताही संबंध नाही. तेव्हा तो तोडून टाकण्याचा अगर त्यासंबंधी काही जाहीर खुलासा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

काही वर्षांपूर्वी 'इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम' या संस्थेचे थोडेबहुत काम मी पाहत होतो. ते काम स्वीकारताना संस्थेला परदेशांकडून पैसा मिळतो की काय, अशी चौकशी अर्थातच मी केली होती. तेव्हा मला असे सांगण्यात आले होते, की संस्था भारतात उभ्या केलेल्या पैशावरच चालते. शिवाय श्री. जयप्रकाश नारायण यांचा संस्थेशी घनिष्ट संबंध होता. त्यामुळे मी निर्धास्त होतो.

या संदर्भात आपण जो नैतिक प्रश्न उपस्थित केला आहे तोदेखील आपल्याला वाटतो तितका साधा व सोपा नाही. पण ती गोष्ट अलाहिदा.

माझ्यासंबंधी जाहीरपणे एखादे विधान करण्यापूर्वी त्याच्या सत्यासत्यतेची शहानिशा करून घेणे हे आपले कर्तव्य होते; परंतु आपण ते केले नाही ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. दुसऱ्यांच्या नैतिक जबाबदाऱ्यांबद्दल आपण जितके जागरूक असता तितकेच स्वतःच्या नैतिक जबाबदाऱ्यांबद्दल राहिलात तर बरे होईल.

आपला

**गंगाधर गाडगीळ**

[ गाडगीळ म्हणतात त्याप्रमाणे त्यांचा व परदेशी पैशावर चालू आहेत असा संशय असलेल्या संस्थांचा संबंध आज आहे की नाही याची शहानिशा करून घेण्याची 'नैतिक जबाबदारी' लेखक–संपादकावर टाकणे ही चूक आहे. काही वर्षांपूर्वी हा संबंध होता आणि तो संपल्याचे, तुटल्याचे, ठळकपणे जाहीर झालेले नव्हते एवढी माहिती या विषयासंबंधी सर्वसामान्य संदर्भ देण्यास पुरेशी होती.

गाडगीळ म्हणतात त्याप्रमाणे ही संपादकीय जबाबदारी मानली तरी तिला ' नैतिक ' समजणे ही दुसरी चूक. फार तर तिला ' व्यावसायिक ' म्हणता येईल. ' व्यावसायिक नीतिमत्ता ' हा तर ' नैतिक ' शब्द (शेवटच्या परिच्छेदातील) योजण्यामागील गाडगीळांचा उद्देश नव्हता ना ?

' मार्ग ' या लेखात ' नैतिक ' शब्दाचा जो संदर्भ अभिप्रेत होता त्याचा उल्लेख पत्राच्या चवथ्या-परिच्छेदात गाडगीळांनी केलाच आहे. हा संदर्भ साधा व सोपा नाही हे गाडगीळांचे मत चर्चाविषय होऊ शकते.

' इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम ', ' कांग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम ' या संस्थांच्या कारभाराविषयी व कारवायांविषयी, देशात व परदेशांत, वृत्तपत्रांतून व सरकारी वर्तुळातून प्रकटपणे उलटसुलट चर्चा व चौकशा सुरू असताना या संस्थांशी ' काही वर्षांपूर्वी ' वा आज संबंध असलेल्या व्यक्तींनी, आपली या संबंधीची भूमिका स्पष्ट करावी एवढी सरळ व साधी अपेक्षा व्यक्त करणे, याला गाडगीळ ' **दुसऱ्याच्या** नैतिक जबाबदाऱ्यांबद्दल **जागरूक** ' असणे समजतात ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे.

आणि ही अपेक्षा मूलतःच चूक असेल तर गाडगीळ यांनी तिसऱ्या परिच्छेदात केलेल्या अल्पशा खुलाशाचे तरी काय प्रयोजन होते ? जयप्रकाशांची ढाल तरी कशासाठी ?

' दुसऱ्यांच्या नैतिक जबाबदाऱ्यांबद्दल जागरूक असणाऱ्यांनी स्वतःच्या नैतिक जबाबदाऱ्यांबद्दलही जागरूक असले पाहिजे ' हे गाडगीळांचे विधान योग्य आहे, मान्य होण्यासारखे आहे. याबाबत एवढीच आठवण नम्रतापूर्वक येथे देतो—सर्वसामान्य सुशिक्षित वर्गाच्या अधःपाताची चर्चा ' मार्ग ' मध्ये आहे. या चर्चेतून लेखकाने स्वतःला वगळलेले नाही, दोषाचा वाटेकरी होण्याची तयारी दाखवलेली आहे—यात दुसऱ्यांच्याइतकीच स्वतःच्या नैतिक जबाबदारीविषयीची जागरूकता व्यक्त होत नाही काय ?—**संपादक** ]

**स. न.** **जून ९**

परवाच्या अंकातील ' शिवसेने ' वरील लेख वाचला. निरीक्षण छान केले आहे, विचारदेखील चांगले व्यक्त केले आहेत, पण सर्वच विचारांशी सहमत होता आले नाही.

मराठी तरुणांना लघुलिपी अवघड वाटते व ती शिकण्याचा त्रास घेण्याचे ते टाळतात, हा आक्षेप चुकीचा वाटतो. कुठले कठीण काम करण्याचे मराठी तरुणांनी टाळले आहे ? एवढेच की ज्यांना ह्यांचेपेक्षा जास्त पोटतिडिक आहे त्यांनी ते काम लवकर आत्मसात केले, तर त्यांत आश्चर्य कसले ? कारण तेथे जगण्याचा प्रश्न असतो म्हणून ! अल्पसमाधानी हासुद्धा आरोप मराठी माणसावर केला जातो.

पण ही वृत्ती सगळीकडेच आढळते. जेव्हा अगदीच नाइलाज होतो तेव्हाच हे दक्षिणात्य पुढे येतात. उलट मला म्हणावयाचे आहे, की हे लोकच जास्त अल्पसंतोषी आहेत. कुठल्याही नोकऱ्या कितीही थोड्या पगारात करायला यांना कांही वाटत नाही. मराठी माणूस ठराविक Standard पेक्षा खाली येण्यास सहसा टाळतो. हा गुणसुद्धा आक्षेपार्ह समजण्यात यावा काय ? असले परस्परविरोधी आरोप पटावेत कसे !

मराठी तरुणांकडून नोकऱ्यांसाठी अर्ज कमी येतात हे खरे आहे. चार ठिकाणी अर्ज करूनही अर्जाची साधी पोचसुद्धा घेतली जात नाही, तेव्हा काय करायचे ? वरच्या साहेबांत मराठी माणसे कमीच. बरेचसे अर्ज कचऱ्याच्या टोपलीतच फेकले जातात. उरलेल्यांना अशा वेळी पत्र पाठवतात, की ते त्यांना इंटरव्ह्यूच्या तारखे-नंतर मिळावे. इंजिनिअर्सना थोडंफार बरं समजलं जातं. पण जर प्रत्यक्ष त्यांना विचारलं तर त्यांचे हाल पाहून तुम्हांला आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही. कुठलीही जाहिरात आली की अर्ज करावयाचा व नंतर तिष्ठत बसावयाचे. एक अर्जासाठी ७–८ रु. असा खर्च येतो. केव्हा केव्हा ५–१० रु. च्या पोस्टल ऑर्डर्स-सुद्धा पाठवाव्या लागतात. एक तर ह्या सर्व अर्जांची उत्तरेच येत नाहीत, आलीच तर इंटरव्ह्यूला जाता येत नाही, कारण तारीख निघून गेलेली असते. ह्यांना बरा पगार मिळतो हे ठीक आहे, पण आजच्या काळात सर्व काही भागवून चांगल्या नोकरीसाठी एवढा खर्च करणे त्याला परवडत नाही. तो फक्त मग जाहिरात बघतो. त्यावर काही करावेसे त्याला वाटत नाही. ह्यांचे हे हाल तर मग इतरांचे काय ते सर्वांना माहीतच आहे.

मराठी तरुणांना इंग्रजी चांगले बोलता येत नाही, हा एक आरोप ! एकीकडे सरकार मराठीचा घोष करते, इंग्रजीशिवाय S. S. C. ची परीक्षा पास होता येते, तर दुसरीकडे इंग्रजी यत नसल्यामुळे नोकऱ्या मिळण्यात अडथळा येतो. हा दोष कुणाचा ? कुठलेही धोरण ठरवा, पण त्या मागे सरकार बळाचा का वापर करत नाहीत ? त्या पेक्षा ठराव मांडणे वगैरे गोष्टी बंद करा व लोकांना हवे तसे तरी करू द्या !

आणखी एक. मराठी माणूस थोडाफार स्वाभिमानी आहे. प्रत्येक वेळी साहेबाची थुंकी झेलणं त्याला परवडणार नाही व इतरांनीही त्याने तसे करावे, हा आग्रह धरू नये. हा ज्या त्या मातीचा गुण आहे. दोष त्या पूर्वजांना द्या, ज्यांनी ही परंपरा रुजविली आहे. त्यांनी धन्याशी इमान राखले होते, पण स्वाभिमान टिकवून ! असो...

'माणूस 'चा मी एक नियमित वाचक आहे व एक मराठी तरुण आहे. माणूस 'चे वाढते यश पाहून आनंद होतो. 'माणूस ' असाच वाढो. यशस्वी होवो !

**नंदकिशोर रोजेकर,** पुण

प्रिय श्री. माजगावकर

आपणांकडून दि. १० मे रोजी निघून मजल दर मजल करीत आम्ही १५ मेस पाटण्यास सुखरूप पोहोचलो. पोहोचताच आम्हांस श्री. जयप्रकाश नारायण यांची प्रत्यक्ष भेट होण्याचा योग मिळाला. दुसरे दिवशी आरा या जिल्ह्याच्या गावी गेलो आणि तिसऱ्या दिवशी त्याच जिल्ह्यातील चेनारी या तालुक्याच्या (Block च्या) गावी येऊन पोहोचलो. तेथूनच हे पत्र लिहीत आहे.

पाटण्यापासून ९८ मैलांपर्यंत (साकारामपर्यंत) बरेच कालवे आहेत. जे सध्या दुथडी वाहत होते पण बाजूच्या थोड्या जमिनीस ते मिळत होते. नंतर २५ मैल-पर्यंत दुर्गावती नदी वाहत आहे, जिला अजूनही ओघ आहे. महाराष्ट्रातही Lift irrigation बाबत आघाडीवर असलेल्या कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांना बेकार जाणाऱ्या पाण्यातून दुष्काळ कोठे दिसेना. त्यात समजलेले, की चेनारी हा एक अतिदुष्काळी भाग. अतिदुष्काळी चेनारी भागात, दुर्गावती नदीस अजून ओत्र आणि त्यास बांध घालून Lift केलेले नाही !

चेनारीस पोहोचलो तेव्हा तेथे श्री. जगजीवनराम यांचे भाषण चालू होते. भाषणानंतर आम्ही त्यांची गाठ घेतली. दुसऱ्या दिवशी आम्हांस अनेक सामाजिक, राजकीय नेते, मुखिया भेटले. (चेनारी या ११० खेड्यांच्या ब्लॉकमध्ये १८ मुखिया निवडलेले आहेत, ३ वर्षांसाठी) प्रत्येकाचा एकच स्वर--दुसरा लबाड आहे, तुम्ही आमच्या गावी चला. आमच्या उद्‌वेगात त्याने भर पडत होती.

त्याच दिवशी आम्ही (सतरा जण) आमचे दोन भाग करून ४ व ३ अशी सात खेडी पाहून घेतली, आणि आमची मते पूर्ण बदलली. आम्हांस अचंबा वाटला, बऱ्याच भागांत कोठूनही मदत मिळाली नव्हती. संध्याकाळी माघारून परतलो. विचार करून, आपापसात काही ठरवून झोपलो.

दुसऱ्या दिवशी (१९ ला) आमची तुकडी सातपैकी एका गावी (बेनसील) थडकली. त्या गावच्या पुढाऱ्याला आम्ही चेनारीसच ठेवले. बेनसीलच्या गावकऱ्यांना जमविले. ६ तुकड्या करून, त्यांच्यांतील एक एक घर पाहून, सर्व चौकशी करून प्रत्येकाची अन्न, कपडे व औषधे यांची गरज पाहून घेतली. सर्व माहिती एकत्र केली. ३२ कुटुंबे (परिवार) धान्यासाठी गरजू निघाली. रस्ता नसल्यामुळे अर्ध्या मैला-वर उभ्या केलेल्या ट्रकजवळ त्यांना नेले आणि वाटपाचे काम पूर्ण करून आम्ही परतलो. सारा मामला २॥-२॥। तासांचा. आतापर्यंत तीन दिवसांत सात गावी १७ पोती तांदूळ, ७५ साड्या, २५ धोतरे, ५० बनियन्स, ३० ब्लँकेट्स वाटली आमच्याजवळचा माल ७-८ दिवसात संपून जाईल.

चेनारी गाव मुख्यतः व्यापारी, मध्यम वर्गीय. येथील वर्गीय भावना ज्वलंत.

# जिस देश में गंगा बहती है

सर्व मदत कनिष्ठ वर्गासच मिळते आणि मध्यम वर्गाची कुचंबणा होते. आम्ही त्यांस तळे खोदण्यास आवाहन केले आहे. पण यांची जिद्द अशी, की आम्ही भुके मरू पण काम करणार नाही.

आणि आम्ही आजपासून येथील मध्यमवर्गीय जवानांना बरोबर घेऊन तळे खोदण्यास प्रारंभ केला आहे आणि त्यांच्या कल्पनांना धक्का दिलेला आहे. काम मोठे आहे. गरजू पण सशक्तांकडून काम करून घेऊन त्यांना मदत करण्याचे आणि गरजू पण अशक्तांना मोफत मदत करण्याचेही. दोन्ही कामे आवश्यक आहेत...

—सुभाषचंद्र भोसले, कोल्हापूर,

दुष्काळाच्या या अग्निदिव्यातून

# नवा बिहार कसा निर्माण होईल?

१९५४–चीनमधील भयंकर दुष्काळ. कोटय़वधी जनता मृत्युच्या मुखात चालली होती. सबंध जगात एकटय़ा रशियाशिवाय चीनला दुसरा मित्र नाही अशी स्थिती. रशियाने मदतीचा हात पुढे केलाही होता. परंतु माओ-त्से-तुंगने परदेशांतील मदतीवर जगायचा साफ इन्कार केला आणि सबंध चीन राष्ट्राला उद्देशून आवाहन केले, की सर्व चिनी नागरिकांनी आपापले अन्य व्यवसाय थांबवून शेतावर अन्न-आघाडीवर लढण्यासाठी चलावे. युद्धस्तरावर दुष्काळाशी लढा दिला गेला. सर्व शाळा-कॉलेजे बंद करून विद्यार्थी व अन्य तरुणवर्ग शेतावर राबण्यास गेला व अशा तऱ्हेने स्वतःच्या पायावर दुष्काळातून स्वावलंबी असा नवीन चीन बाहेर पडला. या काळात सर्वजणांनी शेतावर काम केले व या सर्वांसाठी मोफत भोजनालये चालविण्यात आली.

१९६७–आज बिहारमध्ये–भारताच्या एका राज्यामध्ये–भयंकर दुष्काळ पडला आहे. या संकटातून बिहारला वाचविण्यासाठी भारताच्या अन्य राज्यांतून मदत येत आहे. राष्ट्रीय बंधुत्वाच्या दृष्टीने हे योग्य आहे. युनिसेफ, केअर व अन्य संस्थांतर्फे परदेशातून मदत येत आहे. मानवतेच्या दृष्टीने हेही अयोग्य नाही; परंतु खुद्द बिहारी जनतेच्या दृष्टीने हे कितपत उचित आहे, याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. या बाह्य मदतीने गुरेढोरे व मनुष्यप्राणी यांचे जीव वाचतील यात शंका नाही. परंतु मनुष्य हा पशुप्रमाणे केवळ प्राणी नाही. म्हणून केवळ 'प्राणी' जगवून चालणार नाही. त्याच्यातला 'मनुष्य' जगला पाहिजे.

आज बिहारमध्य दुष्काळ निवारण्याचे जे उपाय चालू आहेत त्यात ही दृष्टी

नाही असे प्रत्यक्ष अवलोकनाने व येथे प्रत्यक्ष कार्य करून माझे मत बनले आहे. बिहार रिलीफ कमिटीतर्फे जी मोफत भोजनालये चालू आहेत त्यामुळे लाचारी आणि आळस यांना प्रोत्साहन मिळत आहे. या भोजनालयात फक्त मुले, पंगु, वृद्ध, गर्भवती व बाळंत स्त्रिया यांना अन्नदान केले जात असले तरी घरातील मंडळी थाळीतून आपापले अन्न घरी नेऊन खातात व त्यामध्ये कर्ता घट्टाकट्टा पुरुषही आपले पोट भागवीत आहे. याचा परिणाम असा होत आहे की सरकारतर्फे जी दुष्काळी कामे चालू आहेत त्याला मजूर मिळेनासे झाले आहेत. अशा प्रकारच्या वाढत्या तक्रारी रोज इकडील वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होत आहेत.

प्रा. चंद्रकांत शं. पाटगांवकर
कोल्हापूर रिलीफ पथक
मु. चेनारी, जिल्हा शाहाबाद, बिहार

*दुष्काळ निवारण्याचे तात्कालिक व दीर्घकालीन असे दोन प्रकारचे उपाय असतात.* पुन: दुष्काळ पडू नये अशा दीर्घकालीन विकासाच्या श्रमांच्या कामांत (विहिरी, तलाव, कालवे खोदणे, बांध बांधणे, शेतावर ताली टाकणे इ.) मजुरांना कामे देऊन त्यांची आयशक्ती वाढविणे व त्यावर त्यांना स्वस्त-दराने धान्य पुरविणे. अशा प्रकारे दोन्ही उपायांचा समन्वय करण्यात येतो. अशा शेतीविषयक श्रमाच्या कामावर राबणाऱ्या लोकांसाठी मोफत भोजनालये चालविणेही समर्थनीय ठरेल.

आज बिहारात रिलीफ कमिटीतर्फे ता. १५ मे ६७ अखेर ९१८ मोफत भोजनालये चालविली जात असून त्यांचा साप्ताहिक खर्च १० लाख रुपयांहून अधिक आहे व यांतून रोज चार लाखांहून अधिक लोक मोफत जेवत आहेत. यातून परावलंबन व आळसाला प्रोत्साहन याशिवाय काय वाढीस लागणार! पुन: दुष्काळ पडला–ईश्वर असे न करो–तर त्याला तोंड देण्याचे सामर्थ्य बिहारमध्ये कसे निर्माण होणार? पुन: याचना व मोफत अन्नसत्रे हाच मार्ग स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नाही. यासाठी या मोफत भोजनालयांना श्रमकार्याची जोड दिली पाहिजे. सरकारी विकास–कार्ये व रिलीफ कमिटीची भोजनालये यांचा समन्वय साधला पाहिजे. रिलीफ कमिटीतर्फेसुद्धा श्रमिकांच्या प्रचंड भूसेना Land–Army उभ्या करून त्याचेसाठी मग मोफत भोजनालये चालविण्यास हरकत नाही.

दुर्दैवाने आज अशी स्थिती नाही. आज अन्न, कपडे इत्यादी वस्तू केवळ भूतदया, जीवदया या भूमिकेतून वाटल्या जात आहेत. दुष्काळाचा सामना करणारा नवा बिहार निर्माण करण्याच्या दृष्टीने नाही. पूज्य श्री. जयप्रकाश नारायण हे या

बिहार रिलीफ कमिटीचे अध्यक्ष आहेत. त्यांचेकडून एकेकाळी श्रमनिष्ठ अशा नव्या समाजवादी नवभारताच्या उभारणीची अपेक्षा होती. आज या दुष्काळाच्या अग्निदिव्यातून ते नवा आलस्यहीन, स्वाभिमानी, श्रमनिष्ठ व स्वावलंबी असा बिहार निर्माण करतील काय? समाजवादाकडून ते सर्वोदयाकडे वळले आहेत. बिहारात भूदान–ग्रामदान बरेच मिळाले आहे. या शक्तीचा उपयोग करून घेता येईल.

'*हम उस देशके लोग भी मूखे है। जिस देश में गंगा बहती है*' असे आज दृश्य आहे. गंगा, शोण, दुर्गावती इ. नद्यांत पाणी असूनही तीरावरच्या शेतात दुष्काळ आहे. छोटया नद्यांना छोटे बांध घालून पंपाने लिफ्ट इरिगशनने दोन्ही तीरावरची शेते पाण्याने भिजवता येण्याची स्थिती आहे पण त्या दृष्टीने आजवर काही प्रयत्न झालेले नाहीत व या दुष्काळातही तसे प्रयत्न चालू नाहीत. जमीन अत्यंत सुपीक आहे. इथल्या माणसांनी आळस व सुस्ती झाडून योजनापूर्वक प्रयत्न केले तर बिहार इतर राज्यांनाही धान्य पुरवू शकेल अशी स्थिती आहे.

"बिहारवर आज संकट आले आहे त्यातून नवा बिहार निर्माण होईल अशी मला आशा आहे!" पूज्य विनोबाजींचे हे उद्‌गार सूचक नाहीत काय? जयप्रकाशजी यातून बोध घेऊन सुस्तीरहित व आलस्यहीन आणि श्रमाभिमुख असा नवा बिहार या दुष्काळाच्या अग्निदिव्यातून निर्माण करतील काय?

बिहार सरकारने नुकताच हुकूम काढला आहे की, सर्व ब्लॉक डेव्हलपमेंट कमिटया यापुढे ब्लॉक रिलीफ कमिटया म्हणून काम पाहतील. यामुळे बिहार रिलीफ कमिटीची पुनर्रचना करून सर्व जिल्हा रिलीफ कमिटया या जिल्हा निर्माण (डेव्हलपमेंट) किंवा विकास कमिटया म्हणून कार्य करू लागल्या पाहिजेत. या कामी रिलीफ कमिटीने शाळाकॉलेजातील सुटीवर असलेल्या बिहारमधील तरुण विद्यार्थीवर्गाचा उपयोग करून ती शक्ती या दिशेने कामाला लावली पाहिजे.

यापुढे बिहारला बाहेरून पैसे, अन्न, कपडे यांच्या बरोबरच या दृष्टीचे मंत्रज्ञ, तंत्रज्ञ, ओव्हरसियर, शेतीतज्ज्ञ, स्वयंसेवक व सामाजिक सेवक यांचीही मदत मिळाली पाहिजे. संकटाला तोंड देण्याचे कामाबरोबरच नव बिहारच्या निर्माणकार्यातही भारतातील अन्य प्रांतीय बंधूंनी बिहारला या दृष्टिकोनातून मदतीसाठी पुढे आले पाहिजे.



# नरम राज्यकर्ते, गरम जनता!

"आपल्या जीवनाचा प्रवाह अखंड जातच आहे. परंतु क्षणोक्षणी होणाऱ्या फरकांनी हे जीवन गांगरून जात नसते; ते हुरळून जात नाही वा होरपळूनही जात नाही. प्राचीन संस्कृतीचा हाच प्राणमय विशेष! महान चीन देशातही हाच थोर विशेष भरपूर प्रमाणात आहे...गेल्या पाच वर्षांत चीनमध्ये काय झाले त्याची कल्पना कर. कोट्यवधी कुटुंबांची काय दशा झाली असेल त्यांना किती आपत्तींतून, वादळातून जावे लागले असेल त्याची कल्पना कर. परंतु तरीही महान चीन राष्ट्र जिवंत आहे. तेथे व्यक्ती जन्मत आहेत, वाढत आहेत आणि स्वतःच्या चिनी राष्ट्राची नि मानवजातीचीही परंपरा त्या पुढे नेत आहेत."

हा उतारा आहे पं. नेहरूंनी तीस-पस्तीस वर्षांपूर्वी लिहिलेल्या एका पत्रातील. त्या वेळी चँग-कै-शेकचा चीन जपानी आक्रमणाविरुद्ध मोठ्या हिंमतीने लढत होता. या प्रतिकाराच्या संदर्भातच पंडितजींनी हा अभिप्राय व्यक्त केला होता ही गोष्ट खरी असली तरी प्रारंभापासूनच म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातही पंडितजींच्या अंतःकरणातील एका कोपऱ्यात चीनसंबंधी ममत्वाची भावना होती. या उताऱ्यामध्ये पंडितजींनी केवळ जपानी आक्रमणाविरुद्ध लढणाऱ्या चीनचा गौरव केला आहे असे नाही. त्यांनी चीनच्या प्राचीन संस्कृतीच्या प्राणमय विशेषांचाही मुक्त मनाने गौरव केला आहे. वस्तुतः पंडितजींसारख्या जागतिक इतिहासाचे आलोडन करणाऱ्या चिंतकाला चिनी संस्कृतीच्या प्राणमय विशेषांचे खरे स्वरूप कोणते याचे अधिक सखोल ज्ञान असावयास हवे होते. कारण चिनी संस्कृतीचे विशेष काही वेगळेच होते. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी नेपोलियनने काढलेले चीनबद्दलचे उद्‌गार प्रसिद्ध आहेत. नेपोलियन म्हणाला होता, "या सुस्त अजगराला जागे करू नका. कारण तो एकदा का जागा झाला की साऱ्या जगभर धुमाकूळ घालू लागेल."

नेपोलियनचे हे मत कदाचित पक्षपाती असण्याचा संभव आहे असे मानले तरी पंडितजींच्या वाचनात ते खचित आले असले पाहिजे. आणि तरीही त्यांना आरंभापासून मानवजातीचा आधारस्तंभ म्हणून चीनसंबंधी ममत्व वाटत होते. भारतात स्वातंत्र्यप्राप्ती झाल्यानंतर वर्षभराच्या आतच चीनमध्ये कम्युनिस्टांची राजवट

प्रस्थापित झाली आणि तेव्हापासून भारत-चीन मैत्रीचे नवे पर्व सुरू करावयास पंडितजी अतिशय उत्सुक झाले होते. १९५० ते १९५५ या कालात 'हिंदी-चिनी भाई-भाई'चा असा काही गजर होत होता की जणू दोन जुने मित्र बऱ्याच वर्षांनी पुनश्च भेटले असून यापुढे एकदिलाने वाटचाल करण्याचा त्यांनी दृढनिश्चय केला आहे. चीनमध्ये कम्युनिस्ट राजवट येताच तेथील जनतेचे जीवनमान कसे उंचावू लागले आहे आणि भारत-चीन मैत्रीच्या रूपाने आशियाच्या नेतृत्वाचे नवे चित्र कसे साकार होऊ लागले आहे याची खरीखोटी वर्णने करण्यात आपल्या देशातील विद्वानांची स्पर्धाच लागली होती.

## चीनविरोधी एकजूट

चीनमध्ये कम्युनिस्ट राजवट प्रस्थापित होताच प्रथम या राजवटीने काय केले असेल तर तिने तिबेटचा घास गिळला. वस्तुतः या पहिल्या सलामीतच आपल्याला या शेजाऱ्याचे वास्तववादी स्वरूप ध्यानात यावयास पाहिजे होते. परंतु आम्ही केलें ते नेमके उलटे ! तिबेट हा चीनचाच भाग कसा आहे याचेच आम्ही समर्थन करू लागलो. आक्रमक विस्तारवादाची ज्याची परंपरा आहे आणि ज्या परंपरेत आता हुकूमशाहीचा तांबडाभडक रंग मिसळला आहे, अशा शेजाऱ्याची पावले कशी काय पडत जातील याचा अंदाज बांधून, त्यानुसार धोरण आखण्याऐवजी, जर कोणी चीनबाबत सावध राहण्याचा सल्ला देऊ लागले तर त्यास युद्धखोर आणि प्रतिगामी अशा शिव्या देण्यात दिल्लीतल्या नेहरूंपासून गल्लीतल्या मोरूपर्यंत सर्वांची शक्ती खर्च होत होती. पं. नेहरूंप्रमाणे आपल्या चीन प्रेमाला इतके उधाण आले होते की संयुक्त राष्ट्रसंघटनेत चीनला प्रवेश मिळावा यासाठी आमचे प्रतिनिधी आपले घसे कोरडे करीत होते.

वाळूत तोंड खुपसून बसलेल्या शहामृगाप्रमाणे आजुबाजूला काय घडते आहे याचा अंदाज न घेता आपल्याच कल्पनेत मश्गुल असणाऱ्या राष्ट्राला त्याच्या गाफीलपणाबद्दल कोणती किंमत द्यावी लागते हे १९६२ च्या ऑक्टोबरमध्ये आपण पुरेपूर अनुभवले आहे. विश्वासघातकी शेजाऱ्याने मैत्रीचे नाटक करून पाठीमागून खंजीर खुपसावा तसे हे चीनचे वर्तन होते एवढे सगळे झाल्यानंतर आम्हांला जाग आली. अर्थात तीदेखील किंचितच ! साऱ्या आशियावर आपले प्रभुत्व निर्माण करण्याच्या महत्त्वाकांक्षेने पेटलेल्या या अजगराला आवर घालण्यासाठी चीनविरोधी राष्ट्रांची साखळी निर्माण करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक होते. परंतु प्रारंभापासूनच राष्ट्रहितापेक्षा स्वप्नमय सिद्धांतांना घट्ट धरून बसण्याचा आमचा 'प्राणमय विशेष' येथे पुन्हा आडवा आला. जपान, फिलिपाईन्स, ऑस्ट्रेलिया, मलेशिया आदी पॅसिफिक विभागातील राष्ट्रांची एकजूट करून चीनच्या विस्तारवादाविरुद्ध उभे राहण्याऐवजी आम्ही आमच्या तथाकथित अलिप्ततावादी मित्रांवर अवलंबून राहण्याचे ठरविले. रशिया आणि ईजिप्त हे आमचे खास मित्र. पण

त्यांनीही चीनने भारतावर आक्रमण केले आहे असे म्हणण्याचे धाडस केले नाही. भारताच्या परराष्ट्रनीतीतील स्वप्नाळू भाबडेपणा किती हास्यास्पद ठरतो याचा या निमित्ताने धवधवीत प्रत्यय आला.

हे सारे विचार आज सुचण्याचे कारण असे की, चीनबाबत अद्यापही वास्तववादी आणि ताठर धोरण स्वीकारण्याची आमची तयारी नाही. गेल्या पंधरा दिवसांतील घटना या दृष्टीने बोलक्या आहेत. आपण प्रथम हे ध्यानात घेतले पाहिजे, की चीन हे राष्ट्र सुसंस्कृत नव्हे. ते तसे असते तर राजनैतिक प्रतिनिधींना कसे वागवायचे असते हे त्याला समजले असते. विजय आणि रघुनाथ या आपल्या प्रतिनिधींना चीनच्या 'असंस्कृतिरक्षकां'नी कशी वागणूक दिली त्याचे वृत्त वाचल्यानंतर प्रत्येक भारतीय नागरिकाला संताप येणे साहजिकच आहे. परंतु आमचे परराष्ट्रखाते आपला शांतिब्रह्माचा अवतार सोडावयास तयार नाही. एखादा कठोर, क्वचित उर्मट शब्द उच्चारावयाला जेथे आमची तयारी नाही तेथे तशा स्वरूपाची कृती होण्याची गोष्ट दूरच !

पेकिंगमधल्या लाल रक्षकांचा उर्मटपणा समजण्यासारखा आहे. परंतु दिल्लीतल्या चिनी वकिलातीतील एक सामान्य नोकर, पहाऱ्यावर असलेल्या आपल्या शिपायाच्या श्रीमुखात भडकवण्याचे धैर्य दाखवतो, यातच आमचा कमकुवतपणा किती खोलवर गेला आहे याचा पुरावा आहे. ही घटना घडल्यानंतर दिल्लीतल्या नागरिकांनी चिनी वकिलातीभोवती निदर्शने केली. संतप्त निदर्शकांकडून थोडीशी मारहाणही झाली. आपल्या राजनैतिक प्रतिनिधींची अमानुष विटंबना करणाऱ्या राष्ट्राच्या उद्दाम प्रतिनिधींच्या रोखाने एखादी वीट फेकली गेली तर ते स्वाभाविक समजण्याऐवजी आमच्या मानवतावादी धोरणाला असा काही पाझर फुटला की या प्रकाराबाबत दिलगिरी व्यक्त करण्यासाठी धावपळ चालू झाली.

## गुप्ताजींचा पाझर

कम्युनिस्टांना तर हा प्रकार फारच आक्षेपार्ह वाटला. संसदेमध्ये या घटनेची चर्चा होत असताना श्री. भूपेश गुप्ता म्हणाले, की या प्रकारामुळे आमची नैतिक बाजू दुबळी झाली आहे. गुप्ता प्रभृति कम्युनिस्टांना नीतीची एवढी चाड आहे याची कल्पना नव्हती. १९४० मधल्या लोकयुद्धापासून तेलंगणापर्यंतचा त्यांचा सारा प्रवास नीतीचे बोट धरूनच होत होता असे आता मानावयास हवे. एरवी विश्वासघातकी आणि रानटी प्रवृत्तीच्या शत्रूराष्ट्राच्या इमारतीच्या रोखाने एखादा दगड फेकला जाताच गुप्ताजींचे अंतःकरण असे शतशः विदीर्ण झाले नसते. कदाचित त्यांना त्यात हिंसेचा वास आला असावा. रशियाचे रणगाडे हंगेरीच्या सीमेत घुसल्यानंतर तोंडाला कुलुप लावून बसणाऱ्या लालभाईंना दिल्लीतल्या दगडफेकीत हिंसा दिसावी, यात फारसे आश्चर्य मानण्याचे कारण नाही. भूपेश गुप्ता या दगडफेकीने विव्हल व्हावे हे स्वाभाविक आहे. कारण हंगेरीत घुसलेले रणगाडे

पुरोगामी होते तर दिल्लीतला दगड प्रतिगामी होता.

चीनच्या अमानुष वर्तनाबद्दल संसदेमध्ये चर्चा झाली तेव्हा अनेक सदस्यांनी चीनबरोबरचे राजनैतिक संबंध तोडण्याची मागणी केली. इतकेच नव्हे तर कॉंग्रेस पक्षाच्या बैठकीत श्रीमती तारकेश्वरी सिन्हा व श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांनीही भारत सरकारच्या नरमाईच्या धोरणाबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली. चीनच्या वर्तनाबद्दल आपल्या एकाही मित्रराष्ट्राने साधा नापसंतीचा शब्दही काढलेला नाही, या वस्तुस्थितीकडे श्रीमती सिन्हा यांनी प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांचे लक्ष वेधविले. व्हिएटनामबाबत कोसिजिन अमेरिकेवर आगपाखड करतात म्हणून आम्हीही अमेरिकेला चार गोष्टी सुनावण्याचे धाडस करतो. नासर इस्रायलवर तोंडसुख घेतात म्हणून आम्हीही इस्रायलमुळे पश्चिम आशियातील शांततेला कसा धोका आहे याचे विवेचन करतो. मग पेकिंगमधल्या भारतीय राजप्रतिनिधींची विटंबना होत असताना, तेथील भारताच्या वकिलातीभोवती लाल रक्षकांनी वेढा घातला असताना व त्या वकिलातीत राहणाऱ्या नोकरवर्गाचे व त्यांच्या कुटुंबियांचे जीवन धोक्यात आले असताना कोसिजिन-नासर प्रभृतींनी कडक टीकेचे शब्द सोडाच पण चीनला चार समजुतीचे शब्द सुनावण्याची तत्परता दाखवावयास नको होती का? श्रीमती सिन्हा यांच्या या आशयाच्या प्रश्नाला इंदिरा गांधी समाधानकारक उत्तर देऊ शकल्या नाहीत.

'हिंदी-चिनी भाई भाई'चे पर्व केव्हाच संपलेले आहे. आता सुरू झाले आहे ते 'हिंदी चिनी बाय बाय'चे पर्व. चिनी प्रतिनिधीनेच तसे म्हटले आहे. पाकिस्तानने आपली कुरापत काढली की अमेरिका-ब्रिटनसारखी भांडवलशाही राष्ट्रे गप्प बसतात. चीनने नाकेबंदी करण्यास प्रारंभ केला की रशिया–ईजिप्तसारखी समाजवादी राष्ट्रे आपल्याकडे तोंड फिरवतात. मग आपण आहोत तरी कोठे? पण असला निरर्थक प्रश्न विचारण्याच्या भानगडीत कोणी पडू नये हेच बरे! ●

## तत्त्वज्ञान व मूकाभिनय

रॉल्फ स्कार हे जर्मन मूकाभिनयपटु नुकतेच दिल्लीत आपली कला दाखवून गेले. ते आधी तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी होते व मग मूकाभिनयाकडे वळले. ही कोलांटी उडी नाही का? त्यांचे उत्तर: "मुळीच नाही. विचार करण्याची प्रक्रिया व विचारप्रकटनाची प्रक्रिया या जवळ जवळ सारख्या असतात."

# मुक्ताफळे

## □ मुकी बिचारी...!

" इस्रायल व पाकिस्तान यांच्या निर्मितीमुळे आशियातील सर्व कटकटी सुरू झाल्या आहेत —"

ओळखा पाहू हे कोण बोलले असेल ? स्वा. सावरकर ? अटल बिहारी बाजपेयी ? लोहिया शेठ ? यांपैकी कुणी बोलणेच शक्य नाही ! कारण या सर्वांचा इस्रायल निर्मितीला मुळीच विरोध नाही वा नव्हता. मग हे कोणी म्हटले असेल ? यशवंतरावजी ? स्वर्णसिंगजी ? बाळासाहेब देसाई ? बाबूराव सणस ? छे: छे: या सर्वांचा पाकिस्तान निर्मितीला भरघोस पाठिंबा आहे. मग हे 'नॉनअलाइन्ड्' उद्गार कुणाचे असावेत ? हरलात ! भारताच्या प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांचे हे वचन आहे. एका भाषणात त्यांनी नुकतीच ही जबानी दिली. पाकिस्तानने यामुळे रागावून भारताकडे निषेध नोंदवला आहे. पाकिस्तानचे म्हणणे, इंदिराजींनी असे बोलायला नको होते. आमचे आणि पाकिस्तानचे कधी काळी एखाद्या गोष्टीबाबत जमेल, असे आम्हांस स्वप्नातही वाटले नव्हते; परंतु ही अभद्र घोषणा केल्याबद्दल पाकिस्तानप्रमाणे आम्हांलाही इंदिराजींचा राग आलेला आहे. नासरला बरे वाटावे म्हणून— 'इस्राइलच्या निर्मितीमुळे आशियातील सर्व कटकटी सुरू झाल्या' एवढेच इंदिराजींनी म्हटले असते, तरी काम भागले असते. अरबांना आणि नासरला इस्रायलला नष्ट करायचे आहे; त्याला आपला नैतिक पाठिंबा या वाक्याने जाहीर होऊ शकला असता. परंतु इंदिराजी हे हो काय केलेत ? पाकिस्तान निर्मितीनेही जर आशियात कटकटी सुरू झाल्या हे आपण मान्य केले तर लोक विचारतील,–हे पाकिस्तान कुणी निर्माण केले ? कुणी पोसले ? कायमच्या कटकटी मिटणार असतील तर हे पाकिस्तान नष्ट का करू नये ? छे: छे: हे प्रश्न फार भीषण आहेत. भारत व पाकिस्तान या देशांच्या नवनिर्मात्यांमध्ये आपले पिताजीही आहेत, ही गोष्ट तरी इंदिराजींनी विचारात घ्यायला हवी होती ! इंदिराजी, अहो हे तुम्ही काय बोललात ? तुम्ही हे हो कसे कबूल करून टाकलेत, की पाकिस्तान निर्मिती ही एक चूक होती व ती आमच्या वडिलांनी केली! यामुळे अयूबखानाला राग येणारच ! नासरखानाला खूष करताना अयूबखानला तुम्ही का डिवचलेत ? गेल्या अठरा-वीस वर्षांत पाकिस्तानकडून आपल्याला कैक हजारो निषेध खलिते आले असतील, परंतु त्यांच्या या निषेध खलित्याची दखल इंदिराजींनी घेऊन, " पाकिस्तानचे नाव या भाषणात वार्ताहरांनी नजरचुकीने गोवले " असे जाहीर करणे भाग आहे. कारण असे केले नाही तर भारतातील 'जनसंघा'सारख्या राष्ट्रवाद्यांचे फावणार आहे. इंदिराजींचे हे वाक्य भाषणातून सारखे सांगून 'अखंड हिंदुस्तान'ची घोषणा हे जनसंघवाले लोकप्रिय

करू शकतील. "पाकिस्तान नष्ट करा!" हा नवा घोष देशभर उठेल आणि मागल्या युद्धात ताश्कंद करार करून शास्त्रींनी जे मिळवले, ते इंदिराजी घालवून बसतील. आपल्या भारतावर कोसळणाऱ्या या संकटपरंपरेपासून देशाला वाचवण्याचा एकच मार्ग दिसतो व तो म्हणजे 'पाकिस्तान निर्मितीने आशियात कटकटी सुरू झाल्या' हे विधान आपण केलेलेच नाही, असे पंतप्रधानांनी जाहीर केले पाहिजे. त्याशिवाय हिंदू–जातीयवाद्यांची जिरणार नाही. आमच्या देहाचे तुकडे होतील, भारताचे तुकडे होतील–परंतु पाकिस्तान नष्ट होऊ दिले जाणार नाही, अशी स्पष्ट घोषणा करणारे निधर्मी नेतृत्व ही भारताची आजची गरज आहे! इंदिराजींनी ही पुरी केली नाही तर कोण करणार? "मुकी बिचारी कुणी हाका" यांतली 'मुकी बिचारी' म्हणजे इंदिरा गांधी, असा आरोप मधु लिमये यांनी केला आहे. निदान या वेळी तरी बाईंनी 'मुकी' न राहता स्पष्ट शब्दांत सांगावे--"'पाकिस्तान निर्मितीमुळे कटकटी निर्माण झाल्या'–असे मी म्हटलेच नाही!!"

## □ ऑक्सिजन आणि हैड्रोजन

१७ जून १९६६ रोजी चीनने हैड्रोजन बाँबचा स्फोट केला. नेहमीप्रमाणे देशोदेशींच्या अणुकेंद्रांच्या चालकांनी–" चीन एवढ्या लवकर हैड्रोजन बाँबचा स्फोट करील असे आम्हांस वाटले नव्हते," असे आश्चर्य प्रदर्शित केले व सालाबादप्रमाणे भारताने किंकाळी मारली– "दुष्ट कुठला!" चीनने कितीही हिंसक प्रगती केली तरी भारताने त्याची दखल घेण्याचे मुळीच कारण नाही. अमेरिका, रशिया, इंग्लंड यांनी हैड्रोजन बाँब यापूर्वी फोडलेच होते. यात नवीन ते काय घडले? हा स्फोट हिरोशिमावर टाकलेल्या अणुबाँबपेक्षा पाचपटींनी संहारक होता!! असेना का? शांततेसाठी अणू वापरण्यात आपली बरोबरी करायला चीनला अजून पुष्कळ वर्षे लागतील. प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्ष ना. ग. गोरे (मु. पो. पुणे) यांनी सरकारला याबाबत सुनावले आहे–ती भाषा आणि सावरकरांची 'संन्यस्त खड्गा'तील भाषा यांत आता काही फरकच उरला नाही म्हणजे! सावरकरांनी ३०–३५ वर्षांपूर्वी लिहिले होते, "दंड करण्याची ज्यास शक्ती नाही त्या दुबळ्याच्या क्षमेस शरणागती म्हणतात. दुष्ट शत्रूसही क्षमा करीत राहिले म्हणजे ते आगळिक करणे सोडील अशा वेडगळ आशेवर जे राष्ट्र अवलंबून राहते, ते राष्ट्र त्याच क्षमेला मानभंग समजून अधिकच क्रुद्ध झालेल्या त्याच दुष्ट शत्रूकडून संधी साधताच नायनाट करून टाकले जाते! जगात अहिंसा स्थापू गेले आणि आत्म्याचीच हिंसा करून बसले! एकदेखील लढाई न देता राज्य बुडवून टाकले! ही केवळ क्रोधाची अंध प्रतिक्रिया असेल. आहेच ती तशी! पण ही दलित क्रोधाची प्रतिक्रियाच उन्मादाच्या हत्तीचा अंकुश असते. वाटेल तो मनुष्य वाघाच्या मृगयेस सशाच्या मृगयेसारखा सहज गंमतीने जात नाही. गेल्या चाळीस वर्षांत शस्त्र-संन्या-

सानें आपण जितक्या सात्रूंचे परित्राण आणि जिवांची दु:खापासून सुटका करू शकलो नाही, तितके लोककल्याण शस्त्रधारणेने येत्या चार वर्षांत आपण करू शकू ! शस्त्राला शिवायचे नाही– अणूबाँब करायचा नाही– अशा शपथा घेऊन ज्या राष्ट्रांतील लोक मठामठांतून पडून राहू लागतात–ते संन्यासप्रवण राष्ट्र आज ना उद्या अन्न अन्न करून तडफडू लागलेच पाहिजे, दुबळे झालेच पाहिजे, कोण्या आक्रमक व्याघ्राच्या तीक्ष्ण पंजास बळी पडलेच पाहिजे–"

छे: छे: ना. ग. गोरे यांचा असा अध:पात पाहून आमचे मस्तक सुन्न झाले. हैड्रोजन बाँब तो काय आणि त्याच्यासाठी एवढे अस्वस्थ होण्याचे कारण काय ? शांततेसाठी आपण अणू वापरीत असताना यदाकदाचित् त्या दुष्ट हिंसक चिन्यांनी भारतावर अणुबाँब टाकलाच तर आपला लोकसंख्येचा प्रश्न सुटायला मदतच होणार आहे ! आपला होणारा हा फायदा व वाचणारे अन्न लक्षात घेता, चीन आपल्यावर हा बाँब टाकण्यापूर्वी दहादा विचार करील ही एक गोष्ट आणि त्याहून महत्त्वाची गोष्ट ही की–चीन या अस्त्रांच्या बाबतीत अजून अमेरिकेच्या आठ वर्षे मागे आहे ! चीनला हैड्रोजन हवा असेल तर खुशाल वापरू दे. अमेरिका हा भारताचा ऑक्सिजन आहे ! आपण अनंत वर्षे ऑक्सिजनवर राहू शकतो, हे आपण जगाला दाखवू या !

## □ शंकराचे तांडव

मराठी भाषेत विश्वमोहिनी घालणारे साहित्य का नाही याचे कारण भोपाळ येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. कोलते यांनी सांगितले होते—

साहित्य एका विशिष्ट मर्यादेत, एका विशिष्ट चाकोरीत, एका विशिष्ट समाजात घोटाळत राहिलेले असण्याचा संभव आहे. हरीभाऊंच्या कादंबऱ्या श्रेष्ठ असल्या तरी तत्कालीन मराठी कादंबरीचे स्वरूप केवळ एका समाजातील, एका विशिष्ट वर्गापुरते मर्यादित असल्याचे आपण मानतो, त्या वेळी हाच विचार आपण लक्षात घेत नाही काय ? भारताचे दर्शन घ्यावयाचे म्हणजे केवळ मुंबई, दिल्ली, कलकत्ता, मद्रास, नागपूर या शहरांना भेटी देऊन चालणार नाही. ज्या खेड्यापाड्यांत भारत पसरलेला आहे त्याचे दर्शन घेतले पाहिजे.

मुंबई, पुणे या शहरांत निर्माण होणाऱ्या मराठी साहित्यात बाळंतपणाचा अभ्यास शक्य नाही. कारण शहरी स्त्रिया 'मॅटर्निटी होम'मध्ये बाळंत होतात. हा विश्वमोहक अनुभव घ्यायचा तर कथाकार ग्रामीण हवा ! श्री. शंकर पाटील यांच्या कथेत हे जे विशेष अनुभव आढळतात, तेच श्री. कोलते यांना अभिप्रेत नाहीत का ? हरीभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्यांत पोसलेल्या शहरी टीकाकारांनी व प्राध्यापकांनी श्री. कोलते यांची दृष्टी या बाबतीत स्वीकारावी म्हणजे हे साहित्यातील शंकराचे नवे तांडव त्यांना कळू लागेल–असे आमच्या शहरी बुद्धीस वाटते. –ग्यानबा

## आजची आफ्रिका

झांबियाचे अध्यक्ष डॉ. केनेथ कौंडा यांनी नुकत्याच दिलेल्या भारत-भेटीत जे अनेक विचार प्रकट केले त्यांत आफ्रिका खंडातील सद्य:स्थितीवर प्रकट केलेले विचार विशेष मननीय आहेत. कारण त्यांनी असा गंभीर इशारा दिला, की काही आफ्रिकन देशांत वंश-विद्वेष इतक्या विकोपाला गेला आहे, की सबंध आफ्रिका खंडात त्याच्या विरुद्ध हिंसक उद्रेक निर्माण होण्याचा क्षण येऊन ठेपला आहे.

आफ्रिकन जनतेत आता असंतोषाचा वणवा पेटला आहे आणि घातपात केल्या-खेरीज आपली परिस्थिती सुधारणार नाही अशी आता तिची खात्री झाली आहे. विशेषत: अंगोला, मोझँबिक, ऱ्होडेशिया आणि दक्षिण आफ्रिका या देशांतील शासकांनी वेळीच काय ती काळजी घेतली नाही तर परिस्थिती आटोक्याबाहेर जाईल. आफ्रिकेतील राजकीय परिस्थितीचे एक दु:खदायक वैशिष्टच म्हणजे बहुतेक सर्व आफ्रिकन नेत्यांना परिस्थिती गंभीर असल्याची जाणीव आहे, परंतु येऊ घातलेला समर-प्रसंग टाळण्यास ते समर्थ नाहीत. बडी राष्ट्रे साम्राज्यशाहीला पाठिंबा देऊन आगीत तेल ओतीत आहेत.

पश्चिमेच्या बाबतीत भ्रमनिरास झाल्यामुळे आणि सभोवताली वंश-विद्वेषाचं वातावरण दाटलं असल्यानं आफ्रिकेतील अधिकाधिक स्त्री-पुरुष घातपाती मार्गाने साम्राज्यवादी सरकार उलथून पाडण्यासाठी साम्यवादी देशांची कास धरीत आहेत. ते शिक्षणासाठी रशिया व चीनला जात आहेत, पण त्यांना खरे शिक्षण मिळते ते तात्त्विक युद्धाचे असते. ख्रिश्चन धर्माच्या व पाश्चिमात्त्य संस्कृतीच्या नावाखाली गोऱ्या माणसाने आफ्रिका खंडात वंश-विद्वेषाचेच बीज पेरले. आफ्रिकेच्या सध्यांच्या आणीबाणीच्या परिस्थितीत आशिया विशेष मदत करू शकणार नाही. परंतु आशियाई देशांना, विशेषत: भारताला, आफ्रिकेत अधिकाधिक शिक्षक, डॉक्टर, आणि निरनिराळे तंत्रज्ञ पाठवून शिक्षण-प्रसाराला मदत करणे शक्य आहे.

## □ समस्यारूप मुलांची समस्या

" वाढते मूल हा माझ्या जीवनातला सर्वांत महत्त्वाचा विषय आहे, " असे म्हणणाऱ्या आणि ऑस्लो विश्वविद्यालयाच्या बालविकास विभागाच्या प्रमुख असलेल्या नॉर्वेजियन मानसशास्त्रज्ञ डॉ. सौ. स्कार्ड नुकत्याच दिल्लीमार्गे ऑस्ट्रेलियाला गेल्या. समस्यारूप मुलांची समस्या हा त्यांचा खास विषय आहे. पूर्वी अशा मुलांना नीट वळण लावणे हे आजीबाईंचे काम असे. परंतु वाढत्या नागरीकरणामुळे आणि कुटुंबसंस्था हळूहळू विस्कळीत होऊ लागल्याने अशा मुलांना हाताळण्यासाठी आता तज्ज्ञांची आवश्यकता आहे.

बहुतेक सर्व प्रगत देशांतले जीवनमान समृद्ध झाल्यामुळे तेथल्या जनतेच्या जीवनात नाना प्रकारचे मानसिक दडपणही वाढले आहे, आणि आई-बापांच्या मनावरचे हे दडपण मुलांनाही जाणवू लागले आहे. अशा मुलांची नीट वाढ होण्यासाठी व पुढे त्यांची मनोवृत्ती परिपक्व होण्यासाठी त्यांच्या बालपणीच्या समस्या सोडविणे आवश्यक आहे. मानसिक आरोग्याची महती आता बहुतेक सर्व देशांतील सरकारांना पटलेली असून आता हा विषय पूर्वीप्रमाणे मुख्यत्वे धर्मादाय संस्थांवर टाकण्यात आलेला नाही. " प्रत्येकाला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा पूर्ण विकास करण्याचा अधिकार आहे, हे आता मान्य झाले आहे. "

## □ अमेरिकन संगीत

अमेरिकेतील मिशिगन विश्वविद्यालयातील 'आवाजाचे' प्राध्यापक आणि विश्वविद्यालयाच्या 'मेन्स ग्ली क्लब'चे (पुरुष गायक वृंदाचे) दिग्दर्शक डॉ. ड्यूई आपला वृंद घेऊन नुकतेच दिल्लीला आले होते. तेव्हा म्हणाले की, अमेरिकन संगीतात 'रॉक एन रोल' पेक्षा बऱ्याच इतर गोष्टींचा समावेश होतो पण लोकांना याची फारशी कल्पना नसते. अमेरिकन टूरिस्ट पाहिला, रे पाहिला की उपाहारगृहात, हॉटेलात किंवा ज्या ठिकाणी टूरिस्ट जातात त्या ठिकाणी 'रॉक एन रोल' संगीत मोठमोठ्याने वाजविण्यात येते ही खेदाची गोष्ट आहे. मोठ्याने "वाजविलेले संगीत म्हणजे निव्वळ गोंगाट असतो." अमेरिकन संगीताच्या दर्जाबद्दल लोकांच्या मनात जी विकृत भावना आहे ती समतोल करण्याचे कार्य ग्ली क्लबने अनेक परदेशी दौरे काढून यशस्वीपणे केले आहे. कुठल्याही विद्यार्थ्याला गायक वृंदाचा सभासद होता येते, व दरवर्षी सभासद बदलत जातात, परंतु कार्यक्रमासाठी मात्र 'उत्कृष्ट' गायकांची निवड केली जाते. वृंदात संगीताचे विद्यार्थी आहेतच पण बहुसंख्य सभासद इतर विषयांचे विद्यार्थी असून केवळ संगीताच्या आवडीमुळे त्यांनी वृंदात नाव घातलेले असते.

●

## मन

मन ओढाळ वासरू
बांधा भक्तीच्या दाव्यानी
निग्रहाच्या दावणीला
हरिनाम चारापाणी ॥ १ ॥
मन एक गूढ कोडे
उकलीता ज्ञानी थकले
वाटे सुटले सुटले
परि अधीक गुंतले ॥ २ ॥
मन अथांग अथांग
त्याचा कोणा लागे थांग
पारा हाती धरू जाता
येईल का कधी हाता ॥ ३ ॥
मन कसे रसायन
नाही द्रव नाही घन
मन कशाचे बनले
नाही होत आकलन ॥ ४ ॥
मन चंचल चंचल
जसा भृंगा फुलांवर
नाही एका ठायी स्थिर
धावे मोहा मागे दूर ॥ ५ ॥
मन जहरी जहरी
हृदयासी दास करी
देहात या राहुनिया
देहावर राज्य करी ॥ ६ ॥
मना ऐशा आवरण्या
हरिनाम एक युक्त
त्याचे संगतीने राहे
मन आपुल्या काबूत ॥ ७ ॥
मन ओढाळ वासरू
बांधा भक्तीच्या दाव्यानी
निग्रहाच्या दावणीला
हरिनाम चारापाणी ॥ ८ ॥

—दत्ता खरे

## आज अचानक

आज अचानक कशासाठी
राईचाहि पर्वत व्हावा
एवढ्याशा वाऱ्यानेही
हिमालयाचा तोल जावा ? ॥१॥
मुंगीने मेरू गिळावा
आजच काय घडले असे
उशागती येऊन असा
आजच का मृत्यू बसे ? ॥२॥
पाषाणांना आज अचानक
असा गहिवर का यावा
कधी नव्हे आजच का
समुद्राने पेट घ्यावा ? ॥३॥
ओढ्यालाहि यावी भरती
आज अचानक काय घडले
डोक्यानेच चाले मानव
आजच असे काय नडले ? ॥४॥
आज अचानक काय घडले
गाढवहि वाचे गीता
आजच असा काय म्हणून
पडला आहे असा गोता ? ॥५॥

—माधव थोरात



# आस्वाद :

मन हा कविमनाचा आदी काळापासून चिंतनाचा विषय होऊन राहिला आहे. या मनामुळेच सारे अनर्थ घडतात असे सांगणारे कवीच आपणाला बहुधा भेटतात. मनाला, " मना सज्जना " अशी गोड हाक मारणारे समर्थ रामदास एकंदरीने विरळाच ! दत्ता खरे हे मनाला ओढाळ समजणाऱ्या प्राचीन परंपरेतलेच आहेत. मन हे एक कोडे आहे. ते कशाचे बनले ते कळत नाही. ते चंचल आहे. अशा तक्रारी श्री. खेर यांनी केल्या आहेत. कवितेचा थाट बहिणाबाई चौधरी यांच्या वळणाचा आहे. पहिल्या ओळीत विशेषणांची द्विरुक्ती करून ठसा उमटविण्याची पद्धत बहिणाबाईंची आहे. अर्थात् मन हे कितीही अनिवार असले तरी त्याच्या नियंत्रणाबद्दल कवी निराश झाला नाही. हरिनामाचे चारा-पाणी पुढे ठेवून निग्रहाच्या दावणीला मन बांधता येईल, असा सर्व संतांप्रमाणे खरे यांनी विश्वास प्रकट केला आहे.

कवितेतील उपमा आणि प्रतिमा जुन्या पण नेटक्या असाव्यात. त्यात सांगण्याचा आवेशही दिसावा पण प्रत्यक्ष मात्र हाताला काही लागू नये, असे पुष्कळदा होते. ' आज अचानक ' या कवितेत नेमके हेच झाले आहे. राईचा पर्वत काय किंवा गाढव आणि गीता यांचा संबंध काय, अथवा मुंगीने मेरू गिळणे काय, सारा मसाला जुनाच आहे. परंतु मांडण्यातली पद्धत ताजी वाटते. शिवाय एकदा कवितेच्या ओघात सापडल्यावर वाचकाला पुढे नेण्याचे सामर्थ्य माधव थोरात यांच्या लेखणीत निश्चितच दिसते. पण धारेला लागलेल्या वाचकाने कुठेतरी वर यायला नको काय ? असे ठिकाण या कवितेत सापडत नाही. कवीने विचारलेला प्रश्न वाचक कवीलाही विचारील, की असे काय घडले म्हणून तुम्ही एवढा आकान्त करीत आहात ?

*—गोपीनाथ तळवलकर*



एका हाताने अश्रू पुसत तू सांगितलंस, "मी वाट पाहते." एक विलक्षण भाव-भाबडी आशा तुझ्या डोळयांत तरळली होती. आणि मी तुला वचन दिलं होतं....

माणूस

# आवळी-वेवळी

## अनंत देशमुख

तूच म्हणाला होतास, " हे आर्ट गॅलरीतलं प्रदर्शन संपलं की येणाऱ्या उत्पन्नातून छोटसं घर घेणार !" मलादेखील वाटलं की, चित्रातल्या तुझ्या सुबक रेषांसारखंच तू आपलं घर सुशोभित करशील. समोर छोटीशीच बाग. पुढे तुझ्या मनासारखाच गुलमोहर ! नेहमीच फुलांची बरसात. चिमुकल्या घराला तू ' स्मिता ' म्हणणार होतास. मग मीच गळ घातली. म्हटलं, " 'स्मिता' अहं, 'छाया' ठेवायचं ! कुणाची तरी अनामिक छाया. " कबूल केलंस या शब्दांत : " बरं बरं..."

पण झालं वेगळंच. प्रदर्शनातली तुझी मॉडर्न आर्ट भर्रकन संपली. आणि एका गुजराथी शेटजीने त्याच्या मातेचे पोर्टेट रंगविण्याचे काम तुला देऊ केले. म्हातारी पण खुष झाली. तिनंही पाठपुरावा केला. आणि दोन हजारदेखील हातांत टेकवले. तू सांगितलेस, " मला काश्मीरला जायचं आहे. तिथं काही स्केचेस करायची आहेत. तिकडे मी लवकरच जाणार आहे. दोन-तीन महिन्यांत पोर्ट्रेट तयार होईल. " मग ती म्हातारीची रसरशीत नात की कोण मध्येच म्हणाली, " आपण पण जाणार ना काश्मीरला. पुढच्याच पंधरवड्यात ! फिरायला—" मग ते शेटजीच म्हणाले, " ऐसा करो, तुम भी हमारे साथ आवे. "

आणि तू असाच निघालास...गुजराथी फियाट...म्हणाल तिथं थांबणार. तशात ती तरुण पोर. न जाणो तू मला विसरला आहेस खास ! तिकडे जाऊन तुला पंधरा-वीस दिवस झाले तरी पत्र नाही. ती गुजराथी पोरगी तुझी मैत्रीण झाली असेल, खास. तू एखाद्या झाडाखाली समोरचा ' सीन ' चितारत असणार...आणि ती न विसरता तुला तांबडी-पिवळी सफरचंदे आणून देत असेल...तू सफरचंदाचा घास घेत विचारशील, " इतकी काळजी वाहतेस ?"

शिकाऱ्यातूनदेखील फिरशील...कदाचित् दोघंजण. वरती निळं निळं आकाश; खाली निळं निळं पाणी. शिकाऱ्याचा मालक कुणी हसन असेल...हुक्क्याचा अंदाज घेत तो एखादा शेर म्हणेल–इष्कभरा...मादक, धुंद अर्थ बाहेर पडेल.–बाकी त्याचा तोच व्यवसाय...तुझ्यासारख्या व्हिजिटर्सना–मग तू म्हणशील, " वाहवा, वाहवा

आणखी एखादा..." तल्लीन होऊन तो दुसरा एखादा शेर पेश करील...मध्येच घसा साफ करील...वेडेवाकडं हावभाव करून तिसरा...आणि तू त्या गुजराथी मुलीचा हात–

बद्रीकेदारला जाणाऱ्या आडवाटेवर गाडी थांबवशील...डोंगराळ माग. वळण घेणारा पण चढावाचा रस्ता. मध्येच ओझी वाहून नेणारी गाढवं. पायी जाणारी, तंग तुमान व वर झब्बा घातलेली काश्मीरी खोऱ्यातली माणसं...एखादा 'अँगल्' अजमावशील; आणि मग 'सीन' तयार...ब्रशाचे फटकारे...सिगारेटचा स्वाद... आणि त्या मुलीचा गोड सहवास...

काश्मीरच्या सौंदर्यात तू स्वतःला विसरला असशील. तिथं म्हणे सदा बहर-असतो. गुलाबाचे ताटवे बहरतात. निरनिराळी पांढरी, पिवळी, गुलाबी फुलं उमलतात. केवळ दुसऱ्यांसाठी. स्वार्थ नसतोच मुळी. निर्सगाचे माहेरच ते ! तू सर्वस्व ओतून चितारणार–मग माझी आठवण येतच नसेल मुळी !

सकाळचे धूसर वातावरण...सगळीकडे धुकं पडलं असेल. उबदार ब्लँकेटात देह दाटीनं पहुडत असेल. थंडीची गोडी चाखत ! दुपार येत असेल संथ पावलांनी आणि पुन्हा झोपाळू संध्याकाळ...स्केटिंग करत असशील...

चंद्राच्या निस्तेज प्रकाशात हाऊस बोट किनारा सोडीत असेल...तिथे तू आराम-खुर्चीत पडला असशील. गार वारा लगट करत असेल...सोबत असेल निळ्या गहिऱ्या स्वप्नांची–जी गुलाबासारखी टवटवीत, बर्फासारखी–मुलायम...बुलबुलाच्या धुंद स्वरासारखी...कदाचित् त्या बल्ली विषयाची...

बरं कारे, तू गेलास ना तेव्हा मी बेशुद्धच होते. मध्येच शुद्धीवर येई. तेव्हा मात्र अश्रूंना खंड नव्हता. कळा असह्य होत. बाजूची 'सिस्टर' धीर देई. मग थोडा वेळ जाई...पुन्हा ग्लानी...दुसऱ्या दिवशी डॉक्टरांनी निदान केलं : 'अ‍ॅपेंडिसायटिस.' म्हणाले, "ऑपरेशन करायला हवं !"

...शुद्धीवर आले तो मला स्ट्रेचरवरून नेत होते...ऑपरेशन रूमकडे. निरनिराळी हत्यारं माझ्याकडे बघून विकट हास्य करीत असावीत असं मला वाटलं.–ऑपरेशन आटोपले. नऊ टाके पडले. हे इथे–डाव्या बाजूला. दुखतात रे अजून. जगावंसं वाटत नाही. कदाचित् जगणारही नाही. आशाच नुरली. आणि बरं कारे हा जीव किनाय असाच राहणार. तू येईपर्यंत...मग कदाचित––

× × ×

शशीस,

काही लिहावं सुचत नाही. तुझा विचार आला की कससंच वाटतं. मी तिथून यायला नको होतं. पण तुला आठवते ना; तूच म्हणालीस–अगदी डोळ्यांत पाणी आणून. माझा एक हात आपल्या हातात घेऊन–" ह्या शपथ. माझ्या गळ्याची शपथ ! जाऊन या काश्मीरला. तेवढी संधी आली आहे. माझ्या दुखण्याकडे पाहू

नका; आज ना उद्या बरं होईल. पण तुम्हांला..." ते वाक्य तू तसंच अर्धवट सोडलंस. एका हाताने अश्रू पुसत तू सांगितलंस, " मी वाट पाहते. "–एक विलक्षण भाव, भाबडी आशा तुझ्या डोळ्यांत तरळली होती. आणि मी तुला वचन दिलं होतं...

एक प्रसंग सांगतो. दुपारचे तीन-साडेतीन झाले असतील. मागच्याच गावी आम्ही कोल्ड-ड्रिंक्स् घेतली. स्पीडॉमीटर साठ-सत्तर मैल दाखवत होता. गप्पा चालल्या होत्या. भाई गुजराथीत काही म्हणाले. त्या दोघी खूप हसल्या. मी गप्प होतो. मांडीवर थाप पडली. " नाही आलं लक्षात? लक्ष नव्हतं तुमचं !" " हा !" मी म्हणालो. खरंच, माझं लक्ष नव्हतंच ! मन घुटमळत होते–मुंबईच्या एका डिस्पेन्सरीत...शशीपाशी...तुझाच विचार आणि मी हताश झालो.

रात्रीचे आठ वाजले होते. आम्ही उदेपूरला पोहचलो. कसंतरी डिनर केलं. मग अंथरुणावर कलंडलो. पण झोप कुठली असणार ?–सिगरेट शिलगावत बसलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी नाश्ता केला. बाहेर पडलो. नंतर स्टॅण्ड जोडला. ब्रशाचे फटकारे मारले...आरसे महाल कागदावर उतरू लागला. तास-दीड तासाने रजनी आली. थर्मासमधला चहा ओतत म्हणाली, " इतकी का घाई होती ? चला, चहा घ्या. " मग तिनं दुसरा ग्लास काढला. " तूदेखील घेतला नाहीस ?" मी विस्मयाने पाहिले.

" तुम्हांला कम्पनी द्यायला कुणीतरी हवं ना !"

—मग ती मिठ्ठास हसली...

माझे ब्रशचे फटके पुढेच जात. ती जवळ बसून अतृप्त नजरेनें पाहत राही. कधी 'आऽऽ' म्हणून गोड पावतीही देई...आळीपाळीने चित्राकडे व माझ्याकडे पाही. खूप वेळ ती तशीच बसून राहिली.

आम्ही शहर पाहायला निघालो. ती आता पुष्कळ बोलकी झाली. आपली आई टॉयफॉईडने कशी वारली, मागे वेरूळची ट्रिप कशी छान झाली, वगैरे अगदी मनमोकळेपणाने सांगे. दोन महिन्यांनी तिचा विवाह होणार होता. वाङ्‌निश्चयदेखील झाला होता. भावी पतीबद्दल ती खूप बोलली. मधल्या बोटातली नाजूक आंगठी दाखवून म्हणाली, " वाचा. " 'हिरेश.' लाजलीदेखील. " गाडीत अल्बम आहे. मग दाखवीन हं फोटो !"

—शशी, हे मी " शहा डिस्पेन्सरी "तून लिहितोय. दिल्लीतून. हा डावा हात प्लास्टरमध्ये आहे. (त्यावर तारखेची निळी अक्षरे...) दास भाईंच्या कपाळाला पट्टी आहे. माँ शेजारी बसली आहे. नशीब बलवत्तर तिचं ! हे सारं दिल्लीजवळच घडलं हो ! सारे कसे स्तब्ध आहे. आणि बरं का शशी, रजनीची कॉट–ती–ती मात्र रिकामीच आहे. रिकामी-नेहमीसाठी !

—अजून आठवतात. तिचे निर्मळ, निष्पाप संवाद, हास्य. तिने दाखवलेली आंगठी आठवते ! तो अल्बम अजून तस्साच गाडीत असेल... ●

# शि व से ना

# ४

कुठलीही संघटना किंवा चळवळ निर्माण झाली की तिला नेत्याची उणीव कधी पडत नाही. नेत्यांनाच अनुयायी शोधत फिरावे लागते. शिवसेनेचे उलट आहे. आधीच सांगितल्याप्रमाणे शिवसेना ही संघटना नव्हेच. लोकांच्या क्रोधाच्या, विफल-तेच्या आविष्कारातून निर्माण झालेली ती नेतृत्वहीन चळवळ आहे. चळवळ हा शब्द इथे व्यापक अर्थाने वापरला आहे. ही चळवळ म्हणजे लोकांच्या भावनेचा उद्रेक आहे. श्री. बाळ ठाकरे यांना शिवसेना प्रमुख म्हणून मानले जाते. पण स्वयंभूपणे स्वत:ला शिवसैनिक म्हणवून घेणारे लोकही आहेत. तसेच शिवसेनेवर टीका करणारे पण ! तरीही मराठी माणसावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव होऊन पेटलेले लोक आहेत. तेही चळवळीचाच एक भाग. म्हणूनच ही चळवळ नेतृत्वहीन आहे; किंबहुना ती स्वत:च अजून नेता शोधण्यासाठी धडपडते आहे. जसा नेता मिळेल तशी ही चळवळ वाहत जाणार आहे. प्रचंड शक्ती या चळवळीच्या मागे उभी आहे. ती वापरा-यला अद्याप नेता नाही. ज्याच्या हाती ही शक्ती जाईल तो एकदम वर चढेल. आणि हीच धोक्याची परिस्थिती आहे !

स्वत: श्री. ठाकरेही म्हणतात, " मरगळलेल्या मराठी लोकांमध्ये चैतन्य आणण्याचे काम मी केले. आता आम्हांला मार्गदर्शन हवे......मी काही अजून पुढारी झालो नाही आणि पुढे होण्याचीही इच्छा नाही."

आज श्री. ठाकरे यांच्या भाषणाला महाराष्ट्रात कुठेही प्रचंड गर्दी जमते. लोक जमतात ते ठाकरे यांना पाहायला नव्हे तर त्यांचा विषय ऐकायला. सर्वोच्च नेतृत्वा-साठी लागणारे गुण ठाकऱ्यांकडे आज नाहीत. जबाबदारी पडल्यावर हे गुण कदा-चित येतीलही. त्यांनी फक्त मराठी माणसाच्या मर्मावर अगदी अचूकपणे बोट ठेवले आहे. आणि त्याला उठवले आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या ज्वालाग्राही क्रिये प्रति-क्रियेची त्यांना जाणीव नाही. ज्वाला पेटवणाऱ्या स्फुल्लिंगाचे काम त्यांनी केले.

स्वत: ठाकरे हा पेटता माणूस आहे. पेटतेपणाचा हा त्यांचा गुण त्यांनी आपले पिताजी प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्याकडून उचलला. प्रबोधनकारांनीही

# महाराष्ट्र

# आता केवळ

# इतिहासावर जगू शकणार नाही !

अगदी सत्यशोधक चळवळीपासून आपल्याभोवतीचे वातावरण सतत पेटतच ठेवले. शिवसेनेचीही कल्पना त्यांच्याच डोक्यातली असावी, असे सहज वाटावे इतक्या आवेशाने ते शिवसेनेवर बोलतात. असे मुद्दे मांडतात. श्री. बाळ ठाकरे यांचे वय ४० वर्षांचे आहे. व्यंगचित्रांचा त्यांचा कुंचला मातबर आहे.

श्री. ठाकरे हे सतत शिवसेनेच्या विचाराने झपाटलेले आहेत. एकमार्गी वृत्तीने ते शिवसेनेचे समर्थन करतात आणि शिवसेनेवरील आरोपांना प्रत्यारोपांनी उत्तरे देतात. आपल्या मर्यादित दृष्टिकोनातून ते मराठी माणसाच्या उन्नतीसाठी झटत असतात आणि दक्षिण भारतीयांचा तिरस्कार करीत असतात. परंतु मराठी माणसाविषयीची त्यांची पोटतिडीक विलक्षण आहे. मराठी माणसाचा ते सतत 'माझा मराठी माणूस' म्हणूनच खाजगी संभाषणामध्येदेखील उल्लेख करतात. अडल्या नडलेल्या मराठी माणसाला धंद्यासाठी, नोकरीसाठी मनापासून मदत करीत असतात.

साप्ताहिक 'मार्मिक'ची कचेरी दादरला आहे. पूर्वी श्री. ठाकरे दादरलाच राहत होते. आता त्यांनी कलानगर, वांद्रे येथील आपला बंगला चांगला कलापूर्ण दृष्टीने सजविला आहे. तेथेच त्यांचा स्टुडिओ आहे. आठवडयातील दोन दिवस संपूर्णपणे ते आपल्या स्टुडिओत व्यंगचित्रे काढण्यात घालवतात. शिवसेना काढल्यापासून त्यांना भेटायला येणाऱ्या सर्व थरांतील मंडळींची गर्दी अतोनात वाढली आहे.

मराठी माणसावर होत असलेल्या अनेक तऱ्हेच्या अन्यायांची वेगवेगळी उदाहरणे त्यांच्याकडे आहेत. मराठी लोकांना मीटरचे पैसे भरूनही पाणी न मिळणे आणि झोपडपट्टीवाले 'मद्रासी' पाईपलाईन फोडून बेकायदेशीरपणे पाणी घेतात व पाण्याची नासाडी करतात म्हणून त्यांना नळाची तोटी लावून देणे, दक्षिणी लोकांची बेकायदेशीर दुकाने वर्षोगणती तशीच राहणे आणि मराठी माणसाला दुकानासाठी लायसेन्स न मिळणे, अशी कितीतरी उदाहरणे ते सांगतात.

एखाद्या जातिजमातीविरुद्ध हल्ला करणे ह मानवतावादाच्या दृष्टीने कितपत योग्य आहे असे विचारता ते म्हणतात, "मानवतावादाचा वसा काही फक्त महा-

राष्ट्रानेच घेतलेला नाही. इतरांएवढाच मानवतावाद महाराष्ट्रानेही पाळायला हवा.

**पण हा जातीचा–जमातीचा प्रश्न नव्हेच. हा वृत्तीचा प्रश्न आहे. ज्यांनी घाणेरडया वृत्ती, प्रवृत्ती आमच्याकडे आणल्या त्यांच्याविरुद्धचे आमचे हे बंड आहे."**

मी विचारले, "शिवसेना ही प्रांतीय संकुचित चळवळ आहे, या टीकेवर आपले काय म्हणणे आहे ?"

**ठाकरे :** कमीत कमी महाराष्ट्राला तरी राष्ट्रीयता शिकविण्याच्या भानगडीत कुणी पडू नये. आम्ही सर्वांत कमी प्रांतीय आहोत ! कोणत्याही राष्ट्रीय चळवळीत आम्हीच नेहमीच आघाडीवर असतो. आताचे आधुनिक कार्यक्रमही घ्या. अल्पबचत, कुटुंबनियोजन, अपंग साहाय्य, साक्षरता. प्रत्येक कार्यक्रमात महाराष्ट्राने उच्चांक गाठला. इतर प्रांतांनी दुर्लक्ष केले. महाराष्ट्राने मात्र इमानेइतबारे, निष्ठेने ह्या मोहिमा पार पाडल्या. 'अंग्रेजी हटाव'चा कार्यक्रम फक्त महाराष्ट्राने निष्ठेने डोक्यावर घेतला. बाकीच्यांनी प्रांतीय हित साधायचे आणि महाराष्ट्राने तेवढे नाही ? भारतीय–दक्षिण भारतीय राज्यांची संघटना स्थापण्याचे प्रयत्न काय मोठे राष्ट्रीय आहेत ? एकदा भाषावार प्रांतरचना ठरविल्यानंतर त्या त्या प्रांताने स्वाभिमान बाळगला तर काय हरकत आहे ? आम्हांला आमच्या राज्यात सुखसोयी हव्यात. दुसऱ्यांच्या राज्यात नाहीत ! आमच्या राज्यात आमचा उत्कर्ष हवा. नाहीतर आमचं राज्य काय चाटायचं ? भाषावार प्रांतरचना झाल्यावर हे स्वीकारायलाच हवे. इतर प्रांत तेच करतात. मग आम्ही ते मागायला लागलो तर आमच्यावर प्रांतीयतेचा शिक्का ! प्रांताभिमान हा गुन्हा ठरणार असेल तर आधी प्रांतरचना रद्द करा. सीमा नाहीशा करा. पण १०५ मोहरे मोजल्यानंतर हा विचार मला मूर्खपणाचा वाटतो; म्हणून माझ्यावर होणाऱ्या प्रांतीयतेच्या आरोपाची मला पर्वा नाही.

**प्रश्न :** मराठी माणसाची पीछेहाट होण्यामागे मराठी माणसाचे काही दोष आणि काही प्रवृत्ती कारणीभूत आहेत असे तुम्हांला वाटत नाही का ?

**ठाकरे :** आहेत ना. सध्या एक मोठी मरगळ मराठी समाजात आली आहे. कुणाला एकमेकांबद्दल सहानुभूती नाही. शिवाजी, लोकमान्य टिळक, आगरकर, परांजपे यांच्यासारखे नेते होऊन गेले. त्यांनी राजकारणाबरोबर समाजकारणही केले. पण हल्ली राजकारणावरच जोर जादा. समाजहिताकडे फार कमी लक्ष असते किंवा संपूर्ण दुर्लक्ष असते. प्रत्येक चळवळीचा कुठलातरी पक्ष बांधण्यासाठी उपयोग केला जातो. समाजहिताकडे दुर्लक्ष. कामगारांचे कल्याण करण्यासाठी स्थापन झालेल्या युनियन्स आपापसात भांडतात. त्यांत कामगारहित येते कुठे ? स्थानाकडे लक्ष देऊन काम करण्याची वृत्ती. जातपात, ९६ कुळी, ९२ कुळी यांच्यांतील झगडे. वाट्टेल त्या गोष्टी महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या घडत आहेत.

आमचा पिंडच राजकीय झालेला आहे. आजची मुलंही वर्तमानपत्रातील जाहिराती वाचत नाहीत. एखाद्या जागेसाठी जाहिरात आली तर ती आपल्यासाठी नाहीच हा न्यूनगंड. त्याच न्यूनगंडातून मुलाखत द्यायची. दक्षिण हिंदुस्थानी अधिकारी आपल्या माणसाला कामावर घेताना काही विचार करीत नाहीत. आपले लोक सारासार विचार करीत बसतात. आपले अधिकारी भित्रे, आपले मंत्री भित्रे, आपले सरकारही भित्रे. कमालीचे नैराश्य आलेले. ते घालविण्याचा प्रयत्न कुणी कधी केला नाही. प्रांत सोडून जायला अद्याप आपले लोक तयार नसतात. इतर प्रांतीय मात्र बिचवाचे घर पाठीवर ठेवून हिंडत असतात. तसे अजून आपले झाले नाही. आणि या गोष्टी आपल्या आड येतात. हे नैराश्य आणि भित्रेपणा दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिवसेना तो करीत आहे. आमच्या शिक्षणाचे माध्यम मॅट्रिकपर्यंत मराठी. तिथेही पीछेहाट. उडप्यांचे गुण मी मानतो. एकमेकाला मदत करण्याची वृत्ती, निष्ठा, स्वभाषेचा जाज्वल्य अभिमान—हे त्यांचे गुण आपण उचलायला हवेत. **ही जागृती मराठी समाजात येत्या ५–७ वर्षांत घडायला हवी, नाहीतर तो उद्ध्वस्त होईल.**

**प्रश्न** : कामे करायला योग्य ती माणसे मिळत नाही म्हणून मराठी माणसाची पीछेहाट होते हे खरे काय ?

**ठाकरे** : मुळीच नाही ! आमच्या लोकांची बुद्धिमत्ता दाबून टाकली जाते आहे. माझ्याकडे एक वर्षभर एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज द्या, मी तुम्हांला हरहुन्नरी बुद्धिवान मराठी माणसे देतो. मराठी लोकांची नुसतीच पीछेहाट नव्हे तर जाणून बुजून पद्धतशीर पीछेहाट केली जात आहे. त्याला आमचा विरोध आहे. कोणत्याही मुलाखतीत 'आर यू महाराष्ट्रीयन ?'. हा प्रश्न प्रथम विचारला जातो आणि त्याला डावलले जाते, हे खरे आहे.

**प्रश्न** : आत्ताच तुम्ही सांगितलेले मराठी लोकांचे दोष घालविण्यासाठी शिवसेनेने काय केले ?

**ठाकरे** : शिवसेनेने मराठी माणसांत आपल्या हिताबद्दल जागृती निर्माण केली आणि प्रचंड चैतन्य निर्माण केले हे आम्ही आमचे मोठे कार्य मानतो. मराठी माणसाची आम्ही एकजूट बांधली.

**प्रश्न** : त्यासाठी तुम्ही कोणते विधायक कार्यक्रम हाती घेतले आहेत ?

**ठाकरे** : जाग-आणणे, एकजूट बांधणे हेच मोठे विधायक कार्य आहे. राज्यकर्त्यांपासून तो खालच्या पातळीपर्यंत सर्व टीकाकारांना हे पटले आहे. माझा मार्ग चुकीचा असला तर सांगा. तो मार्ग कोणता हवा हे सांगा. आम्हांला मार्गदर्शन हवे आहे. पण कुणीही करीत नाही. आणि आम्हांला योग्य मार्ग वापरण्याविषयी सांगणाऱ्यांना मी विचारतो—घेरा डालो, बंद, हे काय योग्य मार्ग आहेत ? कलकत्ता, भावनगर, येथे जे घडते ते योग्य मार्ग आहेत ? त्यांना कुणी का सांगत नाहीत ? आम्हांलाच योग्य मार्ग सांगायला लोक उठतात, याचा अर्थ कुणाच्या तरी मुळावर शिवसेना

आहे म्हणून ती बदनाम करायची. एस्. एम्. ना धादांत खोटे बोलण्याची पाळी येते ती यामुळेच.

**प्रश्न :** शिवसेनेच्या हिंसक चाळयांबद्दल बरेच बोलले जाते. आपले काय म्हणणे आहे ?

**ठाकरे :** शिवसेनाविरोधकांच्या गैरप्रचाराचा तो एक भाग आहे.

आणि मला पुढे असे म्हणायचे आहे, गांधींनी स्वराज्य मिळविण्यासाठी आदेश दिला होता, " डू ऑर डाय ! " विधायक मार्गांनी चळवळ न्यावी असे सांगणाऱ्यांनी मला याचा अर्थ सांगावा. 'डू' म्हणजे काय आणि 'डाय' म्हणजे काय ? मी स्वतःला गांधीवादी समजत नाही. पण गांधींकडूनदेखील जेव्हा अशी वाक्ये बाहेर पडतात तेव्हा त्यांच्या तोंडी वेदना बोलत असते, आणि तीच ' मराठी वेदना ' मी बोलतो आहे. अजून तरी 'डू ऑर डाय' सारखे शब्द मी काढले नाहीत. ' बंद ' कार्यक्रमाच्या वेळी मारामाऱ्या होतातच ना ? 'घेराओ 'च्या वेळी होतातच ना ? विधायक हे शब्द नुसते झुलविण्याचे आहेत.

**प्रश्न :** पण म्हणून प्रचारात एवढा त्वेष नि आवेष हवा ?

**ठाकरे :** मला गोड गोड बोलून लोकांच्या मनावर नुसते ठसे उमटवायचे नाहीत. ही आग आहे. आणि ती प्रत्येकाच्या मनात पेटली पाहिजे. सर्द आगपेटीने रान पेटू शकत नाही, तसं सर्द विचारांनी मन पेटू शकत नाही. त्यासाठी मर्द मनच हवं. शक्य तो सभ्य मार्गांनी, नाहीतर रस्त्यावरपण कसेही करून आम्हांला आमचे प्रश्न सोडविले पाहिजेत.

आणि उद्या या लढ्याला वाईट वळण लागलं तर त्याची जबाबदारी सरकार आणि विरोधी पक्षीयांवर व इतर प्रांतीयांवर राहील. शिवसेना, ठाकरे किंवा मराठी माणसावर ती राहणार नाही !

**प्रश्न :** शिवसेनेचा कम्युनिस्टविरोध गेल्या निवडणुकीत जाहीर झाला. कम्युनिस्टांनाच विरोध का ?

**ठाकरे :** मी मूळचा कलावंत आहे. कोणत्याही पक्षाचा मी नाही. **व्यक्तिस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य हे मानवाचे मूलभूत हक्क टिकायला हवेत असे मला मनापासून वाटते.** कम्युनिस्ट सत्तेवर आल्यावर कुणाचा आवाज बाहेर निघणार नाही. म्हणून कम्युनिस्टांना माझा मूलभूत विरोध आहे ! हे कम्युनिस्ट महा खुनशी आणि घातक असतात. कम्युनिस्ट राज्यावर असते तर त्यांनी शिवसेनेचा आवाज केव्हाच चिरडून टाकला असता. पास्तरनाक, स्वेटलाना ही प्रकरणे काय सांगतात ? स्टालिन कन्येला आपल्या मायभूमीत बोलता येऊ नये हे कोणते व्यक्तिस्वातंत्र्य ? शेवटी तिला अमेरिकेत जाऊन बोलावे लागले. नेमका याच गोष्टीसाठी माझा कम्युनिझमला विरोध आहे. स्वेटलाना तर शिवसैनिक नव्हती ना ?

आणि विचारांची बैठक पक्की असल्याशिवाय जनता मागे येत नाही. आमचा विचार पक्का आहे. आमचं संधिसाधू राजकारण असतं तर जनतेचा एवढा उत्स्फूर्त पाठिंबा आम्हांला मिळालाच नसता. गेली चाळीस वर्षे कामगारांना पढवून पढवूनसुद्धा काही महिन्यांपूर्वी जन्माला आलेल्या शिवसेनेने त्यांच्या एकीला तडा दिलाच की नाही ? इथेच लालभाईंचे पितळ उघडे पडते. ही जागा महाराष्ट्रात आणि मराठी माणसांत सतत टिकली पाहिजे. दोनदा आम्ही मेननला पाडलं ते यामुळंच.

आणि कम्युनिस्टविरोध हे आम्ही आमचं मोठं राष्ट्रकार्य मानतो. महाराष्ट्रातील कितीतरी तरुणांना कम्युनिस्टांच्या जाळ्यात जाण्यापासून आम्ही वाचवलं.

**प्रश्न :** तुमच्या चळवळीसाठी तुम्ही शिवाजीचे नाव वापरून त्याच्यावर प्रांतीयतेचा शिक्का बसवीत नाही काय ?

**ठाकरे :** शिवाजीबद्दल मराठी माणसाला जसा आदर आहे तेवढा किती परप्रांतीयांना आदर आहे, हे आधी सिद्ध झाले पाहिजे. शिवाजी महाराजांची राष्ट्रपुरुष म्हणून पूजा केली जाते ती महाराष्ट्रातच. शिवाजी महाराज जर खऱ्याखुऱ्या अर्थाने राष्ट्रपुरुष समजले गेले असते तर मद्रास आणि केरळमध्येसुद्धा शिवाजी जयंत्या झाल्या असत्या. इतकेच काय पण यशवंतराव चव्हाण नसते तर भारताच्या राजधानीतसुद्धा शिवाजी जयंती झाली नसती. मग राष्ट्रपुरुषाच्या गमजा आम्ही का म्हणून माराव्यात ? मराठी माणसाला खच्ची करण्यासाठी किंवा त्याचा आवाज दडपण्यासाठी तसे सांगितले जाते. आम्ही शिवाजीचा अभिमान बाळगला तर आम्ही प्रांतीय का ठरतो ? ते आमचे दैवत आहे, स्फूर्तिस्थान आहे आणि आशास्थान आहे. त्यांचा रास्त अभिमान आम्ही बाळगणारच. मग कुणी काहीही म्हणो ! पण त्याचबरोबर आम्ही हेही जाणून आहोत, की महाराष्ट्र आता केवळ इतिहासावर जगू शकणार नाही. त्याला आता हातपाय हलवायलाच हवेत.

**प्रश्न :** शंकराचार्य केरळी म्हणून त्यांचे देऊळही उभारू नये येथपर्यंत दक्षिण भारतीयांविरुद्धच्या विरोधाची मजल का जावी ?

**ठाकरे :** देवळाला तसा मुळीच विरोध नाही. या लोकांना शंकराचार्यांबद्दल खरोखरच काही वाटत असेल तर ठीक आहे. पण ही जात महा आक्रमक आहे. पिराचा पांढरा धोंडा टाकून त्यावर मशीद उभारणे असा प्रकार नको. देवळाचे पावित्र्य राखायलाच हवे. आमचा मुळीच विरोध नाही. पण त्यांच्या आक्रमक वृत्तीमुळेच हे कटू काम आम्हांला करावे लागते. देऊळ हे एका जमातीचे नसावे. विठोबाच्या मंदिरावर बडव्यांची मक्तेदारी नको असे आम्हांला वाटते. ते देऊळ नुसते केरळी शंकराचार्यांचे नको. पुढे त्याचे आमच्या देवळांवर आक्रमण नको.

आणि पुन्हा एक मुद्दा असा आहे : आम्ही शंकराचार्यांचे देऊळ उभारावे. आपण होऊन आमच्या वसाहतींना टागोर नगर, नेहरू नगर अशी नावे द्यावीत, आमच्या विद्यापीठांमधून टागोर भाषणमाला सुरू कराव्यात; आणि कलकत्यात टिळकांच्या

पुतळ्याला जागा मिळू नये हे कोणते राष्ट्रीयत्व ? कलकत्याला शेवटी किर्लोस्करांना स्वखर्चाने टिळकांचा अर्ध पुतळा उभारावा लागला ना ?

आणि जे लोक आमच्यात मिसळत नाहीत, उलट आम्हांला खालीच पाहतात त्यांना आम्ही आपले कसे म्हणायचे ? बर्वे गेल्यावर पेढे वाटणारे आणि आनंदाने एकमेकांना मिठ्या मारून हर्षाच्या आरोळ्या ठोकणाऱ्या नराधमांना आम्ही काय घटनेचे १९ (१) कलम नजरेसमोर धरून राष्ट्रवादी मिठी मारायची ?

**आम्हांला मराठी-अमराठी हा वाद खरोखरच नको.** पण या वृत्तीला काय म्हणाल ? वादाची बीजे कोण पेरतो, हे तरी न्यायी वृत्तीने पाहाल की नाही ? शिवसेनेला संकुचित वृत्तीची, जातीयतेचे विष फैलावणारी चळवळ असे समजणाऱ्या मराठी विरोधकांनी हे जवळून पाहिले तर ते नक्कीच बदलतील.

पुन्हा सांगतो, शिवसेनेचं जर काही चुकत असेल तर जरूर टीका करा. काय करायचं ते सांगा. पण कृपा करून निंदानालस्ती करू नका. शिव्यांना काहीतरी अर्थ हवा. टीकेमुळे मला काही मार्गदर्शन व्हायला हवं. शिवसेनेत गुंड आहेत असे लोक म्हणतात. या लोकांनी गुंडांना सुधारण्यासाठी काय केलं ? शिवसेनेने त्यांच्या-साठी काय केलं हे या लोकांनी पाहिलं आहे का ? आम्ही अनेक बेकार गुंड मुलांना सुधारलं. चांगल्या मार्गाला लावलं हा आमचा दोष काय ? स्वतः मुलं सांगतात, शिवसेनेमुळे आम्ही सुधारलो. बाप सांगतो मुलगा सुधारला. इकडे कुणी लक्ष दिले आहे ?

श्री. ठाकरे यांचा सरकारवरही रोष आहे. महाराष्ट्र सरकारचे मंत्री केंद्र सरकारच्या मर्जीकडे नजर ठेवून गोड गोड बोलतात. इतर प्रांतीय लोक मात्र तसे कधी करीत नाहीत. कन्नडसभेचे म्हैसुरात वाटेल ते चाळे चालले तरी ते निजलिंगप्पा खपवून घेतात. स्टेटमेंट काढीत नाहीत. बेळगावात मराठी जनतेवर अत्याचार झाले तरी आमचे मुख्यमंत्री गप्प ! इथे शिवसेनेने कोणत्याही दुकानावर हल्ला न करता निजलिंगप्पा आरडाओरडा करतात. हे असे का असे ते विचारतात.

शिवसेनेचा सारा जोर मुंबईतच आहे. आणि तोही मुंबईतील दादर, डोंबिवली, कल्याण, ठाणे अशा मराठी वस्तीतच. शिवसेनेने आपली ध्येयधोरणे न बदलता ती तशीच चालू ठेवली तर एक तर हळूहळू ती कदाचित विरूनही जाईल किंवा वेगळेच रूप धारण करील. शिवसेना मुंबई कॉर्पोरेशनच्या येत्या निवडणुकीत उतर-णार असल्याचे आधीच जाहीर झाले आहे. मराठी वस्तीतील बहुतेक जागा शिव-सेना मिळवील एवढा जोर तिला नक्की आहे. महापालिका ताब्यात आल्याशिवाय मुंबईतील मराठी माणसाची पीछेहाट थांबणार नाही, असे ठाकरे यांचे म्हणणे आहे.

## स मा प्त

पुस्तके

# अघळपघळ तरी श्रवणीय

“ संसाराचं क्षेत्र तें केवढं आणि त्यात गृहिणीला येणाऱ्या प्रचीती त्या काय असणार ? पण ज्या आल्या त्या **मनाला जाणवल्या** म्हणून त्या इतरांना सांगण्याचा हा गोष्टीवेल्हाळपणा. ”

आपल्या पुस्तकातल्या ‘ ऋणनिर्देशा ’च्या सुरुवातीला लेखिकेने आपली भूमिका ही अशी सांगून टाकली आहे. संसारी, सुशिक्षित आणि प्रतिष्ठित घरातल्या एका गृहिणीला आलेल्या ‘ प्रचीतीं ’बद्दलचे हे ‘ बोलणे ’ आहे.

या ‘ प्रचीती ’ अनेक विषयांबद्दलच्या आहेत. विद्यार्थिदशेत जिव्हाळ्याने एकत्र आलेले, सांसारिक आयुष्यात दाही दिशा पांगलेले पण पुन्हा वृद्धत्वात एका नव्याच जिव्हाळ्याने भेटणारे सहकारी; लग्नांना येणारी आग्रहाची निमंत्रणे, लग्नस्थळी जाताना करावा लागणारा आटापिटा, जेवणाच्या पंक्तींत जागा मिळवण्यासाठी करावी लागणारी चतुराई, स्वयंपाकघरातले अनेक कामांनी आणि वस्तूंनी व्यापलेले ‘ डायनिंग टेबल, ’ अत्याधुनिक विचारसरणी आणि राहणी यांत पारंगत असलेल्या चिमुकल्या शिक्षकांपासून घ्यावे लागणारे मूल्यांचे प्रौढ शिक्षण असे रोजच्या आयुष्यातले विविध विषय मुक्ताबाईंनी हाताळले आहेत.

---

हे तो प्रचीतीचे बोलणे
**सौ. मुक्ताबाई दीक्षित**
**इंटरनॅशनल पब्लिशिंग सर्व्हिस, पुणे ४**

तसेच आपल्या दैनंदिन आयुष्यावर अकल्पितपणे कोसळलेला एक आघात–पानशेत–ह्याचेही सविस्तर वर्णन मुक्ताबाईंनी केले आहे. पानशेतच्या पुरात ‘इंटरनॅशनल’ पूर्णपणे उद्‌ध्वस्त झाले, श्री. विठ्ठलराव दीक्षित आणि त्यांचे एकनिष्ठ सहकारी यांचे प्राण दैवयोगानेच वाचले. प्राण वाचले पण भविष्यकाळ शून्य दिसू लागला. अशा प्रसंगी अनेक देशी–परदेशी व्यक्तींनी आणि संस्थांनी हात पुढे करून हे’ ‘नेहरूंचे दुकान’ पुन्हा उभे केले–या सर्वांचे तपशीलवार वर्णन आपल्याला ‘हाहा:कार इत्यादी तीन प्रकरणांत वाचायला मिळते.

पण पानशेत हा काही (सुदैवाने) दैनंदिन अनुभव नव्हे. मुक्ताबाईंनी ज्या प्रचीतींबद्दलचे बोलणे केले आहे त्या दैनंदिन जीवनातल्या आहेत. त्या प्रचीतींची उदाहरणे वर दिलीच आहेत. या प्रचीती साध्याच आहेत, त्यांबद्दलची मुक्ताबाईंची भूमिकाही साधीच आहे. साध्याही विषयांतला मोठा आशय आपल्याला सापडला आहे, असा आत्मगौरवपूर्ण डंका त्यांनी पिटलेला नाही.

या प्रचीतींचे वर्णन वाचनीय होते ते त्यांत मधूनमधून सापडणाऱ्या सूक्ष्म हलक्याफुलक्या विनोदांनी, त्यांतल्या परिहास-रमणीयतेमुळे ! या विनोदी वचनांची काही उदाहरणे देण्याचा मोह आवरता येऊ नये इतकी ती हृद्य आहेत.

> *“ वितरति गुरुः प्राज्ञे विद्यां यथैव तथा जडे ” या सुभाषिताचा आधार असल्यामुळं प्राज्ञ मंडळींच्या इतक्याच मोकळ्या मनानं मी त्या कॉलेजच्या वर्गातून वावरले. ”*
>
> *“ ‘ वादे वादे जायते तत्त्वबोधः ’ हे वचन खरं असतं तर आमच्या घरांतून तत्त्वबोधाचे ग्रंथराज बाहेर पडले असते । ”*
>
> *“ आमच्या घरी......जन्माला येतो तो, हातापायांबरोबरच मतंही घेऊन येतो आणि बोलायला यायचा अवकाश, आधी मत सांगतो । ( कदाचित् हा सार्वत्रिक मतदानपद्धतींचाही परिणाम असेल । ) ”*
>
> “ Heard melodies are sweet, but those unheard are sweeter. *या काव्यपंक्तींचा मला वेगळ्या अर्थानं प्रत्यय येतो । ऐकलेली गाणी तर गोड असतातच, पण न ऐकलेली मला जास्तच गोड वाटतात. कारण त्यांनी माझा वेळ घेतलेला नसतो । ”*

मुक्ताबाईंची ही प्रचीतींची बोलणी ऐकताना कदाचित् त्यांतल्या अघळपघळपणामुळे अगर खाजगी तपशीलांमुळे कंटाळा येऊ लागला तरीही हे असे खुमासदार विनोद त्यांत वारंवार येत असल्यामुळे ती पुढे ऐकत राहण्याची उत्सुकता कायम राहते किंवा “ भविष्यकाळ संपुष्टात येऊ लागला की सगळीच गुपितं उघडी पडतात ! ” “ गृहिणींच्या राज्यात विजापूर गोलघुमटापेक्षा किसणीकरताच जास्त

प्रसिद्ध आहे !" अशी वाक्येही वाचकाला आकर्षक वाटतील. माझे 'डायनिंग टेबल' किंवा 'लग्नाला जाते मी' किंवा 'प्रौढ शिक्षणाचे वर्ग' यांत शेवटी शेवटी आलेला नाजुक भावनांचा शिडकावा हवाहवासा वाटणारा आहे.

हे सारे प्रचीतीबद्दलचे बोलणे अघळपघळ वाटले तरी श्रवणीय वाटते हे आतापर्यंत सांगितलेच. आणि साध्याच जीवनातल्या साध्याच अनुभवांबद्दलचे हे लिखाण आहे, अशी लेखिकेनेच दिलेली कबुलीही आपण पाहिली.

पण पानशेत प्रकरणातल्या 'योगक्षेमं वहाम्यहम्' या लेखात लेखिकेने आपल्य जीवनातल्या आणखीही काही विशेषांचा उल्लेख केलेला आहे. देवाने आपल्याला बौद्धिक, कलात्मक, वाङमयीन, प्रीतिपूर्ण, आध्यात्मिक या साऱ्या जीवनप्रकारांचे मिश्रण बहाल केले आहे, असे त्या आपल्याला सांगतात. जे. कृष्णमूर्तींसारख्या महापुरुषाच्या शिकवणीमुळे त्यांच्या डोक्यातल्या उलटयापालटया विचारांची कोळिष्टके झडली असल्याचे त्या लिहितात.


सुशिक्षित स्त्रीच्या डोक्यात उलटयापालटया विचारांची कोळिष्टके असणे, त्यांनी डोके सुन्न होणे आणि एका तत्त्वचिन्तकाच्या शिकवणीमुळे ती कोळिष्टके झडून जाणे हा एक केवढा तरी विदारक, तरीही समृद्ध असलेला अनुभव आहे ! सर्वंच जीवन व्यापणारा अनुभव आहे तो ! मुक्ताबाईंनी आपल्या बहुविध जीवनातील अशा अनुभवांची प्रचीती आम्हांला द्यावी, अशी त्यांच्याकडून अपेक्षा केल्यास ती गैरवाजवी ठरू नये !

**—सरिता पदकी**

## □ तपाची वाटचाल

पुणे येथील राणी लक्ष्मी मंडळाने १८ जून १९६७ रोजी आपले प्रगतिपथावरील एक तप पूर्ण केले. रणरागिणी लक्ष्मीराणीसाहेबांच्या पुण्यतिथीच्या या दिवशी मंडळाला साहाय्यभूत झालेल्या काही वयोवृद्ध विद्वान मंडळींचा गौरव महापौर श्री. कारले गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला.

याच वेळी एक स्मरणिकेचंही प्रकाशन महापौरांच्या हस्ते झालं. यातील निवेदनानं राणी लक्ष्मी मंडळाच्या निरनिराळया उपक्रमांची ओळख करून दिली आहे. बालकमंदिर, प्राथमिक शाळा, वाचनालय, थेऊर येथील विश्रांतिधाम, पानशेत प्रलयाचे वेळी चालवलेले सामुदायिक भोजनगृह व संरक्षणनिधी या व यांसारख्या अनेक कामांत मंडळान पुढाकार घेतला आहे. कै. स्वातंत्र्यवीर सावरकर, कै. तात्यासाहेब करंदीकर यांजपासून स्फूर्ती घेतलेल्या या मंडळाने बालक मंदिरासाठी इमारतीची योजना आता हाती घेतली आहे.



# ५

१८९३ च्या उत्तरार्धात लेनिन समारा सोडून सेंट पीटर्सबर्ग येथे राहावयास गेला.

या सुमारास साऱ्या रशियाभर औद्योगीकरणाला जोराने चालना मिळालेली होती. प्रत्येक लहानमोठ्या शहरामध्ये नवनवे कारखाने उभारले जात होते आणि शेतकरीवर्ग आपल्या जमिनी सोडून देऊन कामगार होण्यासाठी कारखान्यांच्या आवारामध्ये प्रवेश करीत होता. या कामगार-वर्गाला आपल्या अधिकारांची जाणीव करून देण्यासाठी पीटर्सबर्गसारखा मोठ्या शहरांमध्ये सोशल डेमोक्रॅटिक पक्ष कामाला लागला होता; अर्थात झारशाहीच्या निर्बंधांमुळे या पक्षाला आपले कार्य उघड रीतीने करता येण्यासारखे नव्हते. 'एल्डर्स' या नावाने हा पक्ष ओळखला जात असे. 'एल्डर्स'चे कार्यकर्ते गुप्त बैठका घेऊन मार्क्सच्या कम्युनिस्ट जाहीरनाम्याचा अभ्यास करीत. हे सारेच कार्य पोलिसांच्या हाती न लागता करावे लागत असल्यामुळे हा पक्ष इच्छा असूनही सर्वसामान्य कामगारांपर्यंत पोचू शकत नव्हता.

लेनिन पीटर्सबर्गला आल्यानंतर 'एल्डर्स' गटात दाखल झाला. परंतु 'एल्डर्स'चे कार्य इतक्या मर्यादित स्वरूपाचे होते, की ते लेनिनच्या प्रकृतीशी जुळण्यासारखे नव्हते. आपली चळवळ मूठभर कामगार कार्यकर्त्यांपुरती मर्यादित न ठेवता तिला

# व्होल्गा जेव्हा लाल होते

## वि. स. वाळिंबे

जनता-लढयाचे स्वरूप प्राप्त करून दिले पाहिजे, असे तो पक्ष बैठकीत प्रतिपादन करू लागला. पक्षाच्या जुन्या सदस्यांना लेनिनचे विचार जहाल वाटत होते व त्यामुळे ते लेनिनला विरोध करू लागले. परंतु या जुन्या सभासदांच्या मानाने लेनिनचे व्यक्तिमत्त्व इतके प्रभावी होते, की अवघ्या दोन वर्षांच्या आतच त्याने आपल्या विरोधकांना बाजूस सारून पीटर्सबर्गमधल्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची सूत्रे स्वतः-कडे घेतली.

'एल्डर्स 'चा नवा तडफदार नेता म्हणून लेनिन पीटर्सबर्गमध्ये ओळखला जाऊ लागला. १८९५ मध्ये त्याने कामगारांना उद्देशून आपले पहिले आवाहन लिहून काढले. या वेळी पक्षाजवळ पुरेसा पैसा नसल्यामुळे या पत्रकाच्या चार हस्तलिखित प्रती तयार करण्यात आल्या व त्या कामगार कार्यकर्त्यांना देण्यात आल्या. कामगार संघटनेचे अंतिम उद्दिष्ट कोणते असले पाहिजे याचा या पत्रकात लेनिनने ऊहापोह केला होता. त्याचे हे पहिले वहिले हस्तलिखित पत्रक बरेच गाजले. त्यानंतर पक्षाचा व्याप जसजसा वाढू लागला तेव्हा लेनिनची पत्रके छापून घेण्याची व्यवस्था करण्यात आली.

पीटर्सबर्गमधील कामगारवर्गात लेनिन मार्क्सवादाचा प्रचार करीत आहे ही गोष्ट झारच्या अधिकारीवर्गाला माहीत नव्हती असे नाही; परंतु प्रारंभी ते या कार्याकडे उपेक्षेनेच पाहत होते. पोलिसखात्याचा प्रमुख व्होलीऑन्स्की याचे त्या वेळचे उद्गार प्रसिद्धच आहेत—' हे मूठभर लोक कितीही गाजावाजा करोत. यांच्या हातून पन्नास वर्षांतदेखील काही व्हायचं नाही,' असे तो नेहमी म्हणत असे. त्या काळी सरकारला भीती वाटत होती ती 'जनतेच्छा ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या दहशतवादी गटाची ! कारण त्या गटाचे कार्यकर्ते इतक्या अतिरेकी विचारसरणीचे होते की ते केव्हा कोणाचा खून करतील याची शाश्वती नव्हती. त्यांच्या मानाने सरकारला सोशल डेमोक्रॅटस् अगदीच मवाळ वाटत. त्यामुळे सरकारी अधिकाऱ्यांचा तर असा

प्रयत्न असे की, कामगारजगतात सोशल डेमोक्रॅटस्‌चा जेवढा प्रभाव वाढेल तेवढा वाढू द्यावा. कारण तेवढ्या प्रमाणात तरी कामगारवर्ग दहशतवादी गटापासून दूर जाईल. सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या वतीने प्रसिद्ध होणाऱ्या वाङमयात कामगार चळवळीची निव्वळ शास्त्रीय चर्चा असे. त्यामुळे अशा वाङमयातून क्रांतीचा स्फोट होण्याची झारनिष्ठांना मुळीच शक्यता वाटत नव्हती. परिणामतः प्लेखानोव्हचे 'ॲन आउटलाईन ऑफ दि मोनिस्टिक कन्सेप्शन ऑफ हिस्टरी' व पीटर स्ट्रूव्हचा 'क्रिटिकल नोटस ऑन दि इकॉनॉमिक डेव्हलपमेंट ऑफ रशिया' हे दोन्ही ग्रंथ रशियात उघड रीतीने प्रसिद्ध होऊ शकले. प्लेखानोव्हच्या ग्रंथांत तर वर्गयुद्ध अटळ आहे असे प्रतिपादन करण्यात आले होते, तरीही सरकारला तो ग्रंथ आक्षेपार्ह वाटला नाही.

१८९४ च्या नाताळमध्ये सेंट पीटर्सबर्गच्या उपनगरात सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची बैठक भरलेली असताना लेनिनने या दोन्ही ग्रंथांवरील आपले निबंध वाचून दाखविले. त्याने आपल्या या निबंधात प्लेखानोव्हच्या ग्रंथाची मनसोक्त स्तुती केली तर स्ट्रूव्हचे प्रतिपादन मार्क्सवादाशी विसंगत असल्याचे दाखवून देऊन त्याच्यावर टीकेचा भडिमार केला.

अलेक्झांडर पोट्रेसॉव्हची आणि लेनिनची ओळख झाली ती या बैठकीच्या वेळीच. या पहिल्या भेटीचे वर्णन पोट्रेसॉव्हने आपल्या आठवणीत लिहून ठेवले आहे. पोट्रेसॉव्ह लिहितो—'लेनिनशी ओळख झाल्याचा तो दिवस अद्यापही मला चांगला आठवतो. कोणत्याही विषयाच्या तळापर्यंत जाऊ शकणाऱ्या कुशाग्र बुद्धिमत्तेचे देणे या पुरुषाला लाभले असल्याचे मला त्या पहिल्या भेटीतच जाणवले. मी मनाशी म्हटले, लेनिन ही केवळ अभ्यासू व्यक्ती न राहता लवकरच प्रभावी शक्ती ठरणार आहे....त्याचा चेहरा नेहमीच थकल्यासारखा भासे. वयाची पंचविशीही न गाठलेल्या लेनिनला चांगलेच टक्कल पडले होते. तसे थोडेसे तुरळक केस डोक्यावर रेंगाळत होते. पण अगदी तुरळकच! लालसर रंगाची दाढी त्याच्या चेहऱ्याच्या उग्रतेत भर घालत होती. हा माणूस अवघ्या चोवीस वर्षांचा आहे हे सांगूनही पटत नव्हते. थोडक्यात सांगायचे तर त्या बैठकीत लेनिनच्या रूपाने अकाली प्रौढ झालेला मनीषीच आपल्याला भेटला असे मला वाटले. तो बोलावयास उठला की त्याचे बुद्धिवैभव अधिकच उठून दिसे. तसा त्याचा आवाज मुळीच मुलायम नव्हता. उलट त्यात एक प्रकारची खर होती. परंतु तरीही आंतरिक तळमळीमुळे त्याचे वक्तृत्व कमालीचे प्रभावी वाटे.

हे केवळ पोट्रेसॉव्हचे एकट्याचेच मत होते असे नव्हे! लेनिनच्या त्या वेळच्या इतर सहकाऱ्यांनीही पोट्रेसॉव्हसारखेच आपले मत असल्याचे नमूद केले आहे. 'लेनिन जन्मतःच म्हातारा असावा' असे त्याचे मित्र गंमतीने म्हणत असत. कारण तो नेहमीच गंभीर दिसायचा. तरुण वयाला साजेशी अवखळ, स्वच्छंदी वृत्ती लेनिनला

कधीच मानवली नाही. पीटर्सबर्गमधील सोशल डेमोक्रॅटिक पक्षात दाखल झाल्यापासून लेनिन अशा काही तडफने काम करीत असे की, त्याचा उत्साह पाहून मित्रमंडळी अक्षरश: आश्चर्यचकित होऊन जात. या कार्यव्यग्रतेचा लेनिनच्या शरीरप्रकृतीवर परिणाम होऊन १८९५ च्या प्रारंभी त्याला न्युमोनियाने पछाडले. न्युमोनियाचा प्रारंभीचा जोर कमी झाल्यानंतर तो वैद्यकीय उपचारांसाठी परदेशी रवाना झाला.

२ मे रोजी साल्झबर्ग येथून आपल्या आईला लिहिलेल्या पत्रात लेनिन म्हणतो, 'दोन दिवसांच्या प्रवासानंतर मी येथे येऊन पोचलो. येथे आल्यापासून मी जर्मन भाषा शिकण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु अजून तरी त्या भाषेशी जानपहचान होऊ शकली नाही. जर्मन भाषेतले अगदी साधेसुधे शब्दही मला कळत नाहीत. एक तर जर्मन शब्दांचे उच्चार अतिशय अवघड आहेत. दुसरी गोष्ट अशी की जर्मन लोक इतक्या भराभर बोलतात की मी नुसता त्यांच्या चेहऱ्याकडे बघत बसतो. मी कंडक्टरला मोडक्या तोडक्या जर्मन भाषेत एकदा प्रश्न विचारतो. तो तत्काळ उत्तर देतो. पण त्यातले अक्षरदेखील कळत नाही. तो मोठ्या आवाजांत पुन्हा एकदा उत्तर देतो. मग तर मला आणखीनच बुचकळ्यात पडल्यासारखे होते. तो रागावतो आणि निघून जातो. माझी येथे अशी सारखी फजिती होत असली तरी मी निराश झालेलो नाही. जर्मन भाषा शिकण्याचा माझा निश्चय कायम आहे.'

परदेशात राहावयास गेल्यामुळे लेनिनला प्लेखानोव्ह व अॅक्सेलरॉड यांच्याशी प्रत्यक्ष परिचय करून घेण्याची संधी मिळाली. रशियन मार्क्सवादाचे उद्गाते म्हणून त्या दोघांचे स्थान मोठे आहे. प्लेखानोव्ह व अॅक्सेलरॉड यांच्याप्रमाणेच जर्मनीतील इतर समाजवादी नेत्यांचीही लेनिनने भेट घेतली. या परिचयामुळे युरोपमधील समाजवादी चळवळीने कोणता टप्पा गाठला आहे, याचा त्याला अभ्यास करता आला.

लेनिन जर्मनीहून फ्रान्सला गेला. पॅरिसमध्ये त्याची कार्ल मार्क्सच्या जावयाशी—पॉल लॅफार्गशी—गाठ पडली. रशियन कामगारवर्ग हळूहळू मार्क्सवादाकडे झुकत असल्याचे लेनिनने त्याला मोठ्या उत्साहाने सांगितले.

पण लॅफार्ग कमालीचा उद्धट होता. त्याने विचारले, " रशियन कामगार मार्क्सवादाचा अभ्यास करताहेत हे ठीक आहे. पण त्यांना त्यातलं एक अक्षर तरी समजतं का ?"

" होय. " लेनिनने सांगितले.

" छे: ! त्यांना काही समजत नाही. अरे, आम्ही इथं वीस वर्षं प्रयत्न करतोय पण अजून एकालाही मार्क्स समजलेला नाही. आणि तू मला रशियातल्या गोष्टी सांगतोस ! "

लॅफार्गशी अधिक बोलण्यात अर्थ नाही हे लेनिनला समजले.

परिसमध्ये काही दिवस राहिल्यानंतर लेनिन जिनिव्हाला गेला. प्लेखानोव्ह तेथेच होता. जिनिव्हाच्या शांत वातावरणात लेनिन प्लेखानोव्हकडून समाजवादी आंदोलनाची धुळाक्षरे गिरवू लागला. अधूनमधून ते दोघे आल्प्सच्या कुशीत विसावलेल्या ओर्मोनी या खेडेगावात जाऊन राहत असत आणि तासन् तास चर्चा करीत बसत.

प्लेखानोव्हची सर्व विषयांत गती होती. सहज बोलतानाही तो कला, वाङ्मय, नाटके, तत्त्वज्ञान इत्यादी अनेकविध विषयांना स्पर्श करी. मूलत: प्लेखानोव्ह तत्त्वज्ञानीच होता. त्यामुळेच त्याची मानवतावादावर अपार श्रद्धा होती. परंतु केवळ तत्त्वचिंतनात निमग्न होऊन समाजापासून दूर जाणे प्लेखानोव्हला मंजूर नव्हते. आणि म्हणूनच तो धकाधकीच्या राजकीय क्षेत्रात उतरला होता. राजकारणात भाग घेणारी माणसे किती क्रूर महत्त्वाकांक्षेने पछाडलेली असतात याचा त्याला जेव्हा अनुभव येई, तेव्हा मात्र प्लेखानोव्ह काही काळ राजकारणापासून दूर होऊन पुस्तकांच्या विश्वात रममाण होई. त्याची आणि लेनिनची प्रकृती पूर्णपणे भिन्न होती आणि त्यामुळेच त्या दोघांचे फार काळ पटण्यासारखे नव्हते. प्लेखानोव्हचा विचारांवर भर होता तर लेनिनला कृती हवी होती. प्लेखानोव्ह समाजवादी असला तरी प्राचीन संस्कृतीशी त्याचे अतुट नाते होते. त्या रेशमी धाग्यांची त्याच्या विचारांना कोठेतरी गाठ बांधली गेली होती. उलट परंपरेचा पाया मुळापासून तोडण्याचा लेनिनचा निर्धार होता. प्राचीन रशियन संस्कृती हे एक थोतांड आहे, असे त्याचे मत होते. प्लेखानोव्ह आणि लेनिन यांच्यातील प्रारंभीचे गुरुशिष्याचे नाते लवकरच संपुष्टात येणार होते ते या भिन्न मन:प्रवृत्तीमुळेच.

निकोलस सेमाश्को या प्रसिद्ध बोल्शेव्हिक कार्यकर्त्याने म्हटले आहे,–' प्लेखानोव्हइतका संभाषणात चतुर असलेला कार्यकर्ता माझ्या पाहण्यात नाही. प्रतिपक्षाला तो आपल्या प्रगाढ व्यासंगाच्या बळावर सहज नामोहरम करी. तो कोणत्याही सभेत भाग घेवो, तेथे तो हेगेलसारख्या तत्त्ववेत्त्याचे उतारेच्या उतारे पाठ म्हणून दाखवी आणि लागलीच त्यावर आपले स्वत:चे असे भाष्य करी. लेनिनमध्ये ही चमक कधीच दिसली नाही. अखेरीस युरोप आणि आशिया यांच्या सीमारेषेवर जन्म पावलेला लेनिन जसा अर्धा युरोपीय होता तसाच अर्धा आशियाई होता !'

प्लेखानोव्ह आणि लेनिन यांच्या गप्पा सुरू झाल्या, की अनेक विषयांची चर्चा होई. एकदा बोलण्याच्या ओघात बालपणाचा विषय निघाला. प्लेखानोव्ह म्हणाला, " मला लहानपणी सैनिक व्हावं असं खूप वाटे. आपण सर्वश्रेष्ठ रशियन सेनानी व्हावं, रशियाचा नेपोलियन म्हणून आपला गौरव व्हावा असं माझं त्या वेळचं लाडकं स्वप्न होतं."

प्लेखानोव्हचे हे वाक्य ऐकताच लेनिन खदखदून हसला. तो म्हणाला, " लहानपणी मलाही सैनिक व्हावंसं वाटे. परंतु रशियन सैनिक नव्हे हं ! रशियन सैन्याला मारपीट करीत मागे वळविणारा मी एक इंग्रज सेनानी आहे हे स्वप्न रंगविण्यात मला आनंद होई. "

प्लेखानोव्ह संभाषण आटोपते घेण्यासाठी म्हणाला, " याचा अर्थ लहानपणापासून तुझा दृष्टिकोन असा आंतरराष्ट्रीय होता तर ! "

प्लेखानोव्ह आणि लेनिन यांच्यांत जेव्हा वाङ्मयासंबंधी चर्चा सुरू होई तेव्हा लेनिन फारसे बोलतच नसे. त्याला मुळातच वाङ्मय, कला यांसंबंधी रस नव्हता; परंतु साहित्यचर्चेतून राजकारणाचा विषय निघाला की मघाचा लेनिन आणि आताचा लेनिन या दोन भिन्न व्यक्ती वाटाव्यात इतक्या तावातावाने तो बोलू लागे. राजकारणासंबंधी बोलताना तो इतका समरसून जाई व अशा काही त्वेषाने बोलू लागे की समोर बसलेला दिपून जावा. विशेषतः, क्रांतीसंबंधीचे त्याचे विचार ऐकताना त्याचे परिचित स्नेहीही स्तिमित होत.

लेनिनच्या या प्रखर क्रांतिप्रेमामुळे त्याच्या रूपाने रशियातील समाजवादी चळवळीला एक अतिशय समर्थ नेता लाभेल असा प्लेखानोव्हचा विश्वास होता. झारच्या दडपशाहीविरुद्ध सारा समाज जागा करण्याचे दुर्दम्य सामर्थ्य या एकाच तरुणाच्या आचारविचारांत सामावलेले आहे, असे प्लेखानोव्ह वारंवार बोलून दाखवी. लेनिनला पाहिले की प्लेखानोव्हला अॅलेक्झांडर मिखाईलोव्ह या आपल्या जुन्या मित्राची आठवण होई. ' जनतेच्छा ' या क्रांतिकारक गटाचा मिखाइलोव्ह सूत्रधार होता. मिखाईलोव्हप्रमाणेच लेनिनही संघटना बांधण्यात यशस्वी होईल, असे त्याला वाटे. प्लेखानोव्ह आणि लेनिन या दोघांचे उद्दिष्ट एकच असले तरी दोघांची भाषा मात्र निराळी होती. याचे कारण हेच होते की, एकाचा भर तत्त्वचिंतनावर होता तर दुसरा क्रांतिकारकांची संघटना कशी उभारता येईल या ध्यासात सदैव निमग्न असावयाचा.

प्लेखानोव्हच्या सहवासात काही दिवस काढल्यानंतर अॅक्सेलरॉडला भेटण्यासाठी लेनिन जिनिव्हाहून झुरिचला गेला. अॅक्सेलरॉडला लेनिनसंबंधी फारशी माहिती नसल्यामुळे पहिल्या भेटीत तो फारसे बोलला नाही. पीटर्सबर्गला असताना लेनिनने मार्क्सवादावर अनेक लेख लिहिले होते. या लेखांचा संग्रह प्रसिद्ध होताच त्याच्या सर्व प्रती जाळून टाकण्याचा पोलिसांचा हुकूम होता; परंतु लेनिनने परदेशी प्रयाण करताना या लेखसंग्रहाच्या काही प्रती आपल्याबरोबर नेल्या होत्या. अॅक्सेलरॉडचा निरोप घेताना लेनिनने या संग्रहाची एक प्रत त्याला भेट दिली.

लेनिन निघून गेल्यानंतर अॅक्सेलरॉड त्याचा लेखसंग्रह चाळू लागला. त्या लेखांमधील लेनिनचे सखोल आणि स्वतंत्र प्रतिपादन पाहून अॅक्सेलरॉडला कौतुक वाटले.

हा तरुण उदारमतवाद्यांवर हल्ला चढविताना कमालीचा प्रक्षुब्ध होतो याचे अनेक पुरावे या संग्रहात होते. विशेषत:, 'के. तुलीन' या नावाने जो लेख लिहिण्यात आला होता. त्यातील उदारमतवाद्यांवरचा हल्ला कठोर स्वरूपाचा होता.

लेनिन दुसऱ्या दिवशी पुन्हा ॲक्सेलरॉडला भेटावयास आला.

"हा तुलीन कोण आहे रे ?" ॲक्सेलरॉडने विचारले.

"ते माझंच टोपण नाव आहे."

हे उत्तर ऐकल्यानंतर ॲक्सेलरॉड लेनिनशी जिव्हाळ्याने बोलू लागला. ॲक्सेलरॉड म्हणाला, "सध्याची रशियातील परिस्थिती लक्षात घेता रशियन कामगारांचे आणि समाजातील इतर पुरोगामी शक्तींचे हितसंबंध एकच आहेत असं मला वाटतं. झारची जुलुमशाही उलथून पाडणं हे जसं समाजवादी आपलं कर्तव्य मानतात तसंच उदारमतवादीही मानतात. होय ना ?"

लेनिन हसला. तो म्हणाला, "प्लेखानोव्ह नेमकं हेच सांगत होता. त्याची भाषा तुझ्यापेक्षा अलंकारिक होती एवढंच. तुम्ही उदारमतवाद्यांकडे पाठ फिरवता आणि आम्ही आमची तोंड त्यांच्याकडे वळवली आहेत हाच तुमच्या–आमच्यांतला मुख्य फ़रक आहे."

आठवडाभर त्या दोघांची या विषयावर चर्चा सुरू होती. शेवटी सध्याच्या परिस्थितीत तरी ॲक्सेलरॉडची भूमिका योग्य आहे अशी लेनिनने कबुली दिली. प्लेखानोव्हप्रमाणेच ॲक्सेलरॉडही लेनिनच्या निर्धारी वृत्तीवर खूष झाला. लेनिनच्या भेटीनंतर त्याने लेनिनसंबंधीचे आपले मत पुढील शब्दांत लिहून ठेवले आहे– 'रशियातील मार्क्सवादी आंदोलनाला आतापर्यंत योग्य नेता लाभला नव्हता. ज्याच्यपाशी वैचारिक सामर्थ्य आहे आणि त्याबरोबरच संघटना बांधण्याचे व्यावहारिक कौशल्य ज्याला लाभले आहे, असा नेता आता रशियाला हवा आहे. आपल्या मार्क्सवादी चळवळीचे उद्याचे नेतृत्व कोण स्वीकारणार याची काळजी करण्याचे आता काहीही कारण नाही. माझी खात्री आहे की लेनिन हाच रशियाचा भावी सूत्रधार आहे.'

१८९५ च्या सप्टेंबरमध्ये लेनिन रशियात परतला. त्याने आपल्याबरोबर बरेच बेकायदेशीर वाङमय आणले होते. पीटर्सबर्गच्या तपासणी अधिकाऱ्यांना झुकांडी देऊन लेनिनने हे सारे वाङमय मार्तोव्ह या आपल्या तरुण स्नेह्याच्या स्वाधीन केले. मार्तोव्हचे शिक्षण सेंट पीटर्सबर्ग विद्यापीठातच झाले होते. हे शिक्षण चालू असतानाच तो लेनिनच्या सहवासामुळे मार्क्सवादी विचारांकडे वळला होता. लेनिन आणि मार्तोव्ह पीटर्सबर्गमधील सार्वजनिक ग्रंथालयात भेटून या वाङमयाचा कसा आणि कोठे प्रसार करावयाचा याच्या योजना आखीत.

या कालखंडात लेनिनला आपल्या इतिहासाच्या भूमिकेचा मुळीच साक्षात्कार झालेला नव्हता, असे मार्तोव्हने म्हटले आहे.

तो लिहितो– ' सेंट पीटर्सबर्गमधल्या मार्क्सवादी कार्यकर्त्यांचे नेतृत्व या पंचवीस वर्षांच्या तरुणाकडे आलेले असले तरी त्या वेळी त्याचे व्यक्तिमत्त्व विकसनशील अवस्थेत होते. त्यामुळे इतरांना शिकविण्यापेक्षा इतरांकडून शिकण्याकडे त्याचा कल असे. प्लेखानोव्ह व ॲक्सेलरॉड यांचा मी विद्यार्थी आहे, असे तो विनयाने म्हणे. इतकेच नव्हे तर त्या काळात विरोधकांबद्दल बोलतानाही त्याच्या शब्दांत कटुता आढळत नव्हती.'

परदेशातील समाजवादी नेत्यांना भेटून आलेला कार्यकर्ता म्हणून लेनिनवर गुप्त पोलिसांची सारखी नजर असे. आपल्याला अटक होण्याची केव्हाही शक्यता आहे हे त्याला माहीत होते. म्हणूनच ' आईला घेऊन इकडे येऊ नको, ' असे त्याने ॲनाला कळवले होते. त्याला वाटे की आई आपल्याला येथे भेटावयाला आली आणि त्या वेळी जर आपण तुरुंगात असलो तर तिच्या मनातील ॲलेक्झांडरच्या स्मृतींची खपली निघून जुनी जखम पुन्हा चिघळेल आणि मातृहृदय विव्हल होईल. यामुळेच आईने पीटर्सबर्गला येऊ नये, असे त्याला सारखे वाटत होते.

या काळात लेनिन वकिली करीत होता. परंतु त्याचे व्यवसायाकडे फारसे लक्ष नसल्यामुळे प्राप्ती अगदीच बेताची होती. तेवढ्या मिळकतीत पीटर्सबर्गमध्ये राहणे शक्य नव्हते व म्हणून तो कधीकधी आईकडून पैसे मागवीत असे.

५ ऑक्टोबर १८९५ रोजी आईस धाडलेल्या पत्रात लेनिन लिहितो—

' माझ्याजवळचे सर्व पैसे संपले असल्यामुळे तू थोडे तरी पैसे पाठवून दे. नुकताच मी एक खटला चालविला. त्याचें सत्तर रुबल्स मला पुढल्या महिन्यात मिळणार आहेत. (अर्थात् ते लोक आपले वचन कितपत पाळतील ते मला माहीत नाही.) त्याचप्रमाणे एका वकिलाचा साहाय्यक म्हणून मला आणखी काम देण्याचे आश्वासन मिळाले आहे. अर्थात हे आश्वासनही कितपत खरे आहे ते सांगता येत नाही. मी आता जमाखर्च ठेवू लागलो आहे. गेल्या महिन्यात माझा चोपन्न रुबल्स तीस कोपेक्स इतका खर्च झाला. त्यातील सोळा रुबल्स पुस्तके, कपडे आदी वस्तू खरेदी करण्यास खर्च झाले. हा खर्च काही दर महिन्याला करावा लागणार नाही. याचा अर्थ गेल्या महिन्यात मी माझ्या दैनंदिन खर्चासाठी अडतीस रुबल्स खर्च केले. हा खर्चही मिळकतीच्या मानाने थोडा अधिक आहे याची मला जाणीव आहे म्हणून, यापुढे मी खर्चात आणखी कपात करणार आहे. परंतु पुन्हा जागेसाठी खर्च करावा लागेल; कारण सध्याची जागा मला बदललीच पाहिजे. कारण एक तर मालकिणीची सारखी कटकट चालू असते. शिवाय माझ्या आणि शेजारच्या खोलीमध्ये एक साधं पार्टिशन असल्यामुळे त्या खोलीतला आवाज माझ्या कानांवर

आदळतो. मला खोलीत निवांतपणे बसणे अशक्य होऊन जाते. माझा शेजारी जेव्हा मोठमोठ्याने बोलू लागतो तेव्हा मी खोलीला कुलुप लावून बाहेर पडतो.

पीटर्सबर्ग मार्क्सवादी कार्यकर्त्यांच्या हालचाली जसजशा वाढू लागल्या तसतसा लेनिनमागचा पोलिसांचा ससेमिराही वाढला. मागावर असलेल्या पोलिसांच्या हातावर तुरी देण्यासाठी तो नाना युक्त्या योजत असे. हा लपंडाव कित्येक दिवस चालू होता. लेनिन नेमके काय करीत आहे याचा पुरावा हाती येत नसल्यामुळे पोलिसांना त्यास पकडताही येत नव्हते. शेवटी पोलिसांनी आपला नेहमीचा मार्ग अनुसरला. त्यांनी लेनिनच्या एका सहकाऱ्याला पैसे देऊन आपलेसे केले. लेनिन आणि मार्तोव्ह लवकरच एक गुप्त वृत्तपत्र सुरू करणार असल्याची माहिती या सहकाऱ्याने पोलिसांच्या कानावर घातली. लेनिन आणि मार्तोव्ह आपल्या संकल्पित वृत्तपत्राच्या पहिल्या अंकाची मुद्रिते वाचत असतानाच तेथे छापा घातला.

२० डिसेंबर १८९५ रोजी लेनिन व मार्तोव्ह यांची पीटर्सबर्गच्या तुरुंगात रवानगी करण्यात आली. परंतु हा तुरुंगवास मुळीच जाचक नव्हता. कारण मित्रांना आणि आप्तेष्टांना आठवड्यातून दोन वेळ भेटण्याची परवानगी होती. शिवाय घरून खाद्यपदार्थ व पुस्तके मागविण्याची सवलतही देण्यात आली होती. या सवलतीमुळे बाहेर काय चालले आहे याची लेनिनला माहिती मिळे. आपल्या आईने आपल्याला तुरुंगात भेटावयाला येऊ नये, अशी त्याची इच्छा होती. परंतु लेनिन पकडल्याची बातमी कळताच मारिआ ॲनासह पीटसबर्गला आली नि वारंवार लेनिनला भेटावयास जात असे. ॲना पुस्तके घेऊन आली की लेनिन तिच्यामार्फत आपल्या सहकाऱ्यांना मार्गदर्शन करीत असे. पीटर्सबर्गच्या तुरुंगात असतानाच लेनिनने 'दि डेव्हलपमेंट ऑफ कॅपिटॅलिझम इन रशिया' या आपल्या पहिल्या ग्रंथाचे लेखन सुरू केले. हा ग्रंथ लिहिण्यापूर्वी त्याने अर्थस्शात्रावरील सर्व उपलब्ध पुस्तके वाचून काढली. तुरुंगात असताना लेनिनने आपल्या प्रकृतिकडेही लक्ष पुरविले. तो तेथे नियमित व्यायाम करीत होता. शिवाय मारिआ दररोज जेवणाचा डबा पाठवीत असे. त्यामुळे चौदा महिन्यांच्या तुरुंगवासानंतर लेनिन बाहेर पडला तेव्हा त्याची प्रकृती सुधारली होती.

पीटर्सबर्गच्या तुरुंगातून सुटका झाल्यानंतर लेनिनवर हद्दपारीचा हुकूम बजावण्यात आला. १८९७ च्या मे मध्ये त्याला पोलिसांच्या पहाऱ्यात पूर्व सैबेरियातील शुशेनस्कोए या खेडेगावात नेण्यात आले. तेथे त्यास तीन वर्षे काढावयाची होती.

[क्रमशः]

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ हुतुतूमधली वाचाळता

फट् म्हणता ब्रह्महत्त्या होते म्हणतात. म्हणजे कुठल्या गोष्टीचा काय परिणाम होईल ते सांगता येत नाही. उदाहरणार्थ, खेळ खेळल्याने प्रकृती चांगली राहते, असा आपल्याकडे साधा सरळ हिशेब आहे.– चूक! ऑस्ट्रेलियातल्या एका प्राध्यापक महाशयांनी फूटबॉल अन् क्रिकेट या खेळांवर ताशेरे झाडले आहेत. का, तर त्यांच्या मते फूटबॉल खळल्याने स्वार्थीपणाच्या भावनेला उत्तेजन मिळते, तर क्रिकेटमुळे माणूस आळशी होतो. आता बोला ! फूटबॉलचे खेळाडू गोल करण्याच्या हावेने जी लाथाळी करतात, ते स्वार्थीपणाचे मूर्तिमंत प्रतीक आहे हे मलाही कबूल करावे लागेल; अन् क्रिकेटमध्ये एकाने खेळायचे अन् दहाबारा जणांनी त्याच्याभोवती स्वस्थ उभे राहून पाहायचे हा तर आळसाचा कळसच आहे.

पण फक्त फूटबॉल व क्रिकेटमध्येच दुर्गुण आहेत का ? मला तर वाटते माणसाच्या अंगातल्या प्रत्येक दुर्गुणाला एक एक खेळ जबाबदार असावा. उदाहरणार्थ, हुतुतू खेळल्याने वाचाळतेला उत्तेजन मिळते हे उघड आहे; तर खोखो खेळल्याने खोखोच्या खुंटासारखा मख्खपणा अंगी येतो. आटचापाटचांमुळे माणूस आत एक, बाहेर एक करायला शिकतो, तर लीप फ्रॉग खेळून तो कूपमंडूक वृत्तीचा होतो.

जी स्थिती पुरुषी खेळांची तीच बायकी खेळांची ! लहानपणी दोरीवरच्या उड्या मारण्याची हौस असणारी मुलगी मोठेपणी नवऱ्याला तारेवरची कसरत करायला लावते, तर आंधळी कोशिंबीर आवडणाऱ्या मुलीच्या नवऱ्याला डोळे झाकून केलेला स्वयंपाक डोळे झाकून आवडून घ्यावा लागतो. फक्त सागरगोटे अन् छप्पापाणी खेळल्याने मात्र अंगात एकही दुर्गुण शिरत नाही, उलट सद्‌गुणांची रेलचेल होते. का ? उत्तर सोपे आहे – आमच्या हिला हे खेळ आवडतात.

## □ जिवंत पुरलेला इतिहास

विसाव्या शतकातले इंग्लंड कसे होते, याची आणखी दोन हजार वर्षांनी म्हणजे चाळीसाव्या शतकातल्या लोकांना कल्पना यावी म्हणून काही इतिहासप्रेमी इंग्रज मंडळी एक अभिनव खटाटोप करीत आहेत. ते अणुयुद्धातही टिकेल असे एक तळघर बांधून त्यात आधुनिक इंग्लंडातील काही निवडक प्रातिनिधिक वस्तूंचा संग्रह

ठेवणार आहेत. त्या गोष्टी दोन हजार वर्षांनी सापडल्या म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वीचे आपले पूर्वज कसे होते याची तत्कालीन लोकांना कल्पना येईल अशी अपेक्षा आहे ! कल्पना आपल्याकडे पोतदारांपासून पुरंदऱ्यांपर्यंत सर्वांना पसंत पडावी अशीच आहे ! आधुनिक भारतही भविष्यकाळातल्या मंडळींना अशा रीतीने समजला तर फारच बहार होईल यात शंका नाही. आता इंग्लंडात ते कोणकोणत्या वस्तू प्रातिनिधिक समजून जपून ठेवणार आहेत याची माहिती उपलब्ध नाही. पण हिंदुस्थानात आपण काय काय ठेवले याची यादी करायला हरकत नाही.

मला वाटते पहिली गोष्ट ठेवावी ती म्हणजे कोकाकोलाची बाटली. आधुनिकतेच्या अर्कापासून तयार केलेले हे कषायपेय विसाव्या शतकातल्या भारतातली संस्कृती गावठी नव्हे तर थेट इम्पोर्टेड होती हे सिद्ध करू शकेल. दुसरी प्रातिनिधिक गोष्ट म्हणजे कोनशिला. कोनशिला-समारंभ व उद्घाटने नसती तर मंत्र्यांच्या जीवनाला काय अर्थ उरला असता ? तिसरी गोष्ट म्हणजे भेसळ-शास्त्रावर एखादा संपूर्ण ग्रंथ लिहून त्याची प्रत ठेवावी. भारतीय कल्पकतेचा परमोच्च बिंदू तो हाच यात तिळमात्र संदेह नाही. अन् शेवटी एखाद्या हिंदी सिनेमाचे सबंध रीळ ठेवावे, त्यातले ते नसून भारतीय नाईट क्लब, तो नायक-नायिकेचा प्रेम करण्याचा व्यायाम, त्या गोंदाने दाढी-मिशा चिकटवलेला व्हिलन, त्या स्टुडियोतली बांबूची घरे धडाधड पाडणारे नेत्रदीपक भूकंप, आणि शेवटी हीरोने डायरेक्टरच्या मदतीने व्हिलनवर केलेली देमार मात हे सर्व पाहुणाऱ्या चाळीसाव्या शतकातल्या प्रेक्षकाची आधुनिक (म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वीचा) भारत म्हणजे एक सनसनाटी चीज होती अशी खात्री पटू शकेल.

## □ डोकेदुखीवर अग्निबाण उपाय

डोके दुखले की आपण अॅस्प्रोची गोळी घेतो, पडसे झाले की व्हिक्स चोळतो. हिवतापावर कोयनेल अन् खोकल्यावर सुंठ हे अगदी ठरून गेल्यासारखे आहे. पण कपड्यांची फॅशन बदलते मग औषधाची का बदलू नये ? परवा, एका रशियन हृदयविकार तज्ज्ञाने म्हटले की भविष्यकाळात हृदयविकाराच्या रोग्यांना बरे करण्यासाठी अंतरिक्ष-प्रवासाला पाठविण्यात येण्याची शक्यता आहे. भले शाबास ! एकदा हृदयविकाराचा झटका आला की माणूस बहुधा परलोक प्रवासाच्या तयारीलाच लागतो. पण त्याला सदेह तिकडे पाठविण्याची ही कल्पना अजब आहे. आतापर्यंत पुण्याचा रोगी हवापालट करण्यासाठी माथेरानला जात होता. आता पृथ्वीवरचा पेशंट हवा नसलेल्या चंद्रावर जाणार ! चला, हृदयविकाराने पडू आजारी, रॉकेटमध्ये बसायची मौज हीच वाटे भारी.

●



# दक्षिणायन

विद्याधर पुंडलीक

५

रेणीगुंठा स्टेशनवर गाडी थांबली, अन् स्टेशनवरच्या स्टॉलवरून आम्ही 'हिंदू'चा अंक विकत घेतला. इतर कोणत्याही राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय बातम्यांत आम्हांला त्याक्षणी रस वाटत नव्हता. बाकीचे जग एक दिवस कळले नाही तरी चालण्यासारखे होते! द्रविड मुन्नेत्र कळघम्‌च्या 'नवी विटी—आणि नव्या राज्यां'त काय काय सुरू झाले आहे, कोणते नवे झंझावाती वारे तिकडे खेळू लागले आहेत, हे कळून घेण्यासाठी आम्ही उत्सुक झालो होतो.

अन् आमचा अपेक्षाभंग झाला नाही. त्या दिवशी तीन महत्त्वाच्या बातम्या मद्रासहून थडकल्या होत्या. एक : मद्रास सचिवालयावरील 'सत्यमेव जयते' हे संस्कृतातले भारत सरकारचे ध्येयवचन पुसले जाऊन त्या जागी तामीळमधील 'वायमीये वेल्लूम'–(Vaymaiye Vellum) हे वचन लटकले होते. आणि हा बदल पाहण्यासाठी दहा–हजार लोकांनी सचिवालयावर गर्दी केली होती. दोन : "आपल्या दुकानावरील पाट्या तामीळमध्येच लावीत चला. तसेच, आपल्या मुलांची नावेही तामीळमधलीच ठेवा," असा संदेश मुख्यमंत्री अण्णा दुराई यांनी दिला होता. आणि तीन : न्यायालयांतील कामकाजाच्या तामीळ–परिभाषेच्या पहिल्या संदर्भ-कोषाचा प्रकाशन-समारंभ शिक्षणमंत्री नेडूनजेनियन यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला होता!

## तामिळीकरणाचा वेग

मद्रासला उतरलो अन् संध्याकाळपासूनच तामिळीकरणाची द्रविड मुन्नेत्र कळघमने निवडणुकांत दिलेली ग्वाही रस्त्यारस्त्यांवर दिसू लागली. अण्णा दुराईंनी विनंती करण्याआधीच, नव्या, ओल्या रंगाच्या तामीळमधील पाट्या काही काही दुकानांनी आणि रेस्टॉरंट्सनी ठोकल्या होत्या. इंग्लिश पाट्यांबरोबरच तामीळ पाट्या लावण्याची विनंती काही ठिकाणी पोलीस-अधिकारीसुद्धा करीत होते, असेही आमच्या दुभाष्याने आम्हांला सांगितले. स्टेट ट्रॅन्स्पोर्टचे पूर्वीचे संस्कृतला जवळ असलेले भाषांतर जाऊन, स्टेट ट्रॅन्स्पोर्टच्या बसेसवर तामीळ पाट्या नव्याने चमकू लागल्या होत्या; पण हे सगळे वरवरचे किंवा दूरचेच होते असे नाही. नेडूनजेनियन आणि करुणानिधी यांच्या मुलाखतीच्या वेळीही एक–दोन गोष्टी चटकन ध्यानात आल्या. सचिवालयातील अधिकाऱ्यांच्या फाईल्समध्ये " Urgent ", " Immediate " वगैरेसारखे इंग्रजी तांबडे हिरवे बावटे नव्हते. ते तामीळमध्येच होते. दोन–तीन मिनिटांच्या अवधीतही या दोन मंत्र्यांनी फाईल्समध्ये दिलेल्या सूचना नि अभिप्राय जे दिसले तेही तामीळमध्येच होते. (मुंबई–पुण्याच्या सचिवालयात काय आहे हे मला माहीत नाही.) तामीळ लिपी मला पूर्णपणे अज्ञात, पण ती दिसते एखाद्या वेलीचे आडवे–तिडवे पण विलक्षण गोल, वळणदार तणावे एकमेकांत गुंतावे तशी. त्या पंधरा दिवसांत जागोजागी अशा वेलींच्या लांब लांब प्रसरलेल्या तणाव्यांच्या जाळ्यांनी सबंध तामीळनाडमध्ये माझे डोळे बांधले गेले होते जणू ! (ते सुटले बेळगाव आल्यावर !! तिथे अधाशासारखा ' केसरी ' उघडल्यावर ! दोन नाजूक कडी सांभाळणारा ' क ', मटजीच्या छाती आणि पोटासारखा दिसणारा गरगरीत ' घ ' वगैरे नेहमीची मंडळी पाहिल्यानंतर ! )

मात्र निरनिराळ्या माणसांशी बोलताना आम्हांला असे दिसून आले, की तामिळीकरणाचा हा पायंडा हा काही द्र. मु. कळघमनेच सुरू केला आहे असे नाही. राजगोपालाचारी–कामराज–भक्तवत्सलम अशी परंपरा त्यामागे आहे. भक्तवत्सलम् यांच्या मते तर या बाबतीत त्यांनी फार केले आहे. १९६० साली काही कॉलेजांत पदवी–परीक्षेसाठी तामीळ माध्यम ठेवण्यापर्यंत त्यांनी तामिळीकरणाचा कार्यक्रम पुढे नेला होता. ' द्रविड आरझू कळघम ' या १९४७ साली स्थापन झालेल्या पक्षाचा एक कार्यकर्ता आम्हांला म्हणाला, " अहो, आज वीस वर्षे आम्ही राज्यकारभार तामीळमधून झाला पाहिजे, अशी ओरड करतो आहोत. पण आता सत्तेवर आल्याने आमच्या सर्व प्रयत्नांचे श्रेय मात्र ही डी. एम. के. मंडळी लाटणार आहेत ! मद्रासला तामीळनाड म्हणा असे आम्ही केव्हापासून म्हणत आहोत. काँग्रेसने आमचे कधी ऐकले नाही. हे सरकार मात्र ताबडतोब हे नाव देईल आणि जनतेसमोर हे आमचे कर्तृत्व म्हणून मिरवेल. " त्याच्या या तक्रारवजा बोलण्यातला खरेपणा आणखी काही माणसांबरोबर बोलताना आला. त्यावरून एक गोष्ट कळली. ती अशी

की, राज्यकारभार तामीळमधून आणण्यासाठी कॉंग्रेस–सरकारनेही कुठेकुठे पावले टाकली नाहीत असे नाही, पण त्यामागे चालढकल आणि वेळकाढूपणा असल्यामुळे त्यांची गती मंद होती. द्रविड मुन्नेत्र कळघमचा भाषिक ध्येयवाद हा कॉंग्रेसपेक्षा जास्त कडवा आणि जास्त निर्धाराचा आहे. आदित्यन–करुणानिधी यांसारख्या नेत्यांमुळे आणि पक्षांतील विद्यार्थ्यांच्या फळीमुळे या ध्येयवादाला आणखीनच धार आली आहे. तामिळीकरणाच्या कार्यक्रमाला त्यांनी एक विलक्षण तडफदार अशी गती दिली आहे.

द्रविड मुन्नेत्र कळघमच्या भाषावादाची झेप आणि वेग किती आहे याची आणखी दोन उदाहरणे सांगण्याजोगी आहेत. गेल्या महिन्यात तामिळनाडमधील प्रातिनिधिक विद्यार्थी संघटनांनी उटकमंडला एक हिंदी-विरोधी मेळावा घेऊन तामिळच्या सर्वांगीण पुरस्काराची मागणी केली आहे. खुद्द अण्णा दुराईंना उपस्थित राहून या मेळाव्याची दखल घ्यावी लागली आहे– किंवा त्यांनी ती घेतली आहे. 'हिंदू'-मधील अगदी अलीकडची बातमी अशी आहे की, पुढील वर्षी मद्रास येथे एक जागतिक तामीळ परिषद भरविण्याचा मानस मद्रासच्या शिक्षणमंत्र्यांनी जाहीर केला आहे. (जाता जाता आपल्या मराठी माणसांनी आणखी एका गोष्टीची नोंद घ्यावी– या वर्षीची जागतिक तामीळ परिषद मलायाच्या राजधानीत–क्वालालंपूर येथे भरली होती !)

या सर्वांमागे तामीळच्या प्राचीनत्वाचा अहंकार आहे. तामीळ पुराणातील एक सुरस कथा अशी आहे की 'नवलम्' ही पृथ्वीतलावरील तामीळ–भूमी ही विश्व-संस्कृतीची जननी आहे अन् पॅलेस्टाईन, ईजिप्त इतकेच नव्हे तर स्कॅंडिनेव्हिअन देशापर्यंत ती पसरली होती ! स्वाभाविकच तामीळ ही संस्कृताहून फार प्राचीन आहे ! पण हे पुराण झाले. सर जॉन मार्शल यांच्यासारख्या प्राकृत–इतिहास तज्ज्ञांची साक्ष देऊन तामीळ इतिहासकार मोहेंजोदारो, सुमेरियन आणि बाबिलोनियन या सर्वांची संस्कृती ही द्रविड होती असा दावा मांडतात. पुराणांतरीचा अतिरंजित, कपोलकल्पित आणि इतिहासातील वादग्रस्त भाग आपण सोडून देऊ या. तज्ज्ञ आणि जबाबदार भाषाशास्त्रज्ञ आणि इतिहासकार उपलब्ध असलेल्या लिखित पुराव्यावरून तामीळ भाषा आणि तामीळ संस्कृती ही अशोकपूर्व किंवा अशोक समकालीन काळात म्हणज ख्रिस्तपूर्व २ ते ४ शतकाच्या आसपास (अर्थातच सह्याद्रीला जाग येण्याआधी कितीतरी शतके आधी !) अस्तित्वात असावी, असा निर्वाळा देतात.

तामिळीकरणामागे अशा प्राचीन परंपरेचा एक पीळ आहे. त्या परंपरेशी सूत्र अतूट ठेवूनच आधुनिकतेशी जुळवून घेण्याचा आग्रह त्यामागे आहे. बहुजन समाजाला लोकशाही जीवनात आणावयाचे असेल तर लोकभाषेखेरीज दुसरे साधन नाही, ह्या भाषावार प्रांतरचनेतील तत्त्वाची ती अपरिहार्य परिणती आहे. खरे म्हणजे यांत बिचकण्याजोगे काय आहे ?

आणि तरीही तामीळनाडमधील हे भाषिक उत्थान पाहून आमचे मन कुठेतरी एकसारखे बिचकत होतेच. याचे एक कारण उघड आहे. तामीळही संस्कृतोद्‌भव भाषाहून अगदी भिन्न आणि परकी म्हणून हे उत्थानही सर्वस्वी अनोळखी असल्यासारखे वाटे. पण एवढेच नव्हते. आणखीही कारणे होती. बहुजनसमाज लोकशाही जीवनात येऊन तिचा सामाजिक पाया विस्तृत होणे हे भाषिक राज्यांचे ध्येय दुय्यम ठरून या उत्थानाची परिणती कडव्या आणि फुटीर राष्ट्रवादात तर होणार नाही ना ! ती व्हावयाची नसेल तर तामीळनाडला आणि पर्यायाने दक्षिण भारत आणि उत्तर भारत यांना कारभारात आणि व्यवहारात एकत्र आणणारा एक दुवा पाहिजेच. हा दुवा कोणता ? हिंदी का इंग्रजी ? शुद्ध तामीळच्या पुरस्कारातून उत्तर–दक्षिणच्या समान परंपरेचा संस्कृतचा धागा पूर्णपणे तुटून जाईल काय ? प्रादेशिक भाषा हे शिक्षणाचे माध्यम झाल्यावर सनदी सेवेतील (Civil Service) भरतीचे आवश्यक राष्ट्रीय स्वरूप, आंतरराज्य शैक्षणिक देवघेव, यांचा विचार ही मंडळी कशी करतात ? आपल्यापैकी अनेकांप्रमाणेच आमच्याही मनात हे प्रश्न घोळत होते. या प्रश्नांच्या अनुरोधाने मग आम्ही मद्रासमधील निरनिराळ्या लोकांशी चर्चा करीत गेलो. या चर्चांचा एक साधा पवित्राही आम्ही ठरवून टाकला. हिंदीचा बुरूज लोहियावादी बाण्याने–Hindi–now and here–वि. ग. कानिटकरांनी लढवायचा ! सनदी नोकरशाहीतील मद्रासी साम्राज्यवादाशी गनिमी काव्याने लढणाऱ्या श्री. ज. जोशींनी सिव्हिल सर्व्हिसचे राष्ट्रीय स्वरूप आणि संस्कृतच्या बंधाची महती यांच्या बाजूने बोलावयाचे ! आणि मी अर्थातच, On the other hand, Nevertheless, वगैरे खास प्राध्यापकी व्यवसायातील परवलीचे शब्द वापरून, शिक्षणाच्या माध्यमाची चर्चा, वेगवेगळ्या मुद्यांना थांबवून किंवा जाऊ देऊन चालवायची. पोलीस रहदारी नियंत्रित करतो तशी !

" डॉ. रघुवीर यांचे अनेक मित्र तामीळनाडमध्ये आहेत ! काही संस्कृत शब्दांचे उच्चाटन करता येईल आणि तसे केले गेलेही आहे. मुळात यात वाईट काहीच नाही. पण त्यालाही मर्यादा आहेत. संस्कृतचा प्रभाव पूर्णपणे पुसून टाकणे शक्य नाही. तसा प्रयत्न शेवटी कृत्रिम आणि हास्यास्पदच होईल. आता संस्कृतचा किमान धागा ठेवण्याचा प्रश्न हा इथेच आहे असे नाही. मला वाटते, तो सगळीकडेच आहे. "

प्रा. वरदराजन् यांनी दिलेला हा दिलासा–'द्रविड आरझू कळघम्' या पक्षाचे संस्थापक श्री. शिवज्ञान ग्रामणी–मापुसी यांच्याशीही बोलताना मिळाला. यष्टी ठेंगू, वर्ण काळसर, तोंडावर छपरी मिशांचा झुपका असे त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वसाधारणपणे महाराष्ट्रीय देशस्थ ब्राह्मणासारखे वाटले. गांधीजींनी १९४० साली आपले वैयक्तिक सत्याग्रही म्हणून निवडलेल्या या माणसात स्वातंत्र्यपूर्व लढा देणाऱ्या पिढीचे सारे काही होते–करारी जिद्द, तुरुंगवास, खादीचे व्रत आणि धुंदफुंद करणारा

एक नाद ! मापुसी यांचा हा नाद म्हणजे तामीळ भाषेच्या आणि परंपरेच्या व्यासंगाचा. त्यांच्या टेबलावर अब्राहम लिंकनच्या पुतळ्याबरोबरच त्यांच्या पक्षाचे ध्वजचिन्हही होते. पांड्य, चोल आणि चेरा या तामीळ साम्राज्यांची वाघ, मासा आणि धनुष्य-बाण ही राजचिन्हे त्या ध्वजावर होती ! आंध्रशी ' तिरुत्तनी ' सीमाभागावरून सतत भांडणारे, त्यासाठी दहा-बारा वेळा तुरुंगवास पत्करणारे हे गृहस्थ बहुधा तिरुपतीपर्यंतच खरे वैभवशाली क्षितिज आहे, असे मानणारे निघतील असे प्रथमदर्शनी आम्हांला वाटले. पण बोलताबोलता हा ग्रह दूर झाला.

" आपण राजगोपालाचारींचे शिष्य म्हणून विचारतो, English ever, Hindi never ही त्यांची विचारसरणी आपल्याला मान्य आहे काय ?"–(हा प्रश्न अर्थातच कानिटकरांनी विचारला ! )

" मुळीच नाही. मी राजगोपालाचारींचा शिष्य असलो तरी बेबंद शिष्य– Wild follower–आहे. लोकांच्या भाषेतूनच राज्यकारभार व्हावा ही एकच माझी जीवननिष्ठा आहे. त्यासाठी हिंदीपेक्षा इंग्लिशचे उच्चाटन पाहिजे–कारण इंग्लिश माध्यम चालू राहण्याने तामीळचाच विकास खुंटतो आहे. "

आम्हांला जरा हायसे वाटले. कारण इंग्लिशबद्दल तामीळनाडमध्ये या आणि अशा सुरांत आमच्याशी कोणी बोलले नव्हते. मग, संस्कृतबद्दल त्यांचे मत काय आहे, हे जाणून घेण्याच्या दृष्टीने मी विचारले–

" मीनाक्षीच्या देवळातील पूजाविधी वगैरेंचे संस्कृत मंत्र काढून, तेथे तामीळ मंत्र सुरू करावेत अशी एक चळवळ पूर्वी तामीळनाडमध्ये होऊन गेली. त्याबद्दल आपल्याला काय वाटते ?"–

" लोकांना मंत्र कळावेत या दृष्टीने ते तामीळमध्ये आले तर काही हरकत नाही. त्यात तुमच्यासारख्या लोकांनी अस्वस्थ होण्याचेही कारण नाही. तुमच्या संत-चळवळीतील प्राकृत भाषेच्या अभिमानामागे तरी यापेक्षा दुसरे वेगळे काय होते ?–"

"पण आमचे-तुमचे सांस्कृतिक संबंध कुठेतरी या मंत्रावरही अवलंबून आहेत, असे आपणाला वाटत नाही ? मीनाक्षीचे, कन्याकुमारीचे देऊळ ही सर्व भारताची तीर्थक्षेत्रे आहे. "

" बरोबर आहे. त्यादृष्टीने काही बीजमंत्र संस्कृतमध्ये स्वतंत्रपणे राखावयास हरकत नाही, असे मला वाटते. "

पण निकडीचा आणि आपले राजकीय सांस्कृतिक भविष्य निश्चित करणारा महत्त्वाचा प्रश्न संस्कृतचा नाही. तो आहे " दुव्याच्या भाषेचा. " याबाबतीत अनेकांशी बोलणी केल्यावर, आज तामीळनाडमध्ये या प्रश्नावर मुख्यत: तीन मतप्रवाह आम्हांला आढळून आले.

## तीन मतप्रवाह

पहिला मतप्रवाह हा 'दिनमणी'चे उप-संपादक व्यंकटाचार्य यांच्याशी झालेल्या संवादांत व्यक्त झाला. वर्तमानपत्रांत बरीच वर्षे राहूनही त्यांचा आवाज आम्हांला अतिशय शांत, सनदशीर आणि सौम्य वाटला ! हाच शांतपणा आणि सौम्यपणा त्यांच्या दृष्टिकोणातही आढळला. ते म्हणाले,– "आपण सर्वजण या प्रश्नात फार घाई करत आहोत. विशेषतः, यू. पी. तील हिंदी माथेफिरू तर फारच ! मला असे वाटते की, हा प्रश्न आपण काळावर सोपवू या. कदाचित त्यातूनच आपल्याला हवा तो तोडगा विविध-प्रयोगांनंतर निघू शकेल ! " हा मुद्दा स्पष्ट करताना ते म्हणाले– "पुढच्या काळात एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात खूप स्थलांतर होईल. उत्तरेकडून दक्षिणेत आणि दक्षिणेकडून उत्तरेत –अशा दोन्ही दिशांनी ते होईल. या स्थलांतराने विविध प्रांतीय एकमेकांजवळ येतील आणि हिंदी वा इंग्रजी याबद्दलचा कडवेपणा जाईल. मग एकमेकांच्या देवघेवीतून आणि परस्पर व्यवहारातून आपोआप सर्वांना स्वीकारार्ह असा भाषाविषयक पर्याय निघू शकेल. कदाचित तो हिंदी असेल. कदाचित तो इंग्लिशही असेल."

यावर खूपच शंका विचारता येण्याजोग्या होत्या. तसे पाहिले तर गेली वीस वर्षे आपण हळूहळू अन् सावकाशच चाललो आहोत की ! पण सापडतील वाटणारी उत्तरे तर दिवसेंदिवस दूर चालली आहेत. पण सगळी चर्चा करण्याइतका वेळ नसल्याने आम्ही तेथेच मुलाखत आवरती घेतली.

काळावर भिस्त आणि विश्वास ठेवणारा दुसरा एक विचारप्रवाह आढळला. "आहे तेच राहू द्या" या नावाने तो सगळ्या प्रांतात जसा फिरतो आहे, तसाच तामीळनाडमध्येही. दक्षिण भारतातील लोक हिंदीचा स्वीकार करीपर्यंत किंवा करण्याच्या मनःस्थितीत येईपर्यंत इंग्लिश ही सहभाषा राहू द्यावी, असा हा विचार आहे. मदुरा–त्रिचनापल्लीच्या प्रवासात रामनाथन् आणि कृष्णन् नावाचे दोन उच्चपदस्थ सरकारी अधिकाऱ्यांनीही हेच विचार प्रगट केले. सर्वसाधारणपणे हे मत या वर्गाचे प्रातिनिधिक मत दिसते. भक्तवत्सलम् यांच्यासारखे कांग्रेसचे नेते हेही याच मताचे आहेत. "प्रत्यक्ष घटनेतील संबंधित कलम रद्द करावे हे राजगोपालाचारींचे मत मला मान्य नाही. सरकारी दुरुस्ती पुरी आहे असे मला वाटते. हिंदीला असलेला दाक्षिणात्यांचा विरोध याच मार्गाने निवळेल. या तजविजीमुळे हिंदीची कायमची पीछेहाटही थांबेल"– असे भक्तवत्सलम् यांनी आम्हांला सांगितले. मात्र हिंदीचा स्वीकार करण्याची मनःस्थिती–जी गेल्या वीस वर्षांत आली नाही ती आणखी किती काळाने येईल, या आमच्या प्रश्नावर, आपल्या म्हणण्याच्या पुनरुच्चाराखेरीज त्यांनी काही उत्तर दिले नाही.

'हळूहळू आणि सावकाश', 'काळावर विश्वास' आणि 'आहे तेच राहू द्या' ही सगळी सूत्रे एरवी आक्षेपार्ह ठरलीही नसती. पण या सूत्राहून एक वेगळे सूत्र

तामीळनाडहून पुढे सरकते आहे. आणि त्याचा वेग झपाटयाचा आहे. "आम्हांला हिंदी केव्हाही नको–कायमची नको. इंग्लिश हीच सर्व भारताची कायमची दुव्याची भाषा पाहिजे," अशी ही मागणी आहे. आणि या मागणीला दोन वर्षांपूर्वी झालेल्या हिंदी-विरोधी आंदोलनाची चटचटती धग आहे !

आम्ही घेतलेल्या विविध मुलाखतींतून एक गोष्ट स्वच्छपणे नजरेला आली. एक रा. स्व. संघाचे कार्यकर्ते सोडले तर हिंदीला दुव्याची भाषा म्हणून निरपवादपणे मान्यता देणाऱ्यांची संख्या तामिळनाडमध्ये फार थोडी आहे. कांग्रेसच्या नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचा हिंदीला पाठिंबा आहे. पण वर सांगितल्याप्रमाणे सशर्त अन् गुळगुळीत ! एम. ए. चे विद्यार्थी, प्राध्यापक, द्रविड मुन्नेत्र कळघमचे पुढारी आणि कार्यकर्ते, रस्त्यात–बसमध्ये–हॉटेलमध्ये भेटलेला सामान्य सुशिक्षित माणूस या सर्वांना हिंदी परकी वाटते. इतकी की द्रविड मुन्नेत्र कळघमचा एक कार्यकर्ता आम्हांला अभिमानाने म्हणाला, "मद्रासमधील अगदी गलिच्छ वस्त्यांतून जरी तुम्ही हिंडलात तरी एखाद-दुसरा इंग्लिशचा शब्द तुमच्या कानांवर पडेल. पण हिंदीचा एक शब्द तुम्हांला तिथे आढळणार नाही."

हा कार्यकर्ता म्हणजे 'मोरो सिली' या तामीळ दैनिकाचा एक उपसंपादक. हे दैनिक अण्णा दुराईंनी स्थापन केलेले. करुणानिधी हे त्याचे संपादक. या दैनिकाच्या कचेरीत आम्ही बसलो होतो. बोलत होतो ते द्रविड मुन्नेत्र कळघमच्या संघटनेच्या स्वरूपाबद्दल. बोलता बोलता आम्ही विचारले– "कम्युनिस्ट संघटनेत जसा 'सेल' आणि कांग्रेसचे जसे 'मंडल' तसा तुमच्या पक्ष-संघटनेचा मूलभूत घटक कोणता?" यावर काळाकरंद, दरदरीत नाकाचा, आणि भेदक डोळयांचा हा उपसंपादक एकदम उसळून म्हणाला– Stop there ! I hate that word– Mandal. It is a Hindi word !

हिंदीबद्दल इतका पराकोटीचा द्वेष सार्वत्रिक आहे, असे नाही. तसा तो अपवादात्मकच आहे. पण हिंदीबद्दलची अनिच्छा आणि औदासीन्य मात्र सार्वत्रिक आहे.

"हिंदी का परकी वाटते ?"

"तिचे भाषास्वरूप आम्हांला पूर्णपणे परकी वाटते."

"इंग्लिशचे भाषास्वरूप परकी नाही का ?"

"नाही. तो आता आपल्या सर्वांचाच वारसा आहे."

"इंग्लिश ठेवण्यात एकप्रकारची गुलामगिरी नाही का ?"

"नाही. तुम्हांला तसे वाटते. आम्हांला नाही."

"बाकीच्या बहुसंख्य भारतीयांवर तरी इंग्लिशची सक्ती का ?"

"सक्ती नकोच. पण मग आमच्यावरही हिंदीची सक्ती नको."

"एका मोठयांतल्या मोठया भाषिक गटाची भाषा–जवळ जवळ ४० टक्के लोकांची भाषा– ही राष्ट्रभाषा स्वीकारण्याचा त्याग कठीण असला तरी अशक्य आहे का ?"

" अशक्यच आहे. आणि त्यागच करायचा तर मग आम्हीच का ? इंग्लिशबाबत तुम्हीच का तो त्याग करीत नाही ?" अशी प्रश्नोत्तरांची माळाफेक या विषयाबाबत व्हायची.

## पिछेहाट, पण तात्पुरती !

राष्ट्रीय सनदी सेवेच्या स्वरूपाबद्दल दोन भिन्न मते आढळली. काहींचे मत असे की त्यांचेही स्वरूप प्रांतिकच असले पाहिजे. त्या दृष्टीने पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षा प्रादेशिक भाषेतूनच घ्याव्यात. दुसऱ्या मतानुसार त्या इंग्लिशमध्ये घ्याव्यात. हिंदी का नको ? यावर आजच या नोकरशाहीत उत्तर भारतीय ७० टक्क्यांच्यावर आहेत, हिंदी आल्यावर ते किती होईल ? असा प्रतिप्रश्न विचारण्यात आला. वेगळा सूर फक्त शिक्षण-मंत्री नेडूनजेनियन यांनी काढला– " हे सर्व प्रश्न महत्त्वाचे आहेत. ते आपण तज्ज्ञांकडे सोपवू या. त्यांच्या मतानुसार आवश्यक ते फेरबदल आपण जरूर करू या." पण दुसरीकडे, लोकसभेतही सर्व पंधराच्या पंधरा राष्ट्रीय भाषा वापरल्या जाव्यात असा आग्रह त्यांनी मांडलाच !

या भाषाविषयक संवादात आणि प्रश्न-प्रतिप्रश्नांत वेगवेगळ्या छटा होत्या– सत्य, अर्धसत्य, चलाख युक्तिवाद, पळवाटा, प्रामाणिक अडचणी, आडदांडपणा, असहिष्णुता – या सर्वांच्या. पण एक गोष्ट निश्चित आहे – प्रादेशिक भाषा आणि सक्तीची दुय्याची भाषा म्हणून इंग्लिश या सूत्राचे नेतृत्व तामीळनाडकडे आले आहे.

याचा अर्थ असा नाही की तामीळनाडमध्ये इंग्लिश सगळीकडे अगदी पाझरत गेली आहे. इंग्लिशमधील तामिळीयांचे आणि दाक्षिणात्यांचे प्रभुत्व वादातीत असले तरी ब्राह्मण आणि मुदलियार – चेट्टियार या पुढारलेल्या जातींपुरतेच ते अजून मर्यादित आहे. अण्णा दुराई आणि नेडूनजेनियन हे इंग्लिश सफाईने बोलतात पण त्यांच्या तामीळमधील अमोघ वक्तृत्वाची सर त्यांच्या इंग्लिशला नाही, असे आम्हांला सांगितले गेले. लोकसभेत बहुधा के. मनोहरन् सोडले तर बाकी कोणी बऱ्यापैकी इंग्लिशमध्ये बोलू शकत नाहीत. मद्रासच्या अगदी सेंट्रल एग्मोर स्टेशनसमोरील उडप्याचे इंग्लिश अगदी मोडकेतोडके होते. आम्हांला भेटलेल्या वीस-पंचवीस टॅक्सीवाल्यांपैकी एक-दोघांनाच कामचलाऊ इंग्लिशचे चार-दोन शब्द येत होते. बस कंडक्टर्सचेही तेच ! एकूण मद्रासचा चेहराच अजून लख्ख तामीळ आहे !

हिंदी मात्र पोरकी होत चालली आहे. मद्रासमधला ए. जी. च्या ऑफिसमधील एक कारकून मला म्हणाला– " आम्ही हिंदीच्या वर्गांना जातो. आम्हांला जायलाच पाहिजे." आणि माझ्या चेहऱ्यामोहऱ्याचा अंदाज घेऊन त्याने मुत्सद्दीपणे म्हटले, " काय, खरे की नाही ? " – ही मुत्सद्दी मंडळी सोडली तर हिंदीचे अध्ययन खंगत चालले आहे. मद्रास राज्यात शाळांतून हिंदीचा एक पेपर ऐच्छिक आहे. पण

पास-नापास होणेही त्यांनी ऐच्छिकच ठेवले आहे ! ( हिंदीचा मोठा आधार आता एकच – लता, राज कपूर आणि जॉनी वॉकर ! ) याउलट, तिसरीपासून इंग्लिश सक्तीचे असल्याने आणि मद्रासमध्ये मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण फुकट असल्याने इंग्लिशच्या प्रसाराच्या शक्यता जास्त वाढल्या आहेत.

हिंदी आणि इंग्लिशसंबंधी अखेरची बातचीत आम्ही ' दक्षिण भारत हिंदी प्रचार सभे 'त एका निष्ठावंत कार्यकर्त्याशी केली. त्याच्या बोलण्यात आवेश नव्हता. एकप्रकारची हळहळ अन् खिन्नता होती. पण त्याचा आत्मविश्वास खचला नव्हता. तो म्हणाला, – " हिंदीचे सर्वांत मोठे शत्रू यू. पी. वाले. हिंदी-प्रचाराची सूत्रे त्यांनी मुळी आपल्याकडे घ्यायचीच नाहीत. आपण मागे राहून त्यांनी ती बिगरहिंदीवाल्यांकडे द्यायची. पण त्यांना राष्ट्रनिर्माते होण्याची घाई झालेली ! त्यांच्या या अदूरदर्शी घाईमुळच हिंदीची दक्षिणेत पीछेहाट झाली आहे. "

" ही पीछेहाट तात्पुरती आहे की कायमची ? "

" तात्पुरतीच ! आपणही ती तात्पुरतीच मानावी. अजूनही केरळ, आंध्र आणि कर्नाटकमध्ये शाळांतून हिंदी सक्तीची आहे. नर्मदेपर्यंतची राज्ये तरी यू. पी. वाल्यांनी त्याच घाईने गमावू नयेत म्हणजे झाले. हिंदी राष्ट्रभाषा करण्याचा राष्ट्रीय क्षण १९४७ सालीच होता. तेव्हाच आपण निर्धाराने काही पाऊले टाकली असती तर राजगोपालाचारीसुद्धा इतके बदलले नसते. "

" हा राष्ट्रीय क्षण पुन: आणणे शक्य होईल काय ? "

" अगदी शक्य आहे. त्यासाठी बराचसा निर्धार हवा. आमच्यासारख्या प्रचारकांपेक्षा आमच्या नेत्यांजवळ तो हवा ! निर्धाराबरोबर सभ्यता आणि सहानुभूतीही हवी. इतर राज्यांतील परिस्थिती आणि संख्या हिंदीला अजूनही अनुकूल आहे. पण त्याच्या जोरावर मुजोरी न करता ते वागले तर इकडचे कडवे भाषावादी सहज एकटे पडतील. सरसकट सर्वांवर सर्व अवस्थांत आणि सर्व पातळ्यांवर हिंदीच्या सक्तीच्या कल्पनाही सोडून दिल्या पाहिजेत. एक आंतरराष्ट्रीय महत्त्वाची भाषा म्हणून इंग्लिशचाही अभ्यास होत राहावा. विचारी वर्गाला तो करावाच लागेल. पण म्हणून तोही सरसकट सगळ्यांना सर्व अवस्थांत सक्तीचा ठेवण्याची जरुरी नाही. त्याची पातळी ऐच्छिक ठेवूनही त्याचा अभ्यास चालू राहील. ' मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम आणि हिंदी ही दुव्याची भाषा ' हे सूत्र पक्के ठेवून या सर्व गोष्टी आपल्याला साधता येतील, अशी माझी कल्पना आहे. नमस्ते ! "

आम्ही ' नमस्ते ' म्हटले आणि त्यांचा निरोप घेतला. मागून कितीतरी वेळ आम्ही त्या ' नमस्ते 'चा विचार करीत होतो.

[ अपूर्ण ]

## उर्दू वार्ता

### □ हाही देशद्रोहच !

तिकडे अरब-इस्राएलचे युद्धकांड पेटले होते. ज्वाला भडकत होत्या. अरब राष्ट्रांची आत्मश्लाघा, शाब्दिक आतषबाजी इस्रायलच्या अनपेक्षित यशोप्रभेने निष्प्रभ ठरत होती.

आणि इकडे आमची उर्दू वृत्तपत्रे अरब राष्ट्रांना यश लाभावे म्हणून मुस्लिमांना 'योमे फलिस्तीन'चा (पॅलेस्टाईनच्या स्वातंत्र्य रक्षणाचा) सोहळा साजरा करण्याचे, त्यांच्या विजयासाठी 'दुआएँ' मागण्याची आर्जवी आवाहने करीत होती.

'इन्क्लाव', 'उर्दू टाइम्स्,' 'परचम-इ-हिंद,' 'मुल्क व मिल्लत,' 'दावत' इत्यादी मातब्बर उर्दू पत्रांतून अग्रलेख येत होते. 'अरब राष्ट्रे यशस्वी होणार ! प्रे. नासरचे नेतृत्व प्रभावी व फलदायी ठरणार !'

वस्तुत: मराठी-इंग्रजी या इतर भाषांतील वृत्तपत्रांचाही दृष्टिकोन काहीसा असाच होता. आणि तो अरब राष्ट्रांना पाठिंबा देण्याच्या आपल्या राष्ट्रीय धोरणाशी सुसंगतही होता.

परंतु अकस्मात् पारडे फिरले. इवल्याशा इस्रायलने अनपेक्षितपणे बलाढ्य व लढाऊ म्हणून ख्याती असलेल्या अरब राष्ट्रांच्या नाकी नऊ आणले ! आपला बराचसा भाग गमावल्यानंतर का होईना, प्रे. नासरने संयुक्त राष्ट्रसंघाची युद्ध-बंदीची विनंती मान्य केली.

आणि त्याच वेळी-अवेळी अरब राष्ट्रांची बाजू घेणारी वरील उर्दू पत्रे व माझी अनेक मुस्लीम मित्र मंडळी यांना अरब वा नासर यांच्याविषयी वाटणाऱ्या प्रेमाचे रहस्य मला कळले !

प्रे. नासरने युद्धबंदी मान्य करताच, हा वेळपावेतो त्याला डोक्यावर घेऊन नाचणारी आमची मित्रमंडळी त्याच्याच डोक्यावर अपयशाचे खापर फोडू लागली. म्हणू लागली, " प्रे. अयूबप्रमाणे प्रे. नासरनेही मुस्लिम राष्ट्रांचा 'ब्लॉक' कर-ण्याचे मनावर घेतले असते तर सर्व मुस्लिम राष्ट्रे एकत्र येऊन त्यांचे बळ वाढले असते. ही नामुष्की तरी निश्चित टळली असती ! " वगैरे.

खरं म्हणजे प्रे. नासरला मुस्लिम राष्ट्रांचा ब्लॉक करण्याची कल्पना कधीच मान्य नव्हती. भौगोलिक, सांस्कृतिक इत्यादी सर्व दृष्टींनी तसे करणे हितावह नाही, हे प्रे. नासर ओळखून आहे...

परंतु आमच्या उर्दू पत्रांना व संकुचित मनोवृत्तीच्या मूठभर मुस्लिमांना या सर्व मुद्यांचा विचार करण्याची जरुरीच वाटत नाही. फक्त नासर व अरब राष्ट्रे मुस्लिम आहेत म्हणून त्यांना त्यांचा विजय व्हावा असे वाटते. भारत सरकारचा पाठिंबा आहे, राष्ट्रीय धोरणाशी प्रामाणिक राहणे जरूर आहे वगैरे बाबींची त्यांना-काहीच मातब्बरी वाटत नाही ! कारण ती तशी वाटत असती तर अरब–इस्रायला इतक्याच जिद्दीने,– तावातावाने ते व्हिएटनाम युद्धाविषयीही बोलले असते, लिहीत राहिले असते.


भारत-पाक युद्धाच्या वेळेसही अनेक जात्यंध मुस्लिमांना आपल्या पत्रांपेक्षा, अगदी उर्दू वृत्तपत्रांपेक्षाही पाक रेडिओवरील बिनबुडाचा, भडक प्रचारच खरा वाटत होता ! या वेळेसही पाक रेडिओ अरब राष्ट्रांच्या खोटया विजयाची निवेदने आपल्या 'घोगऱ्या' आवाजात करीत होताच !

भारतात राहून, भारताचे अन्न खाऊन परकीय देशांविषयी–केवळ ते मुस्लिम आहेत म्हणून अशा–प्रकारची आस्था वा आत्मीयता वाटणे, हाही मला एक प्रकारचा देशद्रोहच वाटतो !

मुस्लिम बांधवांनी हा संकुचितपणा व परधार्जिणेपणा सोडून द्यावा. इस्लामलाही हा कृतघ्नपणा अभिप्रेत नाही, हे त्यांनी विसरू नये ! ●


सर्व प्रकारची वाद्ये मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण

नावीन्यपूर्ण इलेक्ट्रिक गिटार, मेंडोलीन व बुलबुलतरंग इत्यादींचे आद्य प्रवर्तक



हरिभाऊ विश्वनाथ कं

संगीत वाद्यालय

दादर, मुंबई २८

# पा ल की

दे ख ने वा ले

ते रा खु दा हा फी ज !

नाट्य किंवा चित्रपट ही एक सांघिक कला आहे. नाट्य, अभिनय, संगीत, शिल्प इत्यादी कलांच्या सम्यक् समन्वयातून आविष्कृत होणारे दृश्य काव्य त्यामुळे यापैकी एखादे अंग जरी लुळे पडले तरी संपूर्ण कलाकृती बेढब, बदसूर होते. मग कथावस्तू ही तर या दोनही कलाकृतींचा आत्मा. आत्माच जर कुरूप असेल तर बाह्यत: शरीर कितीही सुंदर असून काय उपयोग ? अर्थात् कधी कधी हे बाह्य सौंदर्यही सकृत्‌दर्शनी मनाला भुरळ पाडतं. डोळ्यांना चकवतं. शारीरिक सौंदर्य हेच आत्मिक सामर्थ्य अशी भ्रांत पडते ! पण तो भ्रम असतो !

पूनम पिक्चर्सचा ' पालकी ' हा चित्रपट पाहत असताना उपरोक्त सैद्धान्तिक सत्याची पुनश्च एकदा प्रचीती येते. प्रस्तुत बोलपटात या सांघिक कलेत अंतर्भूत असणाऱ्या काही अंगांची उंची कमी-जास्त होते आणि त्यामुळे कलात्मक समतोल बिघडतो.

## ' पालकी 'चा प्रदीर्घ प्रवास

लखनौ शहरातील दोन गरीब मुस्लिम कुटुंबे. शेजारी शेजारी राहणारी. एका कुटुंबाचा कर्ता पुरुष ( जॉनी वॉकर ) वृत्तपत्रे विकून जीवन-गाडा कसाबसा हाकणारा तर दुसरा कवी नसीम ( राजेंद्रकुमार ) म्हणजे बेकार !

जॉनी वॉकरच्या बहिणीवर राजेंद्रकुमारचे प्रेम. पण लग्नासाठी पैसा नसतो. तो एका मुशायऱ्यात ( कवी संमेलनात ) भाग घेतो. बक्षीसही मिळते. पण रसिकांकडून त्याच्या गरिबीचे धिंडवडे निघतात. तो बक्षीस नाकारतो. सूनमुख पाहावयाला आसुसलेली त्याची आई त्याला बक्षिसाची रक्कम घेण्यास सांगते. पण प्रिया-मेहरू ' घेऊ नको ' अशी शपथ घालते. तो घेत नाही. पण जॉनी वॉकर ' येनकेन प्रकारेण ' तो पैसा त्याच्या घरात आणतो. त्याचे लग्न लावून देतो. पण पहिल्याच रात्री बक्षिसाचा गौप्यस्फोट होतो. ' प्रेमाची शपथ ' मोडल्याबद्दल राजेंद्रकुमार प्रायश्चित्त घेण्यासाठी-नबाबाची रक्कम त्याला परत करण्यासाठी-पैसे कमवायला मुंबईला निघून जातो.

पैसे साठवून तो लखनौला परतणार, त्याच दिवशी बोटीला आग लागते. नोकरी लावून देणाऱ्या शेटजीचे मूल वाचवायला जातो आणि स्वतःच अडकून बसतो. त्याचा काहीच पत्ता न लागल्याने शेटजी घरी कळवतो की, तो आगीच्या भक्ष्यस्थानी पडला! ही बातमी ऐकून त्याच्या नववधूला—मेहरूला—वेडाचा झटका येतो. स्मृतिभ्रंश होतो. इतर सारे उपाय थकल्यावर तिचा भाऊ तिचे दुसरे लग्न नबाबाबरोबर लावून देतो.

नबाबाबरोबरच्या पहिल्या रात्री मेहरूची स्मृती परत येते. ती त्याला वस्तुस्थिती समजावून सांगते. ती आपल्या पहिल्या पतीला पूर्णतया विसरेपर्यंत थांबण्याचं नबाब मान्य करतो.

इकडे राजेंद्रकुमार जिवंत असतो. आणि गावी परतल्यावर मिनू मुमताज रागाच्या भरात त्याला मेहरू मेल्याचे सांगते. ते खरंच समजून तो कबरस्तानात जातो. परतताना नबाबाच्या मोटारीखाली सापडतो. तो त्याला उपचारार्थ आपल्या घरी नेतो. तेथूनही तो कबरस्तानात जात राहतो. मेहरू त्याला ओळखते. कबरस्तानात 'रूह'(आत्मा) च्या रूपात भेटते. कालांतराने नबाबाला हे सारे कळते. मेहरू व नसीमच्या पवित्र भावविषयी त्याची खात्री पटते. पण खानदानच्या इज्जतीसाठी तो बायकोला—मेहरूला—मुक्त करायला तयार होत नाही. पण शेवटी विष देऊन तिची परीक्षा पाहतो. आणि खात्री पटल्यावर तो नसीमच्या हवाली करतो. नसीम आणि मेहरूचे पुनर्मीलन होते.

क्षणापूर्वी कवीच्या काव्यावर लट्टू झालेले रसिक श्रोते त्याच्या गरिबीचे दर्शन घडताच त्याची टिंगल करतील काय? आणि केली टिंगल त्यांनी, म्हणून कवी त्याला काही किंमत देईल काय? बक्षीस नाकारील काय? नबाबाचे बक्षीस. नबाबाने काही त्याचा अपमान केलेला नसतो. उलट बक्षीस नाकारून तोच नबाबाचा एकप्रकारे अपमान करतो!

बक्षीस नाकारण्याचे एकून आई अतृप्त मनाने मरण्याचा धाक घालते तरी

प्रिया मेहरू शपथ घालते म्हणून तो बक्षीस घेत नाही. पण मेहरू तरी एवढी शपथ कशासाठी घालते ? त्या बक्षीस–प्रकरणाला उगाचच प्रतिष्ठेचा प्रश्न (भारत सरकारसारखा ?) करण्याचे कारणच काय मुळी ? बरं, तेही आम्ही घडीभर मान्य केलं. पण जॉनी वॉकरच्या युक्तीमुळे लग्न लागते. आणि पहिल्या रात्री लग्नाचा पैसा म्हणजे बक्षीसाची रक्कम होय, हे कळते, पण म्हणून असे काय मोठे आकाश कोसळते ? त्यासाठी नक्षत्रासारख्या नववधूला टाकून कोणी सुहागरातचा 'फियास्को' करील काय ? पण......

बोटीला आग लागते, तेव्हा मुलाला वाचविण्यासाठी नसीम त्याला वरून खाली जाळीत टाकतो. मग त्याच्यासह स्वत: का उडी टाकीत नाही ? पडलाच असता तर फक्त फ्रॅक्चरवर निभावले असते. पण पुढचे निरर्थक घोटाळे टळले असते–बिचारे प्रेक्षक सुटले असते–पण तेवढे कुठले भाग्य ! बरं, ज्याच्या मुलाला वाचवलं त्या शेटजींनी नीट तपास तरी करावा त्याचा ? इतर प्रेते सापडतात पण नसीमचा कोठेच पत्ता लागत नाही ! मग तो बेपत्ता असल्याचे तरी त्याच्या घरी कळवायचे. चक्क मेल्याचे कळवून तो शेटजी बेजबाबदारपणा व कृतघ्नपणा यांची कमाल करतो.

बाकी हा नबाब विक्षिप्तच वाटतो. हा घडीत मेहरूवर मेहरबान होतो तर घडीत कमालीचा कृपण, कठोर. मेहरू–नसीमच्या 'पाक प्यार' विषयी खात्री पटूनही व ती अनेकदा त्याला 'तलाक' (घटस्फोट) मागत असताही खानदानच्या खोटया प्रतिष्ठेसाठी लोचटासारखा तो तिचा पिच्छा काही सोडीत नाही आणि तिला हात लावण्याचा धटिंगणपणाही करीत नाही व शेवटी खानदान, प्रतिष्ठा सारं विसरून नसीमच्या हवाली करतो ! सारंच तर्कदुष्ट !

एखाद्या वस्त्राचे धागे कच्चे असतात. सूत कमालीचे हलके असते पण ते दिसायला मात्र सुरेख असते. धाग्याच्या कमकुवतपणावर त्यातील कलात्मक कलाबूत अक्षरश: मात करते. नेमके असेच इथे या पालकीबाबत आढळते.

...नसीम–मेहरूचा छतावरचा तो आगळा प्रणय–प्रसंग, अस्सल मुस्लिम पद्धतीचा वाटतो. एकूण चित्रपट उत्कृष्ट वातावरणनिर्मिती, अभिजात अभिनय, हृदयस्पर्शी दिग्दर्शन यामुळे प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतो.

...पतीच्या मृत्यूची बातमी कळताच मेहरूने फोडलेली हृदयद्रावक किंकाळी, प्रभावी पार्श्वसंगीत, थरथरणाऱ्या वहिदाच्या प्रतिमा यामुळे दृश्य भलतेच परिणामकारक ठरते.

...मेहरूच्या निधनाची वार्ता ऐकून नसीमची मूठ आवळली जाते. मुठीतील मेहरूसाठी आणलेल्या बांगड्यांचा चुरा होतो आणि जमिनीवर विखुरला जातो, तो प्रसंग.

...नसीमची शेरवानी शिवताना शेरवानीबरोबर मेहरूचा दुपट्टा पण शिवला जातो...दोन जीवांचे लागेबांधे किती सूचकतेने दाखविण्यात आले आहेत.

## धनी–यशाचे आणि अपयशाचे !

कथा सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक नौशादची. लेखकाच्या नवखेपणामुळे त्यात वर विस्ताराने दाखविलेली दोषस्थळे भरपूर. खरं म्हणजे कवीशसारख्या जुन्या जाणत्या पटकथाकाराला त्यातील कच्चे दुवे टाळणे अशक्य नव्हते.

संकलनातील कौशल्याच्या अभावामुळे व कथानकातील कसही कमी कमी होत गेल्याने मध्यंतरानंतर चित्रपटाची गती फारच संथ वाटते.

नौशादचे शास्त्रोक्त संगीत उत्तम पण गीतांच्या चालीपेक्षा पार्श्वसंगीतच अधिक प्रभावी. शकील बदायूनींच्या 'कल रात जिंदगीसे मुलाकात हो गई,' 'चेहरेसे आज तो पर्दा उठाइए,' 'जानेवाले तेरा खुदा हाफीज' ही अर्थपूर्ण, सुंदर गाणी लोकप्रिय व्हावीत.

वझाहत मिर्झांचे संवाद मार्मिक व चटकदार. उदा. राजेंद्रकुमार म्हणतो, "दुनिया मुर्देको दफना देती है, मगर यहाँ लोगोंने मेरी रूह (म्हणजे मेहरू–पत्नी !) को दफनाकर मुझे जिंदा छोड दिया है।" किंवा रेहमान मेहरूविषयी म्हणतो, "वह गम की कीमत जानती है।"

व्ही. जाधवराव यांनी आपल्या अप्रतीम कलेने नबाबाचा प्रासाद मूर्तिमंत उभा केला आहे. फरेदून इरानींचा कॅमेराही फार कौशल्याने फिरला आहे. छतावरील प्रणय–प्रसंगांत भिंतीच्या भगदाडातून त्यांच्या कॅमेऱ्याने वहिदा रेहमानच्या चेहऱ्यावरील विविध भाव फारच हळुवारपणे टिपले आहेत. इतरही 'शॉटस्' त्यांच्या या क्षेत्रातील अधिकाराची जाणीव करून देतात.

वहिदा रेहमानची अभिव्यक्ती अप्रतीम. ती हसते गोड, रडते गोड, लाजते गोड आणि 'डोळ्यांनी बोलते' तर फाऽरऽच गोड !

राजेंद्रकुमार दुःखद प्रसंगी दिलीपची नक्कल करीत असला तरी इतर काही ठिकाणी स्वतःचे कसबही दाखवतो.

अशी ही 'पालकी' बाह्यतः प्रेक्षणीय पण प्रवासाला कुचकामी. या पालकीचा प्रवास म्हणूनच चोखंदळ रसिकांना रटाळ, कंटाळवाणा वाटेल.

**हिदायतखान**



# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**
सायनाचार्य, नासिक

## माहे जुलै १९६७

**मेष** : साडेसाती काही काल विसरून जावी इतकी अनुकूल ग्रहस्थिती सध्या तुमच्या वाटयास आलेली आहे. एकटा पराक्रमस्थ सूर्यही साऱ्या अनिष्ट ग्रहांना शह द्यायला समर्थ ठरेल.

पहिला पंधरवडा खूपच गाजून जाईल. नवे क्षेत्र गवसेल, व्यवसायधंदा यशस्वी करणारे नवे तंत्रमंत्र सापडेल; दुसरा पंधरवडाही तसा वाईट नाहीच पण खूपच धावपळ, धडपड करावी लागेल.

याच काळापासून तुमच्या कर्तृत्वाला उधाण येईल. जे जे करावे ते ते धवघवीत यश घेऊन उठावे असा प्रत्यय क्षणोक्षणी येईल.

राजकीय क्षेत्रात आघाडीवर राहण्याचा मान मिळेल. नोकरीधंद्यात तर तुमचे श्रेष्ठत्व निरपवादपणे सिद्ध होईल.

दि. ५ ते ९, १४ ते २०, २४ ते २६ या काली आपल्या अनेक योजना आकार घेऊ लागतील.

**वृषभ** : शनी एकादशात, गुरु-शुक्र पराक्रमात. त्यांच्या सामर्थ्याचा साक्षात्कार या महिन्यापासूनच घडायला लागेल. या गोष्टीचा पहिल्या पंधरवड्यापेक्षा दुसऱ्या पंधरवड्यात हातोहात प्रत्यय येईल.

कलावंतांना, साहित्यिकांना तर हा अनन्यसाधारण प्रगतीचा काल जाणवेल.

या वेळी कोणीही तुमचा रस्ता रोखू शकणार नाही.

प्रतिभेचा उन्मेष बहरेल, नवे क्रांतिकारक लेखन हातून घडेल. जगाने तुमच्या कृतीचा मागोवा घ्यावा असं काही भव्य-दिव्यही या वेळी आपल्या हातून घडेल. प्रामुख्याने सूर्य-हर्षल लाभयोग (दि. १४) व गुरु-शनी त्रिकोण (दि. २५) या कालखंडाच्या दरम्यान आपल्या चारित्र्याला एकाएकी उत्थान लाभावे. या महिन्यातील मुख्य गोष्ट दूरचा प्रवास आणि बदली हीच.

दि. ३ ते ८, १४ ते २५ हा काल चिरंतन स्मृती ठरावेत

**मिथुन** : मंगळाचे राश्यंतर घडले आणि तुमच्या कित्येक दिवसांच्या अनिष्टतेवर पडदा पडला. तुमच्या आचार-विचार–उच्चारांत क्रांती घडवून आणणारा हा काल आहे.

आजवर जीवाचे रान करूनही जे घडू शकले नाही, ते आता सहजासहजी घडून यायला लागेल, या माझ्या म्हणण्याचा प्रत्यय दि. १४ पासून आपणांस यायला लागेल.

ग्रहांची अनुकूलता + प्रयत्नांची शिकस्त म्हणजेच घवघवीत यश, असे आहे यशस्वी जीवनाचे समीकरण.

दुसऱ्या पंधरवड्यात आपल्या साऱ्या योजना आकार घेऊ लागतील. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभू लागेल. नव्या व्यवसायधंद्याचे आराखडे तयार करू लागाल. रासायनिक–वैद्यकीय व्यवसायात तर अपेक्षेबाहेर यश लाभेल.

दि. १ ते ६, १४ ते २१, २५ ते २८ या कालाची नोंद करा.

**कर्क** : आशा–निराशेच्या हिंदोळ्यावर आजवर आपले जीवन आंदोलत होते. आता निराशा तुम्हांला चुकूनही जाणवू शकणार नाही असे कर्क-गुरूचे तुम्हांला अभिवचन आहे. आपण हाती घेतलेले कार्य कितीही अवघड, मोठे असो, ते यशस्वी करून दाखवण्याची हमी अनेक ग्रहांनी घेतलेली असल्याने निर्धास्तपणे आपण भविष्यकालाची वाटचाल करू शकता.

रासायनिक कार्य, धान्योत्पादन, सामाजिक कार्याचे मार्गदर्शन या बाबतीत आपण पूर्णत्वाने यशस्वी व्हाल. शैक्षणिक क्षेत्रातही आपण आघाडीवर राहाल. केवळ पैसा या दृष्टिकोनांतून या कालाकडे आपण पाहू नका. नेत्रदीपक यश व उच्चतम प्रतिष्ठा देणे हेच या कालाचे स्वरूप आहे. आणि त्या बाबतीत आपण कधीही निराश होऊ शकणार नाही.

दि. ३ ते ८, १४ ते १९, २५ ते २८ या कालात अनेक अपेक्षित चांगल्या घटना घडाव्यात.

**सिंह** : रवि-हर्षल लाभयोग हाच या महिन्यातील सर्वोत्तम ग्रहयोग. तोच तुमचे चारित्र्य घडवील. जडवील. ध्यानीमनी नसताना उच्चस्थानावर आरूढ होणे, अनेक मार्गांनी पैसा हाती येणे, उपेक्षित गोष्टींना वाचा फोडणे, न होणारी काम

यशस्वी करून दाखविणे हेच या कालाचे महत्व व माहात्म्य आहे. पहिल्याच पंधर-वड्यात या साऱ्या गोष्टींचा प्रत्यय यावा.

दुसऱ्या पंधरवड्यात सांपत्तिक बाजू फारशी समाधानाची जाणवली नाही तरी अपयशाचा डाग चुकूनही लागू शकणार नाही.

नवे जिवाभावाचे स्नेहसंबंध जुळून यायला लागतील, काही उपासकांना ईश्वरी साक्षात्काराचाही प्रत्यय येईल. मन प्रसन्न व उत्साही बनेल.

दि. १ ते ८, १२ ते १८, २१ ते-२७ जुलै या वेळी अनपेक्षितपणे अनेक लाभ पदरी पडतील.

**कन्या :** कित्येक वर्षांनंतर घडून येणारा या वेळचा गुरु-शनी त्रिकोण तुमच्या जीवनात अनेक चांगल्या अघटित घटना घडवून आणील.

नोकरीधंद्यात उच्चावस्था लाभेल, आपल्या साऱ्या अपेक्षित गोष्टींना गती मिळू लागेल, तुम्हांपैकी काही व्यक्ती परराष्ट्रीय प्रवासासाठी प्रस्थान ठेवू लागतील.

दुसऱ्या पंधरवड्यात अनेक ग्रह लाभस्थानी येणार असल्याने तुमच्या जीवना-तील परमोत्कर्षाच्या कालात या कालाची गणना होईल. रवि-हर्षल योगामुळे अनेक मोठाले लाभ उठवले जातील. कला-साहित्य क्षेत्रात दीर्घ मुदतीचे आकर्षक करार-मदार होतील.

सांसारिक जीवनातील बऱ्याचशा व्यथा–विवंचना मिटून जातील.

दि. ३ ते ९, १४ ते १९, २४ ते २७ या कालाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

**तूळ :** या महिन्यापासून नवा यशस्वी प्रांत तुमच्या दृष्टिक्षेपात यायला लागेल. आणि त्या क्षेत्रात प्रवेश करण्याची तुमची सारखी धडपड सुरू होईल. आगामी अकराव्या गुरूची ही प्रसादचिन्हेच होत.

वाढत्या खर्चाचा लोंढा थोपविण्यात यशस्वी व्हाल, स्थगित कार्याला जोराची चालना द्यायला उद्युक्त व्हाल.

प्रमुखांना, कलावंतांना–यंत्रतंत्रविशारदांना आगामी काल सर्वंकष प्रगतीचा जाणवेल.

या महिन्याच्या उत्तरार्धात तुमचे अनेक व्यावसायिक प्रश्न भराभर सुटायला लागतील. आजवरच्या तुमच्या खडतर तपस्येचे श्रेय याच वेळी तुम्हांला मिळावे.

दि. ६ ते १४, २४ ते २८ या कालावर सारे लक्ष केंद्रित करा. तुमची बरीचशी कामे हातावेगळी व्हायला लागतील याच काली.

**वृश्चिक :** तुमच्या भविष्यकालाची अंधुकशी कल्पना यावी म्हणून सांगून ठेवतो की, गेल्या २–३ महिन्यांत जे तुम्ही स्वास्थ्य अनुभवले ते मंगळ व्ययात आल्यानंतर अनुभवण्यास मिळण्याची शक्यता फारच कमी. प्रतिष्ठा आणि लोकप्रियता यांना जरी धक्का लागला नाही तरी वाढत्या खर्चाचा लोंढा थोपविण्यात यशस्वी व्हालच अशी खात्री देता येणार नाही.

व्यावसायिक क्षेत्रात मतभेदांच्या वावटळी उठायला लागतील, अपेक्षित यश मिळविण्यासाठी अविश्रांत परिश्रम करावे लागतील. सहज पाऊल टाकावे आणि ते पवित्र्यातच पडावे अशी अपेक्षा आता करता येणार नाही.

दूरच्या प्रवासाचे शक्यतो टाळा. फार मोठ्या जबाबदाऱ्यांचे ओझे उचलायच्या भानगडीत पडू नका.

दि. ८ ते १५, १९ ते २५, २७ ते ३० या काली काही अनुकूल घटना घडाव्यात.

**धनू :** आजवर साऱ्याच ग्रहांची नाराजी पत्करून वागत होता–आता फक्त मंगळ एकादशस्थानी आला आहे–हेही नसे थोडके.

अगदी स्पष्टच सांगण्याचे म्हणजे हाही महिना यथायथाच. त्याच विवंचना त्याच अडचणी. फक्त फरक तपशिलात.

प्रखर अनिष्टतेशी झगडत आपण आपले आसन टिकवून आहात–यातच तुमच्यातील निर्धार–निष्ठेचे दर्शन घडते. आजवर आपले सारे श्रम वाया जात होते आता ते जाणार नाहीत एवढाच या वेळच्या अनुकूलतेचा अर्थ. नोकरी-धंद्यांतील पेचप्रसंग थोरांच्या मदतीने सुटू शकतील, पैशा-अडक्याचा प्रश्न प्रयासाने सुटू लागेल. सूर्य अनुकूल नसल्यामुळे प्रकृतीकडे दुर्लक्ष करून भागण्यासारखे नाही.

दि. ३ ते ८, १४ ते १८, २२ ते २६ या काळी अपेक्षेप्रमाणे बरेचसे घडावे.

**मकर :** अंशपूर्ण गुरु–शनी त्रिकोण. ६० वर्षांनंतर लाभलेली ही अनन्य साधारण ग्रहस्थिती तुमची हयात उजळून काढील.

अविश्रांत परिश्रमानेही जे कधी कुणाला लाभू शकले नाही ते तुम्हांला सहजासहजी लाभू शकेल अनेकांचे सहकार्य लाभेल, वरिष्ठांची कृपादृष्टी वळेल, पैसा, प्रतिष्ठा हवं ते या वेळी मिळेल.

मंगळही तुमच्या कर्मस्थानी प्रवेश करीत आहे. अशक्य आणि अवघड हे त्याला मंजूर नाही.

नवीन कार्याला हात घालाल आणि ते यशस्वी करून दाखवाल. स्थावराचा प्रश्न सुटेल, वाहनाची चिंता मिटेल. वैचारिक संघर्ष सुटेल.

दि. ४ ते ९, १४ ते १९, २४ ते २७ या काली अनेक चिरंतन स्मृतीच्या घटना घडतील.

**कुंभ :** सूर्य-मंगळासारखे चारित्र्य घडविणारे ग्रह तुम्हांला अनुकूल असल्यामुळे या महिन्यातील सुप्त शक्तींना आवाहन मिळू लागेल. उद्वेग, नैराश्य, अस्वास्थ्य हे सारे प्रकार आता आपण विसरू शकता.

आपल्या कर्तृत्वाला धार चढेल, निर्धार निष्ठेचे श्रेय पदरी पडेल, आणि आजवरच्या साऱ्या स्थगित कार्यांना चालना मिळू लागेल.

या महिन्याचा दुसरा पंधरवडा चांगलाच गाजून जाईल. रवि-हर्षल शुभयोगामुळे तुमचे कार्यक्षेत्र आकर्षक बनू लागेल. मंगलेल्या साऱ्या अपेक्षा पूर्णांशाने

सांधल्या जातील. या महिन्यात वरचेवर दौऱ्यावर निघावे लागेल. नव्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील.

दि. ६ ते १०, १४ ते १८, २१ ते २६ अपेक्षित यश पदरी पडेल.

**मीन** : या महिन्यांतील मंगळाच्या राश्यंतराने आपल्या परिस्थितीत फारसा फरक पडेल असे नाही.

मानसिक व्यथा–विवंचना जाणवत राहतील, प्रकृतीही फारशी चांगली राहील असे वाटत नाही. या वेळी पहिल्या पंधरवड्यात प्रत्येक पाऊल जपूनच टाकायला हवे.

प्रतिमा झाकळल्यासारखी वाटेल, हाती घेतलेली कामे गती घेईनाशी होतील. हिम्मत आणि निर्धार हाच एक तोडगा या कालावर आहे. अशा माणसांना ग्रहही टरकतात !

नोकरीधंद्यात फार मोठे काही दिव्य भव्य घडेल अशी अपेक्षा करण्यात अर्थ नाही. आहे त्या परिस्थितीतच काही दिवस घालावे लागणार आहेत. त्याला उपाय नाही.

दि. ५ ते ९, १३ ते १६, २५ ते २८ थोडेफार यश याच काळी लाभू शकेल.

●

---

## फोनची घंटा

आपला मित्र बहिरा असल्याने त्याच्या फोनची घंटा सारखी खणखणते व त्यामुळे त्रास होतो म्हणून बाकीच्या मित्रांनी त्याला दवाखान्यात जाऊन उपचार करवून घेण्यास भाग पाडले. तिथून परतल्यानंतर एकाने त्याला विचारले " हं काय कसं वाटतं आता ? उपचारांचा फायदा झाला का ? "

" झाला तर " बहिऱ्या मित्राने उत्तर दिले. पूर्वी फोनची घंटा खणखणली तरी मी फोनला उत्तर देत नव्हतो, पण आता घंटा वाजो वा न वाजो मी फोन उचलून बोलायला लागलो आहे.

## नेमबाजी

सैन्यात नवीनच भरती केलेल्या रंगरूटांना नेमबाजीचे शिक्षण देण्यात येत होते. त्यातील अनेकांचे नेम लागत होते. परंतु एका रंगटचा एकही नेम लागत नव्हता. ते पाहून शिक्षकाने त्याला विचारले, " काय रे, तुझा एकही नेम का लागत नाही ? "

" काही कल्पना नाही ? कारण येथून गोळ्या तर बरोबर सुटतात. " तो उत्तरला.

**अशोक आंग्रे**

साप्ताहिक 'माणूस'

वार्षिक वर्गणी रुपये वीस

• •

१०० रुपये पाठवून
पाच वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास

## नाझी भस्मासुराचा उदयास्त

• •

२०० रुपये पाठवून
दहा वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास

## राजा शिवछत्रपति

सप्रेम भेट.

• •

सप्रेम भेट योजना : १ जून ते १५ ऑगस्ट १९६७

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.